रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २१३ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

ऑफिस कामाकरिता अनुभवी
मुलगी/महिला पाहिजे.
पात्रता – .B.com, Typing, MS-CIT
पगार – १२०००–१५०००
पत्ता – नांदईपाडा, झिराड, अलिबाग–रायगड
संपर्क क्र. ९८२२०८३३५३,
८४०७९८२७१२

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

# पश्चिम घाटाचा रक्षक हरपला!

## माधव गाडगीळ अनंतात विलीन



। पुणे । प्रतिनिधी ।

भारतभरातील पर्यावरण चळवळीला वैज्ञानिक दिशा देणारे आणि पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी आयुष्य वेचणारे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ (८३) यांचे बुधवारी (दि. ७) रात्री पुण्यात निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. पुण्यातील डॉ. शिरीष प्रयाग हॉस्पिटलमध्ये रात्री ११ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने जागतिक स्तरावरील एक अत्यंत अभ्यासू आणि लोकाभिमुख वैज्ञानिक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

डॉ. गाडगीळ यांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी त्यांच्या ए-१८, स्प्रिंग फ्लॉवर अपार्टमेंट, पंचवटी, पाषाण या निवासस्थानी सकाळी ठेवण्यात आले होते. त्यांच्यावर गुरुवारी (दि. ८) दुपारी ४ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

माधव गाडगीळ यांचे पश्चिम घाटाच्या जैवविविधतेवरील संशोधन जागतिक पातळीवर नावाजले गेले. २०११ मध्ये त्यांनी सादर केलेला गाडगीळ समितीचा अहवाल हा भारताच्या पर्यावरणीय इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला. पश्चिम घाटासारख्या संवेदनशील भागात होणारे अनिर्बंध बांधकाम आणि औद्योगिक प्रकल्प भविष्यात विनाशकारी ठरतील, असा स्पष्ट इशारा त्यांनी या अहवालातून दिला होता. अलीकडच्या काळात निसर्गाच्या •> पान २ वर

## वेधक

### फेटाळलेल्या उमेदवारी अर्जांवर आज सुनावणी

**मुंबई :** पुढील आठवड्यात होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आलेल्या अनेक इच्छुक उमेदवारांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विविध कारणांमुळे रद्द करण्यात आलेले अर्ज पुन्हा स्वीकारण्यात यावेत, या मागणीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेतील मुद्द्यांचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाने या प्रकरणावर शुक्रवारी तातडीची सुनावणी ठेवली आहे. विभाग क्रमांक १ ते २२७ •> पान २ वर

### सोन्याचे दर घसरले

**मुंबई :** सोन्या-चांदीच्या दरात बुधवारी मोठी घसरण झाली होती. सोन्या-चांदीच्या दरातील घसरणीचे सत्र गुरुवारीही सुरूच होती. बुधवारी चांदीचे दर ९,००० रुपयांनी घसरले असून, सोन्याच्या दरात १००० रुपयांनी घसरण झाली आहे. चांदी बुधवारी प्रतिकिलो ₹९,००० ने घसरून २.४२ लाखांवर पोहोचली. त्याचप्रमाणे सोन्याच्या भावातही घसरण झाली आहे. गुरुवारी, मल्टी-कमोडिटी मार्केटमध्ये १ किलो चांदीची किंमत सुमारे ९,००० ने घसरून २.४१ लाख झाली. हा ५ मार्चचा फ्युचर्स मार्केट रेट आहे.

### शेअर बाजार गडगडला

**मुंबई :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५०० टक्के टॅरिफ लादण्याची धमकी दिल्यानंतर भारतीय शेअर बाजारात दबाव दिसून आला. ट्रम्प यांच्या धमकीनंतर शेअर बाजारात मोठी घसरण झाली आहे. आयटी शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण झाली आहे. सर्वाधिक चार टक्क्यांची घसरण टीसीएसच्या शेअरमध्ये दिसून आली. रशियाकडून तेल खरेदीमुळे भारतावर ५०० टक्के टॅरिफ लादण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. त्यामुळे भारत-अमेरिका व्यापार संबंध ताणण्याची शक्यता आहे.

# ‘महसूल’वर ताण

## २९३ रिक्त पदांमुळे कामाचा खोळंबा

प्रमोद जाधव

। रायगड ।

**रायगड जिल्ह्यातील महसूल विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची कमतरता जाणवत असून, तब्बल २९३ पदे रिक्त आहेत. जिल्ह्याचा महसूल कारभार सध्या केवळ ९५६ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भरोशावर चालविला जात आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त प्रशासकीय कामाचा ताण वाढला असून, त्याचा थेट परिणाम गतिमान प्रशासनावर बसत असून, शासकीय कार्यालयात सर्वसामान्यांच्या कामांचादेखील खोळंबा होत आहे. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर भरती करून ही पदे भरावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे.**

महसूल विभाग हा शासनाचा अत्यंतमहत्त्वाचाविभागमानलाजातो. जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागामार्फत शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असतानाच, शासनाचा महसूल गोळा करण्यासाठी प्रत्येक तालुक्याला टार्गेट दिले जाते. त्यानुसार महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी काम करतात. त्यात बिनशेती शोध मोहिमेंतर्गत कारवाई करून दंड वसूल करणे, बेकायदेशीर बांधकाम, उत्खनन करणाऱ्यांना दंड आकारून त्यांच्याविरोधात कारवाई करणे, निवडणुकीच्या कालावधीत मतदान, मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशिक्षण घेणे, वेगवेगळ्या शिबिरांतून शासनाच्या योजनांचालाभजनतेपर्यंतपोहोचविणे, रोजगार हमी योजनेसह संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांपर्यंत शासनाचा निधी पोहोचविणे, अशी अनेक कामे महसूल विभागामार्फत केली जातात. याशिवाय जिल्ह्यात मंत्र्याचा दौरा आल्यावर त्याचे नियोजन करणे, हीदेखील कामे महसूल विभागामार्फत केली जातात.

रायगड जिल्ह्यामध्ये महसूल विभागात जिल्हाधिकाऱ्यांपासून अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन उपजिल्हाधिकारी, वेगवेगळ्या विभागातील तहसीलदार, नायब तहसीलदार, लघुलेखक, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, लघु टंकलेखक, वाहन चालक, मंडळ अधिकारी, तलाठी (ग्राम महसूल अधिकारी), महसूल सेवक (कोतवाल) असे वेगवेगळे अधिकारी व कर्मचारी काम करतात. ग्रामपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत ही यंत्रणा कार्यान्वित आहे.

जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी यांच्यापासून ते कोतवालापर्यंतची एक हजार २३१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ९५६ पदे शासनाकडून भरण्यात आली आहे. या भरलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये काही कर्मचारी वेगेवेगळ्या कारणातून रजेवर जाणे, काही कर्मचारी दौऱ्यावर, काही कर्मचारी मंत्रालयात, तर काही कर्मचारी व्हीडीओ कॉन्फरन्सला असणे. त्यामुळे फक्त बोटावर मोजण्याइतक्या कर्मचाऱ्यांच्या भरोवशावर प्रशासकीय कामकाज चालविले जात आहे. अपुऱ्या अधिकारीवकर्मचाऱ्यांअभावीकार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार टाकला जातो. त्यामुळे प्रशासकीय कामकाज अनेक वेळा वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी सर्वसामान्य करीत असतात. कामांचा खोळंबा होत असल्याचा त्रास कर्मचाऱ्यांसह सर्वसामान्यांदेखील होतो.

### अतिरिक्त कामाचा ताण

जिल्हाधिकारी कार्यालयासह उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय, मंडळ अधिकारी, कार्यालयामार्फत शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात.

शासनाचा महसूल वाढविण्यासाठी या विभागामार्फत शर्थीचे प्रयत्न केले जातात. बिनशेती शोधमोहीम, सभा, बंदूक परवाना, बेकायदा बांधकामे, निवडणूक अशा विविध कामांची पाहणी होत असताना, शासनाच्या रोजगार हमी योजनांसह इतर योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम महसूल विभागामार्फत केले जाते. मात्र, अधिकारी, कर्मचारी अपुरे असल्याने एकाच कर्मचाऱ्यावर दोन ते तीन विभागांचा कारभार सोपविला जातो. त्यामुळे अतिरिक्त कामाचा ताण अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पडतो. त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.

### रिक्त पदांवर दृष्टीक्षेप

| पद | संख्या |
|---|---|
| उपजिल्हाधिकारी | ०१ |
| नायब तहसीलदार | ०६ |
| अव्वल कारकून | १० |
| लघुटंकलेखक | ०२ |
| महसूल सहाय्यक | २४ |
| मंडळ अधिकारी | १४ |
| तलाठी | १०६ |
| कोतवाल | ११८ |
| वाहन चालक | १२ |
| एकूण | २९३ |

### नागरिकांना नाहक त्रास

रायगड जिल्ह्यामध्ये उपजिल्हाधिकारी यांच्यासह कोतवालपर्यंतची २९३ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये ग्रामीण पातळीवर काम करणाऱ्या कोतवालांची ११८, तलाठ्यांची १०६, मंडळ अधिकाऱ्यांची १४, वाहन चालकांची १२ तर अव्वल कारकूनांची १० पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे.

# १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे.

अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. •> पान २ वर

# डोंगर पोखरुन माती तस्करी



संतोष पेरणे

। नेरळ ।

■ मध्य रेल्वेच्या कारशेड्साठी बेकायदेशीर माती उत्खनन

■ शेतकऱ्यांचा आरोप, शासनाच्या रॉयल्टीवर गदा

कर्जत तालुक्यात सध्या माती तस्करीचा गंभीर प्रकार समोर आला असून, बेकायदेशीर खोदकामामुळे पाली-भूतवली धरणाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकरी हतबल झाले असून, महसूल विभागाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मध्य रेल्वेकडून कर्जत परिसरात नवीन कारशेड उभारण्यात येत आहे. ही कारशेड सुमारे सात ते आठ किलोमीटर अंतरात पसरलेली असून, मातीचा भराव •> पान २ वर

# महाराष्ट्र पुन्हा गारठणार

। मुंबई । प्रतिनिधी ।



महाराष्ट्रात पुन्हा एकदा थंडीचा जोर वाढण्याची शक्यता असून, हवामान खात्याने अनेक जिल्ह्यांसाठी गारठ्याचा इशारा दिला आहे. उत्तरेकडून येणारे थंड वारे सक्रिय राहणार असल्याने विदर्भ आणि मराठवाड्यात थंडी अधिक तीव्र जाणवणार आहे. दि. ९ जानेवारी रोजी राज्यात एकूणच कोरडे हवामान राहील, मात्र सकाळी धुके आणि रात्री गारठा वाढेल.

कोकण विभागात समुद्राच्या प्रभावामुळे तापमान तुलनेने मध्यम राहणार आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत आकाश अंशतः ढगाळ राहून सकाळी धुक्याची शक्यता आहे. या भागात कमाल तापमान २९ ते ३१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १९ ते २१ अंशांच्या दरम्यान राहील. दाट धुक्यामुळे सकाळच्या वेळेत वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### विदर्भ, मराठवाड्यात थंडीचा कडाका

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत सकाळी धुके, तर दिवसा निरभ्र आकाश राहील. येथे किमान तापमान १२ ते १५ अंशांपर्यंत घसरण्याची शक्यता असून, रात्री व सकाळी थंडीचा चांगलाच जोर जाणवेल.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव, •> पान २ वर

# आमदारांनी अनंत गोंधळींना नाकारले

## शिंदे गटातील अंतर्गत राजकारण तापले

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शिवसेना (शिंदे गट) अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी यांना काविर जिल्हा परिषद मतदारसंघातून उमेदवारी नाकारण्याचा निर्णय बुधवारी घेण्यात आल्याने रायगड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. खानाव-नागाव येथील गोंधळी यांच्या रिसॉर्टवर झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला आमदार महेंद्र दळवी, जिल्हा प्रमुख राजाभाई केणी, माजी सभापती दिलीप भोईर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. आतापर्यंत झालेल्या तीन आढावा बैठकीत विविध मतदारसंघांतील उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली होती. मात्र, रामराज मतदारसंघातून अनंत गोंधळी यांचे नाव स्पष्टपणे वगळण्यात आल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

काँग्रेसमधून मोठ्या अपेक्षेने शिवसेना (शिंदे गट)मध्ये प्रवेश केलेल्या अनंत गोंधळी यांना अलीकडच्या काळात पक्षांतर्गत अडचणींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा आहे. त्यांना स्वतःची ग्रामपंचायतही राखता न आल्याने त्यांच्या नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. याच पार्श्वभूमीवर त्यांची जिल्हा परिषद उमेदवारी कापण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, गोंधळी यांच्या घटलेल्या राजकीय वजनाचा फायदा घेत आमदार महेंद्र दळवी •> पान २ वर

# न्यायालये बॉम्बने उडविण्याची धमकी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशातील पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधील विविध न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. बॉम्बच्या धमकीने मोठ्या प्रमाणात घबराट पसरली असून न्यायालय परिसर रिकामे करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये उपस्थित न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि नागरिक सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

**जलजीवन योजना कागदावरच | महिलांची पाण्यासाठी वणवण**

# रांजणखार डावली पाण्याविना

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील रांजणखार डावली गावात पाणीटंचाईने भीषण स्वरुप धारण केले असून, गेल्या तीन महिन्यांपासून गावात थेंबभरही पाणी नाही. एकीकडे शासन ‘हर घर नल, हर घर जल’चा गवगवा करत असताना, प्रत्यक्षात मात्र या गावातील महिलांना मैलोन्मैल पायपीट करुन पाणी आणावे लागत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

रांजणखार डावली या गावाला सध्या एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. मात्र, पाईपलाईन फुटली असल्याचे कारण पुढे करत एमआयडीसीने हात झटकले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याआधी आठवड्यातून एकदा पाणी दिले जात होते. मात्र, आता महिनोमहिने पाणीच येत नाही, ही गंभीर बाब आहे.

पाण्याच्या कायमस्वरुपी उपायासाठी शासनाने एक कोटी १४ लाख रुपयांची जलजीवन योजना मंजूर केली होती. •> पान २ वर

> “जलजीवन योजनेचे काम पूर्ण झाले आहे. फक्त वीज कनेक्शन आणि एमआयडीसी लिकेज काढण्याचे काम बाकी आहे. स्थानिक प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.”
>
> – निहाल चवरकर, अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, अलिबाग

> “रांजणखार डावली येथील पाण्याचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून आहे. या गावाला एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. परंतु, गेल्या तीन महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पाईपलाईन फुटली असल्याचे कारण सांगून गावात पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागत आहे. गावात एक कोटी १४ लाख रुपयांची जलजीवन योजना राबविली. परंतु, हे कामही अपूर्ण स्थितीत आहे.”
>
> – **सुरेश माळी, ग्रामस्थ**



# अंबा नदी पुलाजवळ घातक वैद्यकीय कचरा

## ● इंजेक्शन, सुई, सलाईन बाटल्यांनी नागरिक जखमी ●प्रशासनाच्या हलगर्जीपणावर संताप

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

वाकण-पाली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदी पुलाजवळ मोठ्या प्रमाणावर घातक वैद्यकीय कचरा उघड्यावर टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. इंजेक्शन, सलाईन नळ्या, काचेच्या बाटल्या व सुई यांचा ढिगारा आढळून आल्याने परिसरातील शेतकरी व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.

हा कचरा अद्यापही तसाच पडून असून, यामुळे अनेक नागरिक व शेतमजूर जखमी झाले आहेत. एप्रिलच्या अखेरीस व जून महिन्यातही या ठिकाणी अशाच प्रकारे वैद्यकीय कचरा फेकण्यात आला होता. मात्र, वारंवार घटना घडूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



(छायाचित्र : धम्माशील सावंत)

> आमच्या शेतात जाण्याचा हा एकमेव मार्ग आहे. याआधी माजी आई, आत्या आणि अनेक शेतमजुरांना या सुया टोचून दुखापत झाली आहे. उपचारासाठी दवाखान्यात जावे लागले. वारंवार असे प्रकार घडत असताना नगरपंचायत व वैद्यकीय विभागाने कठोर कारवाई केलीच पाहिजे.
> – तुषार ठोंबरे, शेतकरी, पाली

> हा वैद्यकीय कचरा कोणी टाकला याची माहिती घेतली जात आहे. पालीतील सर्व दवाखाने व डॉक्टरांनी वैद्यकीय कचऱ्याचे सुरक्षित व्यवस्थापन करणे बंधनकारक आहे. उघड्यावर वैद्यकीय कचरा टाकणाऱ्यांवर कायद्यानुसार कडक कारवाई केली जाईल.
> – सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली

### स्थानिकांचा रोष

सार्वजनिक ठिकाणी वैद्यकीय कचरा टाकणे म्हणजे थेट नागरिकांच्या आरोग्याशी खेळ आहे, असा आरोप करत ग्रामस्थांनी प्रशासनाच्या हलगर्जीपणावर संताप व्यक्त केला आहे. हा कचरा नेमका कोणत्या दवाखान्यातून आला, याची तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### पर्यावरणावर धोक्यात

वैद्यकीय कचऱ्यामुळे जैवविविधतेलाही धोका निर्माण करू शकतो. जनावरे व लहान मुलांच्या संपर्कात हा कचरा आल्यास जीवितहानीची शक्यता नाकारता येत नाही. अंबा नदी दूषित होण्याचीही भीती व्यक्त होत आहे.

### सार्वजनिक आरोग्य विभगाचा खुलासा

तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी स्पष्ट केले आहे की, हा कचरा प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उपकेंद्राचा नाही. आमच्याकडे वैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जाते.

या परिसरातून शेतकरी, प्रवासी, वाहने तसेच गुरेढोरे सातत्याने ये-जा करतात. शेती, गटार, नाले व थेट अंबा नदीत हा कचरा साठत असल्याने जलप्रदूषणासह संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. इंजेक्शनच्या सुया व काचेच्या बाटल्या पायात घुसून गंभीर दुखापती होत असून, लहान मुले व जनावरांसाठी ही स्थिती अधिक धोकादायक ठरत आहे.

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात**

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१३४२/२०२५

श्री. मंगेश गंगाराम देशमुख,
रा.माणगाव बुद्रुक ता.सुधागड.जि.रायगड — वादी

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत माणगाव बुद्रुक
ता.सुधागड. जि.रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. मंगेश गंगाराम देशमुख, रा.माणगाव बुद्रुक ता. सुधागड जि.रायगड यांनी त्यांची आजी द्रौपदी पांडुरंग देशमुख यांचा मृत्यू दिनांक १२/०५/२०२३ रोजी मौजे माणगाव बुद्रुक ता.सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर द्रौपदी पांडुरंग देशमुख यांच्या मृत्यू नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- १७/१२/२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

# तलाठी कार्यालयांत 'जनमाहिती अधिकारी' फलक गायब

## ● देवव्रत पाटील यांनी प्रशासनाचे टोचले कान



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

शासकीय यंत्रणांनी नागरिकांचे अधिकार दडपण्याऐवजी ते स्पष्टपणे मांडावेत, अशी अपेक्षा असतानाच अलिबाग तालुक्यातील तलाठी कार्यालयांमधील गंभीर बाब समोर आले आहे. कायद्याने तलाठी हे जनमाहिती अधिकारी (आरटीआय) असतानाही त्यांच्या कार्यालयांत यासंदर्भातील कोणताही फलक लावलेला नसल्याने नागरिकांना आपल्या हक्कांची माहितीच मिळत नाही. या पार्श्वभूमीवर अलिबाग तालुक्यातील समाजसेवक देवव्रत विष्णू पाटील यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत ठोस मागणी केली आहे.

देवव्रत पाटील यांनी अलिबाग तहसीलदार कार्यालयात लेखी निवेदन सादर करत नायब तहसीलदार जाधव यांची भेट घेतली. सध्या निवडणूक ड्युटीमुळे ठाणे जिल्ह्यात असलेल्या तहसीलदार विक्रम पाटील यांच्या अनुपस्थितीतही हे निवेदन औपचारिकरित्या दाखल करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अलिबाग तालुक्यातील प्रत्येक तलाठी हा माहिती अधिकार कायद्यानुसार जनमाहिती अधिकारी आहे. मात्र, त्यांच्या कार्यालयात 'जनमाहिती अधिकारी' असा फलक नसल्यामुळे नागरिकांना माहिती अधिकाराबाबत अज्ञानात ठेवले जाते. हे प्रकार लोकशाही मूल्यांना बाधक असून, तात्काळ सर्व तलाठी कार्यालयांत स्पष्ट फलक लावावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

देवव्रत पाटील हे अलिबाग तालुक्यातील समाजसेवक म्हणून ओळखले जातात. नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देत त्यांनी यापूर्वीही माहिती अधिकाराच्या माध्यमातून प्रशासनातील अनेक त्रुटी उघड केल्या आहेत. त्यांच्या या मागणीमुळे तलाठ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नागरिकांचे सेवक म्हणून तलाठ्यांनी पारदर्शक, कायदेशीर आणि जबाबदार कामकाज करणे आवश्यक आहे; अन्यथा अशा समाजसेवकांच्या आवाजामुळे प्रशासनावर दबाव वाढतच राहील, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# रोजगाराच्या प्रतीक्षेत तरुण

**सुधागड :** सुधागड तालुका हा आदिवासीबहुल असूनही, गेल्या काही वर्षांत येथे अनेक औद्योगिक कंपन्या उभ्या राहात आहेत. ही विकासाची जमेची बाजू असली तरी तालुक्यातील तरुण बेरोजगारीच्या गर्तेत अडकले आहेत. विशेषतः आदिवासी समाजातील तरुणांना रोजगाराच्या शोधात तालुक्याबाहेर, अगदी कर्नाटकातील कोळसा खाणींपर्यंत स्थलांतर करावे लागत आहे. ही बाब केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही गंभीर आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकून उद्योगांना जागा उपलब्ध करून दिली. परिणामी, अनेक ग्रामपंचायतींमध्ये कंपन्यांचे काम सुरू झाले आहे. मात्र, या कंपन्यांमध्ये आपल्या तालुक्यातील तरुणांना रोजगार मिळतोय का, यावर अजूनही प्रश्नचिन्ह आहे. रोजगाराच्या अभावामुळे स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांची मुले शिक्षणापासून वंचित राहात आहेत, ही बाब अधिक वेदनादायक आहे.

---

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत विद्यमान मालकांकडून त्यांच्या सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे. | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग | १६६/१९०/ १९६/१९७/ १९८/१६ | ४-५०-०० | ४५.०० | श्री.अक्षय संतोष वाकडे<br>श्री पीयुष संतोष वाकडे |

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्यानेही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :०८/०१/२०२६

**ॲड. महेश श्रीवर्धन म्हात्रे**
ऑफीस नं. १, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग
मो. नं. - ९२२६८४७०७७

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, विकसन करार, भाडेकरार, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, भागीदारीचे हक्क, रस्तावहीवाटीचे हक्क, वडीलोपार्जित वारसाहक्क, कौटुंबिक व्यवस्थापनेचे व वाटपाचे हक्क, पोटगीचे हक्क, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा न्यायालयाचे हुकुमनामा, न्यायालयाचे अंतरिम आदेश, ॲवॉर्ड, लिसपेंडेन्सी असल्यास आणि अथवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.- आर. पॉ. | रुपये | पैसे |
| १) उर्वी उमेश मिसाळ<br>२) मानस सौदान हुलगे<br>३) स्नेहल उमेश मिसाळ | ९० | १ | ००-४९-०० | ८ | ६९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला,
साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक
(अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड

सही/-
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक : ०९/०१/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| काशिनाथ विष्णु मते | ३९ | ३ | १-१४-०० | ३ | ७३ |
| | यापैकी विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ५० पॉ ०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ०९/०१/२०२६

---

**जाहीर नोटीस**

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमीन मिळकतीचे मालक यशवंत नारायण जोगळे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे अंजप ता. कर्जत जि. रायगड | ८०/३ | ०.७०.१० यापैकी ०.२५.०० | १.४८ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असले तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ९/१/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो. चिंचवळी, ता. कर्जत
जि. रायगड
मो.नं. ९०४९४८६८०५

---

**जाहीर नोटीस**

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमीन मिळकतीचे मालक विक्रांत विरेंद्रकुमार अग्रवाल व कैवल्या विरेंद्रकुमार अग्रवाल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ ता. कर्जत जि. रायगड | ७/१/अ | ०.२२.३० | १.३६ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असले तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ९/१/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो. चिंचवळी, ता. कर्जत
जि. रायगड
मो.नं. ९०४९४८६८०५

---

## पान १ वरून

### फेटाळलेल्या उमेदवारी अर्जांवर आज सुनावणी

मधील निवडणूक निर्णय अधिकारी तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या महापालिका आयुक्तांनी अनेक उमेदवारांचे अर्ज विविध कारणास्तव फेटाळले होते. हे अर्ज सत्ताधारी पक्षाला लाभ मिळावा, या उद्देशानेच रद्द करण्यात आल्याचा संशय याचिकाकर्त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी देण्यात आलेली केवळ सात दिवसांची मुदत अपुरी व अन्यायकारक असल्याचा दावाही याचिकेत करण्यात आला आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर याचिका सादर होताच न्यायालयाने तातडीच्या सुनावणीस सहमती दर्शवून प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध केले. बहुतांश उमेदवारांचे अर्ज प्रतिज्ञापत्रे किंवा प्रश्नोत्तर पत्रके योग्य स्वरूपात नसणे, तसेच पोलीस, पाणी, कर, मलनिस्सारण आणि मालमत्ता अशा पाच विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) सादर न केल्याच्या कारणावरून फेटाळण्यात आले. मात्र पाणी, मालमत्ता कर आणि बांधकाम प्रस्ताव यांसारखे विभाग थेट महानगरपालिकेच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असल्याने अशा एनओसीची मागणी मनमानी, अवाजवी आणि संविधानातील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी असल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे.विरोधी पक्षांच्या उमेदवारांना मुद्दाम ना-हरकत प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब लावून राजकीय कटकारस्थान रचले जाण्याची शक्यताही याचिकेत व्यक्त करण्यात आली आहे. आता या प्रकरणावर शुक्रवारी होणाऱ्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रांजणखार डावली पाण्याविना

टाकी, विहीर आणि पाईपलाईनचे काम सुरू करण्यात आले. मात्र, नेहमीप्रमाणे 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी अवस्था या योजनेची झाली आहे. योजना अद्याप अपूर्ण अवस्थेत असून, प्रत्यक्षात ती बारगळली असल्याचे चित्र आहे.

अडीच हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या या गावातील ग्रामस्थ गेली चार वर्षे शासनाचे उंबरठे झिजवत आहेत. आश्वासनांखेरीज काहीच मिळाले नाही. संतप्त ग्रामस्थ व महिलांनी यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले. त्यानंतर काही दिवस पाणी आले, मात्र पुन्हा 'नव्याचे नऊ दिवस' सुरू झाले आहेत.

गावात पाणी पोहोचत नसल्याने महिलांवर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे. लहान मुले, वृद्ध आणि आजारी नागरिकांचे हाल होत असून, प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप होत आहे. या गावाला सध्या एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. मागील काही महिन्यांपासून आठवड्यातून एक वेळा पाणीपुरवठा केला जात होता. आता महिनोमहिने पाणी गावात पोहोचत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाच्या या गलथान कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त होत असून, तात्काळ उपाययोजना न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### महाराष्ट्र पुन्हा गारठणार

नंदुरबार आणि अहमदनगर जिल्ह्यांत थंडी अधिक कडक राहण्याचा अंदाज आहे. काही ठिकाणी किमान तापमान १० अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांनी पिकांच्या संरक्षणासाठी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांत कोरडे हवामान राहील. येथे सकाळी धुके आणि रात्री गारठा जाणवेल. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांतही थंडीचा कडाका कायम राहणार आहे.

एकूणच, राज्यात पावसाचा अंदाज नसला तरी वाढत्या थंडी आणि धुक्यामुळे जनजीवनावर परिणाम होऊ शकतो. ज्येष्ठ नागरिक, प्रवासी आणि शेतकऱ्यांनी गरम कपडे वापरण्यासह आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे.

### पश्चिम घाटाचा रक्षक हरपला!

कोपामुळे होणाऱ्या दुर्घटना पाहता, गाडगीळ यांनी दिलेला इशारा किती अचूक होता, याची प्रचिती येते.

हार्वर्ड विद्यापीठापासून ते भारत सरकारच्या उच्च पदस्थ समित्यांपर्यंत त्यांचा प्रवास थक्क करणारा होता. तरीही, त्यांनी नेहमीच स्वतःला 'लोकांचा शास्त्रज्ञ' मानले. लोकांच्या सहभागाशिवाय पर्यावरण रक्षण होऊ शकत नाही, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाने त्यांना २०२४ मध्ये 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले होते. वैज्ञानिक शिस्त आणि सर्वसामान्य माणसाचा विकास यांचा समतोल कसा साधावा, याचा आदर्श त्यांनी आपल्या कामातून घालून दिला. त्यांच्या निधनामुळे पर्यावरण क्षेत्रातील एका सुवर्णकाळाचा अंत झाला आहे.

### १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीराभाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरजकुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### डोंगर पोखरुन माती तस्करी

टाकून जमीन सपाटीकरणाचे काम सुरू आहे. सुरुवातीला भिसेगाव येथून माती आणली जात होती. मात्र, या ठिकाणी माती उत्खननासाठी शासनाचे स्वामित्व शुल्क रॉयल्टी पूर्णपणे भरली जात नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्यानंतर नवीन ठिकाणांवरुन माती काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील कर्जत दिशेकडे रेल्वेकडून कारशेड उभारले जात आहे. मध्य रेल्वे २०२१ मध्ये वसई विरार भागात कारशेड उभे राहिल्यानंतर कर्जत मार्गावर नवीन कारशेड उभारण्यास मंजुरी दिली आहे. मध्य रेल्वेवरील सर्वात मोठे कारशेड बनणार असून, साधारण सात ते आठ किलोमीटर अंतरात हे नवीन कारशेड असणार आहे. या कारशेड चे कामाला सुरुवात झाली असून, मातीचा भराव टाकून जमीन सपाट करण्याचे काम केले जात आहे.

मात्र, त्या कामासाठी बाहेरून आणली जाणारी माती सध्या चर्चेचा विषय बनली आहे. सध्या भिसेगाव भागातून माती आणली जात असून, दररोज शेकडो ब्रास माती तेथे टाकण्यात येत आहे. मात्र, बाहेरून उचलल्या जाणाऱ्या मातीसाठी शासनाच्या महसूल विभागाला स्वामित्व शुल्क म्हणजे रॉयल्टी भरावी लागते. परंतु, भिसेगाव येथील मातीच्या खोदकामाला जेमतेम रॉयल्टी महसूल विभाग भरली असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे शासनाचा महसूल बुडवून रेल्वेच्या कामासाठी मातीचा भराव टाकला जात आहे. कारशेडसाठी दररोज माती घेऊन येणाऱ्या ट्रकसाठी खास रस्ता बनविण्यात आला आहे, त्याच रस्त्यासाठी काहीशे ब्रास माती लागली आहे.

भिसेगाव येथून काढली जाणारी माती हि अल्प रॉयल्टी भरून कारशेडचे ठिकाणी आणली जात होती आणि त्यामुळे शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. त्यानंतर आता डिकसळ येथील डोंगर फोडून माती काढली जात असून, लोणावळा येथील ट्रक ती माती डिकसळ डोंगर येथून सावरगाव अशी वाहतूक करीत आहेत. या वाहतुकीस माती खोदकाम ज्या ठिकाणी केली जात आहे, त्या डोंगराच्या मागील बाजूस पाली-भूतीवली धरण शासनाने दीडशे कोटी रुपये खर्चून बांधले आहे. त्यामुळे धरणाच्या डोंगरात खोदकाम करून धरणाच्या जलाशयाला धोका निर्माण झाला आहे. त्याचवेळी माती ज्या ठिकाणावरून काढून वाहतूक केली जात आहे, त्या मातीबाबतदेखील स्थानिक शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला आहे. त्याचवेळी शासनाला रॉयल्टी भरली आहे काय? हेदेखील गुलदस्त्यात असून, शासनाचा कर बुडवून माती उत्खनन केली जात असल्याचा आरोप केला जात आहे. महसूल विभाग याबाबत काही हालचाली करणार आहे काय? असा सवाल स्थानिक चिंचवली गावातील शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

मध्य रेल्वे कारशेडसाठी उचलण्यात आलेल्या मातीसाठी स्वामित्व शुल्क भरुन घेतले जात आहे. स्वामित्व शुल्क भरलेले नसेल, तर त्या ठेकेदाराचे बिल रेल्वेकडून दिले जात नाही. आणि, त्यामुळे आमचे महसूलचे कर्मचारी त्या माती उत्खनन आणि भरावाबाबत सतर्क आहेत, अशी माहिती कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी दिली.

### आमदारांनी अनंत गोंधळींना नाकारले

आपल्या पसंतीचा उमेदवार पुढे आणण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या निर्णयामुळे शिंदे गटातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा समोर आले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षातील गटबाजी अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या निर्णयावर अनंत गोंधळी यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नसली तरी तालुक्यातील त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. काही पदाधिकाऱ्यांनी या निर्णयामुळे पक्ष संघटनात्मक पातळीवर अस्वस्थता निर्माण होऊ शकते, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

---

**जाहीर निविदा**

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता. माणगाव, जि. रायगड** — **दिनांक ०७/०१/२०२६**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड**
**१५ वा वित्त आयोग अंतर्गत विकास कामांची व साहित्यांची निविदा खालीलप्रमाणे**

| अ. क्र | कामाचे नाव/साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुठवली तर्फे तळे येथे चावडी जवळ सार्वजनिक शौचालय बांधणे. | ५१२३५/- | २००/- | ५१२/- | १५/०१/२०२६ सायं ०६:१५ वा | १६/१/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| २ | उमरोली- दिवाळी येथे अंतर्गत रस्ता करणे. | ६६८२४/- | २००/- | ६६८/- | १५/०१/२०२६ सायं ०६:१५ वा | १६/१/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ३. | ग्रामपंचायत हद्दीतीमध्ये शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत करिता स्वच्छतेविषयी साहित्य पुरविणे. | ५००००/- | - | - | १५/०१/२०२६ सायं ०६:१५ वा | १६/१/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |
| ४. | मुठवली तर्फे तळे आदिवासीवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे. | ५६०७६ | २००/- | ५६१/- | १५/०१/२०२६ सायं ०६:१५ वा | १६/१/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :**
१. सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली /तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली /तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली /तळे, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातुल शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही /-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

सही /-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

## निवडक

### रिक्षाच्या धडकेत दुचाकी स्वाराचा मृत्यू

**पनवेल** : एका भरधाव रिक्षा चालकाने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरात धडक दिली. या धडकेत दुचाकी स्वाराचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोली येथील दत्तू पाटील (५०) हे घणसोली येथील अशोक लेंगरे (४२) यांच्यासह कळंबोली सर्कल ते टी पॉईंट जंक्शनकडे जाणाऱ्या रस्त्याने दुचाकीवर जात होते. त्यावेळी एका रिक्षा चालकाने रिक्षा भरधाव वेगाने चालवुन समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिली. हि धडक इतकी जबरदस्त होती कि दुचाकीचालक अशोक लेंगरे यांचा जागीच मृत्यू झाला. तर, दत्तू पाटील यांच्या डाव्या पायाचे हाड मोडले. याप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सोनसाखळी खेचून चोरटे पसार

**पनवेल** : तालुक्यात पायी चालणाऱ्या व बसथांब्यावर उभ्या असणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्यांना चोरटे लक्ष्य करत आहेत. खारघर येथील फिटनेस जिमसमोर उभ्या असलेल्या एका व्यक्तीची सोनसाखळी दुचाकीस्वारांनी जबरदस्तीने खेचण्याची घटना घडली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर प्रभाग १० येथील फिटनेस फॅक्टरी जिमच्या गेटवर ३८ वर्षीय तरुण उभा होता. त्याचवेळी काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवरून दोन व्यक्ती त्याच्या पाठीमागून आले. दोघांचेही तोंड मास्कने झाकलेले होते, तर डोक्यावर टोपी घातलेली होती. या दोघांनी पीडित तरूणाला धाक दाखवून त्याच्या गळ्यातील सोन्याची साखळी जबरदस्तीने खेचून घेतली व घटनास्थळावरून पसार झाले. सुमारे साडेतीन लाख रुपये किंमीची चेन असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

### उरण तालुक्यात बिबट्याचा वावर

**उरण** : तालुक्यातील रानसई व बारापाडा जंगल परिसरात बिबट्याचा वावर हा चलचित्रीकरण कॅमेऱ्यात आढळला आहे. त्यामुळे या परिसरात वन विभागाने सुरक्षिततेसाठी बॅंनर बाजी करुन गस्त सुरू केली आहे.तसेच, परिसरातील नागरिकांना दक्ष राहण्याच्या सूचना वन विभागाने दिल्या आहेत. मात्र, मागील वर्षा प्रमाणे याही वर्षी बिबट्याचा वावर आढळल्याने नागरीकांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे. जंगल परिसरात वाढते अतिक्रमण, सतत लागणारे वणवे यामुळे वन्यप्राणी हे अन्नाच्या शोधात नागरीवस्तीत येऊ लागले आहेत. त्यातच उरण तालुक्यातील रानसई, बारापाडा जंगल परिसरात बिबट्याचा वावर हा चलचित्रीकरण कॅमेऱ्यात आढळल्याने नागरिकांनी दक्ष राहण्याच्या सूचना वन विभागाने दिल्या आहेत. मात्र, मागील वर्षा प्रमाणे याही वर्षी बिबट्याचा वावर आढळल्याने रानसई ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी नागरीकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाली आहे.रानसई ही ग्रामपंचायत आदिवासी बांधवांची लोक वस्ती असलेली ग्रामपंचायत आहे. येथील नागरीकांचे उपजीविकेचे साधन हे जंगल आहे. आणि अशा जंगल परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने नागरीकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी, आदिवासी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा आणि त्या बिबट्याला जेरबंद करण्यात यावे, अशी मागणी सरपंच राधा पारधी यांनी केली आहे.

### खारगाव खुर्द येथील बैल चोरीला

म्हसळा : तालुक्यातील खारगाव खुर्द येथील सकलप परिसरात शेतकरी चंद्रकांत कांबळे यांच्या मालकीचा चोरल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी त्यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रकांत कांबळे यांनी आपला बैल नेहमीप्रमाणे जंगल परिसरात चरण्यासाठी सोडला



होता. परंतु, सायंकाळी तो गोठ्यात दावणीला परत न आल्याने शोधाशोध सुरू करण्यात आली. मात्र, सात दिवस उलटून गेले तरी बैल सापडला नसल्याने तो कोणीतरी चोरून नेल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विशेष म्हणजे चंद्रकांत कांबळे यांच्या मालकीची गुरे चोरीला जाण्याची ही मागील काही कालावधीतील सातवी घटना असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, म्हसळा नगरपंचायतीच्यावतीने शहर परिसरात मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारण्यात आले आहे. त्या आधारे म्हसळा पोलिसांनी सखोल तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण

**सोगाव** : अलिबाग तालुक्यातील मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील मुनवली व टाकादेवी या गावातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण कामाचे मंगळवारी (दि.६) माजी सरपंच सुनिल थळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच सुनिल थळे यांच्यासह लाईक कप्तान, ॲड. दिनेश सोष्टे, राजेंद्र घरत, सूचित थळे, संकेत कवळे, सागर दळवी, कल्पेश पांडव, सतिश घाडी, सचिन घाडी, मनिष खाडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोकणातील पहिले ‘फार्मर कप’ शिबीर

- तीन दिवसीय रहिवासी प्रशिक्षण
- पन्नास शेतकऱ्यांचा सहभाग

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पाणी फाऊंडेशन, रायगड जिल्हा कृषी विभाग, आत्मा विभाग व उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने ‘फार्मर कप २०२६’ अंतर्गत कोकण विभागातील पहिल्या तीन दिवसीय रहिवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप बुधवारी (दि.७) माणगावातील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या सभागृहात उत्साही वातावरणात पार पडला. या प्रशिक्षण शिबिरात एकूण ५० महिला व पुरूष शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

‘फार्मर कप २०२६’ ही स्पर्धा पाणी फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. याचा उद्देश राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये शेती उत्पादन वाढवणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे हा आहे. या स्पर्धेत यंदा रायगड जिल्ह्यानेही सहभाग घेतला असून स्पर्धा जिंकण्यासाठी शासन व शेतकऱ्यांनी कंबर कसली आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्याची प्रथम निवड करून एकूण ५० महिला व पुरूष शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. हे शिबीर दि.५ ते ७ जानेवारीदरम्यान पार पडले. शिबिराच्या माध्यमातून



शेतकऱ्यांना गट शेती व स्मार्ट शेती या संकल्पनेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले.

मार्गदर्शन करताना सुनील बोरकर यांनी, शेती क्षेत्रातील बदल स्वीकारण्याची गरज अधोरेखित केली. कायम शिकण्याची भूमिका ठेवणारा, नवीन बदल स्वीकारणारा आणि एकत्र येऊन शेती करणाराच यशस्वी होतो. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून शेतीत प्रयोगशीलता ठेवली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. पाणी फाऊंडेशन शेतकऱ्यांमध्ये उत्साह आणि आशा निर्माण करण्याचे कार्य करत असून, अशा प्रशिक्षणातून शेती क्षेत्राला नवी दिशा मिळत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तसेच, त्यांनी विविध उदाहरणे व बोधकथांच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

यावेळी आत्मा विभाग संचालक सुनील बोरकर, ठाणे विभागीय कृषी सहसंचालक शिवाजी आमले, पाणी फाऊंडेशनकडून प्रमुख मार्गदर्शक नामदेव ननावरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे व उमेद जिल्हा व्यवस्थापक सिद्धेश राऊळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

#### रायगड जिल्ह्याचा सहभाग

‘फार्मर कप २०२६’ ही स्पर्धा पाणी फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. याचा उद्देश राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये शेती उत्पादन वाढवणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे हा आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यानेही यावर्षी सहभाग घेतला असून स्पर्धा जिंकण्यासाठी शासन व शेतकऱ्यांनी कंबर कसली आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्याची प्रथम निवड करून एकूण ५० महिला व पुरूष शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.



## साखळी उपोषणाला वाढता पाठिंबा

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

कोलाड येथील मुंबई-गोवा महामार्गाच्या कामातील त्रुटींमुळे येथील स्थानिक नागरिक आणि व्यापारी त्रस्त असून, त्यांनी प्रशासनाच्या विरोधात साखळी उपोषण सुरू केले आहे. या साखळी उपोषणाचा गुरूवारी (दि.८) चौथा दिवस असून या उपोषणाला जनतेचा वाढता पाठिंबा मिळत आहे. जो पर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तो पर्यंत उपोषण कायम राहणार असल्याचे उपोषण कर्त्यांनी सांगितले.

या उपोषणाला आंबेवाडीचे माझी सरपंच सुरेख महाबले, चंद्रकांत लोखंडे, दयाराम पवार, समीर महाबले, महेंद्र वाचकवडे, चंद्रकांत जाधव, विजय बोरकर, कुलदीप सुतार, संजय कुर्ले, विष्णू महाबले, विश्वास बागुल, उदय खामकर, मंगेश सरफळे, गणेश शिंदे व दगडू हटकर आदींसह कोलाड, आंबेवाडी, वरसगाव परिसरातील नागरिक सहभागी झाले आहेत.तर, या साखळी उपोषणाला कोलाड रिक्षा संघटना, मिनीडोर संघटना व व्यापारी संघटनांसह विविध पक्षातील राजयकीय नेत्यांनी पाठिंबा दिला आहे. उपोषण कर्त्यांनी आंबेवाडी, वरसगांव व कोलाड येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला २०० मिटर अंतरावर अंडरपास बोगदे देण्यात यावे, सर्विस रोडचे काम पूर्ण करून देणे, गटारावरील झाकणे बसवून देण या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे लाक्षणिक उपोषण आंबेवाडी येथे सुरू केले आहे. साखळी उपोषणचा चौथा दिवस उजाडला तरी प्रशासनाने दखल न घेतल्याने उपोषण करते व स्थानिक नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## दुर्मिळ कस्तुरी मांजराचा मृत्यू

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील मोर्बा रस्त्याच्या मध्यभागी बुधवारी (दि.७) सकाळच्या सुमारास एक दुर्मिळ कस्तुरी मांजर (सिव्हेट) रस्ता ओलांडत असताना चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना गोद नदी पुलाच्या अलिकडे



घडली. दरम्यान, रस्त्याच्या कडेला पडलेला हा प्राणी पाहून काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. काही नागरिकांनी अज्ञानामुळे त्याला वाघाचा बछडा समजून भीतीपोटी पळ काढला. मात्र, नंतर जाणकारांनी पाहणी केल्यानंतर हा प्राणी कस्तुरी मांजर असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. मात्र, तोपर्यंत एका निरुपद्रवी वन्यजीवाचा प्राण गेला.

## बागमळा येथे विकासकामांचे उद्घाटन

### सरपंच हर्षदा मयेकर यांची प्रमुख उपस्थिती



**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागावमधील बागमळा परिसरात नागाव ग्रामपंचायतीच्यावतीने विविध विकासकामांचे उद्घाटन व शुभारंभ कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजता बागमळा येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सरपंच हर्षदा मयेकर यांची या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात बागमळा सार्वजनिक व्यायामशाळेच्या नवीन इमारतीचा शुभारंभ करण्यात आला. तसेच, बागमळा शाळेकडे जाणाऱ्या बाजूचा रस्ता नूतनीकरण, बागमळा शाळेची दुरुस्ती व रंगरंगोटी तसेच डिजिटलकरणाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सरपंच हर्षदा मयेकर यांच्यासह माजी सरपंच नंदकुमार मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, माजी उपसरपंच संदेश नाईक, विद्यमान सदस्य रोहन नाईक, माजी उपसरपंच संतोष घरत व माजी पंचायत समिती सदस्य उदय काठे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन सरपंच हर्षदा मयेकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ व ग्रामपंचायत नागाव यांनी केले. या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांनी मूलभूत सुविधा उपलब्ध होणार असून, शिक्षण, आरोग्य व दळणवळण क्षेत्रात सकारात्मक बदल घडणार आहे. दरम्यान, गावातील मुलांच्या शारीरिक तंदुरुस्ती व आरोग्याच्या दृष्टीने माजी सरपंच निखिल मयेकर यांच्या पुढाकारातून बागमळा परिसरात नवीन सार्वजनिक व्यायामशाळेची उभारणी करण्यात येत आहे. या व्यायामशाळेमुळे मुलांना नियमित व्यायामाची सवय लागणार असून, त्यांचा शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत होणार असल्यामुळे ग्रामस्थांसह तरुणांनी निखिल मयेकर यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. दरम्यान, उपस्थित मान्यवरांनी ग्रामविकासासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले.

## एक किलो गांजा हस्तगत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील साईबाबा मंदीराजवळ पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करत १ किलो १५८ ग्रॅम वजनाचा गांजासह १० लाख ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल शहरातील साईबाबा मंदीराजवळ सागर जोसेफ (२५) हा २ लाख ३१ हजार ६०० रुपये किंमतीचा १ किलो १५८ ग्रॅम वजनाचा गांजा बेकायदेशिररित्या ताब्यात बाळगताना पनवेल शहर पोलिसांना सापडला. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी सागर जोसेफ तसेच घटनास्थळावरून पळून गेलेला त्याचा भाऊ आकाश जोसेफ या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

## फन फेअर, पॅरेन्टस् इव्हिनिंगचा जल्लोष

**। उरण । प्रतिनिधी ।**

यु.ई.एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज, कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये बुधवारी (दि.७) फन फेअर व पॅरेन्टस् इव्हिनिंग मोठ्या जल्लोषात व अभूतपूर्व गर्दीत साजरा झाला. यु.ई.एस.च्या भव्य पटांगणात विविध खाद्य पदार्थांचे व खेळांचे स्टॉल्स लावलेले होते, त्यापैकी पहिल्या स्टॉलला बांधलेली फित कापून यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनी फन फेअर व पॅरेन्टस् इव्हिनिंगचे उद्घाटन केले.

फन फेअरची सुरुवात झाल्यानंतर यु.ई.एस.चे मैदान लोकांच्या तुफान गर्दीने फुलून गेले होते. यावेळी फन फेअर सोबतच पॅरेन्टस् इव्हिनिंगच्या कार्यक्रमामध्ये पूर्व प्राथमिक विभागाच्या बाल विद्यार्थ्यांनी तीन आकर्षक समूह नृत्य सादर केले. पीटीए सदस्यांकडून जिल्हास्तरिय



विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रथम पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा, मार्गदर्शक शिक्षकांचा आणि इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व पर्यवेक्षिकांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर शिक्षकांनी व उपस्थित पालकांपैकी काहींनी आकर्षक असे एकल, युगुल, समुह नृत्य, बासरी वादन व सदाबहार गाणी सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. पॅरेन्टस् इव्हिनिंगमध्ये आपली कला सादर करणाऱ्यांना तसेच उत्कृष्ट स्टॉल धारकालाही चंद्रकांत ठक्कर यांच्या हस्ते भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## प्लास्टिक बंदी समर्थनार्थ जनजागृती रॅली

**। रोहा । प्रतिनिधी ।**

प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने रोहा-अष्टमी नगरपरिषदेच्यावतीने शुक्रवारी (दि.९) जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत नगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभणार असून शहरातील नागरिकांना प्लास्टिकमुक्त जीवनशैलीकडे वळवण्यासाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

नगरपरिषदेच्यावतीने यापूर्वी वितरित करण्यात आलेल्या पत्रकांद्वारे या रॅलीसंदर्भात सर्व संबंधितांना आवाहन करण्यात आले आहे. रॅलीची सुरुवात सकाळी साडेनऊ वाजता राम मारुती चौक येथून होणार आहे. ही रॅली राममारुती चौक, तीनबत्ती नाका, दमाखाडी येथील सागर डेअरी, छत्रपती शिवाजी नगर या मार्गाने मार्गक्रमण करणार आहे. तसेच, सकाळी साडेदहा वाजता अष्टमी नाका येथून दुसऱ्या रॅलीस प्रारंभ होणार आहे. प्लास्टिकला ‘नाही’ म्हणत हरित आणि सुरक्षित भविष्यासाठी एकत्र पाऊल उचलण्याचा संदेश या रॅलीतून देण्यात येणार आहे. या जनजागृती रॅलीमध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे यांनी केले आहे.

## मोबाईल टॅबसह रकमेची चोरी

**पनवेल** : चिरंजिव वेदक यांचे पनवेल शहरात विरूपक्ष मंदीरासमोर त्रिमुर्ती पार्टी शॉप आहे. त्यांचे दुकान बंद असलेले पाहून चोरट्याने दुकानाचे शटर तोडून लाकडी टेबलचे लॉक उचकटुन त्यामधील २ मोबाईल टॅबसह रोख रक्कम चोरली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तीन दिवसांपासून वाहतुकीसाठी बंद | चालकांना पर्यायी मार्गांचा अवलंब

# नेरळ येथील फाटक दुरुस्तीचे काम प्रगतीवर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या नेरळ रेल्वे स्थानकाच्या पुढे रेल्वे फाटक आहे. या रेल्वे फाटकाच्या दुरुस्तीचे काम गेल्या तीन दिवसांपासून सुरु असून वाहतुकीसाठी हे फाटक बंद आहे. त्यामुळे वाहन चालकांना पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागत आहे. दरम्यान, रेल्वे फाटकातील दुरुस्तीची कामे वेगाने सुरु असून आज (दि.९) फाटक वाहतुकीसाठी उघडले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



मुंबई-पुणे मार्गावरील नेरळ रेल्वे स्थानक ते भिवपुरी रोड रेल्वे फाटक येथील रेल्वे क्रॉसिंग गेट क्रमांक २१ हे ६ जानेवारीपासून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहे. नेरळ रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेले हे फाटक नेरळ पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणारे फाटक आहे. या फाटकातून दररोज किमान ५ हजार वाहनांची ये-जा सुरु असते. त्यात अवजड वाहनांची देखील मोठ्या प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे या फाटकातील रेल्वे मार्गिका आणि ट्रॅकमधील खडी खचण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे दरवेळी नेरळ स्थानकाजवळ असलेले हे रेल्वे फाटक दुरुस्तीसाठी बंद करावे लागते. दरम्यान, ६ जानेवारीपासून हे रेल्वे फाटक सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. त्यामुळे गेल्या तीन दिवसांपासून मात्र, हे फाटक बंद असल्याने वाहनांच्या येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. त्यात वाहनांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. त्यासाठी नेरळ पूर्व भागातील वाहनचालकांना नेरळ पश्चिम भागात जाण्यासाठी आंबिवली येथील रेल्वे फाटक क्रमांक २२ किंवा दामत येथील रेल्वे फाटक क्रमांक २० येथून जावे लागत आहे. त्यात या दोन्ही फाटकाकडे जाणारे रस्ते खड्डेमय बनले आहेत. त्यात या पर्यायी मार्गांचा अवलंब करण्यासाठी इंधनाचा अतिरिक्त वापर होत आहे.

दरम्यान, या फाटकाचे काम प्रगतीपथावर असून या तीन दिवसांच्या काळात त्या ठिकाणी रुळाखालील खडी बदलण्याचे, पेव्हर ब्लॉक टाकण्याचे आणि रेल्वे मार्गिकेच्या बाजूला डांबरीकरण करण्याचे काम सुरू आहे. तीन दिवसांच्या मुदतीत हे काम पुर्ण करण्याचा दावा रेल्वे प्रशासनाने केला होता. त्यामुळे आज (दि.९) हे फाटक बंद होऊन तीन दिवस पुर्ण होत आहेत. त्यामुळे आज हे फाटक पुर्ववत चालु करण्यात येईल, अशी शक्यता वर्तविली जात आहे.




# भाजपा 'नाही त्यातली'?

गेल्या पाच वर्षांपासून महाराष्ट्राचे राजकारण असे काही रंग दाखवते आहे की, सामान्य माणसांची मती गुंग व्हावी. किंवा, त्यांना या राजकारणाचा तिटकारा यावा. ज्या एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या निषेधार्थ एकेकाळी राजीनामा दिला होता तेच आज मोदी आणि शाह यांच्या जवळचे होऊन बसले आहेत. दुसरीकडे अजित पवारांवर नरेंद्र मोदींनी आदल्या दिवशी भ्रष्टाचाराचे आरोप केले आणि दोनच दिवसात दादा सत्तेत उपमुख्यमंत्रिपदी जाऊन बसले. यंदाच्या पालिका निवडणुकीच्या पूर्वी तर पक्षांतरे, युत्या आणि आघाड्या यांची भयानक समीकरणे पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी सकाळी एका पक्षाच्या मेळाव्याला हजेरी लावलेले नेते वा उमेदवार संध्याकाळी दुसऱ्याच पक्षात दिमाखात दाखल होतात. बहुतेकदा हा संध्याकाळचा दुसरा पक्ष म्हणजे भाजपच असतो. राज्य सरकारात सत्तेत बसलेले तीन पक्ष एकमेकांच्या जिवावर उठल्याचे नगरपालिका निवडणुकीत दिसले. आता याचा दुसरा अंक सुरू झाला आहे. निवडणुकीनंतर ज्या ठिकाणी एखाद्या पक्षाला निर्विवाद बहुमत मिळालेले नाही तिथे तमाम विरोधकांना एकत्र घेऊन विकास आघाडी स्थापन करायची आणि सत्ता ताब्यात घ्यायची असे प्रकार चालू झाले आहेत. यातून अंबरनाथमध्ये भाजप आणि काँग्रेसची युती झाली, तर अकोला जिल्ह्यातील अकोटमध्ये भाजप आणि एमआयएमची आघाडी झाली. याबाबत ओरडा झाल्यानंतर काँग्रेसने अंबरनाथच्या आपल्या नगरसेवकांवर कारवाई केली. तर भाजपवाले एमआयएमसोबत गेल्याचे दिसले तर देशभरात तोंड दाखवणे शक्य होणार नाही हे लक्षात येताच तिथल्या भाजपच्या नेत्यांना नोटिसा काढण्यात आल्या. ही तोंडदेखली कारवाई आहे की कसे हे काही दिवसांनंतरच कळेल. पण यामुळे भाजप किंवा एम आयएम यासारख्या पक्षांची विचारसरणी, तत्वे, भूमिका या निव्वळ कचकड्याच्या असतात हे पुन्हा एकदा दिसून आले. याविषयी फारच बोंब झाली व महापालिका निवडणुकांवरही याचा परिणाम होईल म्हणून कारवाई केल्याचे दाखवून प्रकरण दडपण्यात आले आहे. पण त्यामुळे भाजपचा दांभिकपणा लपण्यासारखा नाही.

### घाबरट काँग्रेसवाले

अंबरनाथ नगरपालिकेत एकूण ६७ जागा आहेत. त्यात वास्तविक शिंदे सेना हा २७ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष ठरला होता. पण कोणत्याही स्थितीत त्याला सत्तेत येऊ द्यायचे नाही यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण इरेला पडले होते. अंबरनाथ व उल्हासनगर येथे फोडाफोडी करून भाजपमध्ये प्रवेश करून घेण्यावरूनच एकनाथ शिंदे संतापले होते व त्यांनी अमित शाह यांची भेट घेतली होती. देवेंद्र फडणवीस व चव्हाण यांची मुंबईसह सर्व महापालिका स्वबळावर लढण्याची इच्छा होती. पण शिंद्यांच्या तक्रारीनंतर अमित शाह यांचा दट्ट्या आला आणि शिंदे यांना मुंबई व ठाण्यात सोबत घ्यावे लागले. पण ठाणे जिल्ह्यात शिंदे यांचा काटा काढण्याचे चव्हाण यांचे उपद्व्याप चालू आहेतच. त्यानुसार, अंबरनाथमध्ये सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजप आणि काँग्रेस अशी अशक्यप्राय वाटणारी युती करण्यात आली. भाजप –१४, काँग्रेस– १२, राष्ट्रवादी– ४, अपक्ष– १ अशा लोकांनी एकत्र येत सत्ता स्थापण्याचे ठरवले. मात्र याचा गवगवा झाल्यावर आम्ही नाही त्यातले म्हणून कड्या लावण्याचे प्रकार झाले. काँग्रेसवाले सध्याच्या काळात इतके घाबरलेले व बावचळलेले असतात की, भाजपने काहीही केले तरी त्यात भाजपची अब्रू कधीच जात नाही असे त्यांना वाटते. या आघाडीत गंमत अशी होती की, नगराध्यक्षपद व सत्ता भाजपची असणार होती. म्हणजे काँग्रेसला सोबत घेण्याचे पाप असेलच तर ते भाजपचे असणार होते. पण काँग्रेसला इतकी घाई की त्यांनी आपल्या नगरसेवकांना तात्काळ नोटिस देऊन पक्षातून काढून टाकले. याचा फायदा घेऊन काँग्रेसच्या नगरसेवकांनी भाजपसोबत आपली आघाडी कायम राहील असे जाहीर केले. मधल्या काळात भाजपने काँग्रेससोबत युती नाही असा नुसताच ओरडा केला. देवेंद्र फडणवीस यांची तशी वक्तव्ये टीव्हीवरून दिसतील याची खबरदारी घेण्यात आली. प्रत्यक्षात स्थानिक लोकांवर कारवाई काहीच झाली नाही. सबब आता काँग्रेसला नाही तरी काँग्रेसवाल्यांना सोबत घेऊन भाजपवाले अंबरनाथची सत्ता भोगणार आहेत. गंमत म्हणजे तिथली नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतही भाजपला काँग्रेसच्या मदतीमुळेच विजय मिळाला होता. मात्र तेव्हा त्याची उघड चर्चा न झाल्याने ते तसेच धकून गेले.

### एमआयएमचा संग

अकोटमध्ये नगराध्यक्षपदी भाजपच्या माया धुळे जनतेतून निवडून आल्या. पण ३५ जागांपैकी भाजपचे केवळ ११ च नगरसेवक निवडून आले. काँग्रेस– ६, वंचित व एमआयएमचे प्रत्येकी ५ आणि राष्ट्रवादी तसेच ठाकरे सेनचे प्रत्येकी दोन असे निवडून आले होते. सत्ता चालवण्यासाठी बहुमत हवे म्हणून भाजप, एमआयएम व इतर पक्षांनी मिळून आघाडी स्थापन केली. ही आघाडी स्थापन होतेवेळी वरिष्ठांना विचारात घेतले असणारच. पण त्यांनी सत्तेच्या हव्यासापायी काणाडोळा केला असावा. मात्र मिडियातून गवगवा झाला आणि विरोधकांनी टीका सुरु केली हे पाहताच लगेच भाजपचे मी नाही त्यातली असा पवित्रा घेतला. तिकडे एमआयएम नेही आपल्या नगरसेवकांना तंबी दिली. अकोटमध्ये वंचितला सत्तेत येऊ न देणे हे सर्वांचे ध्येय असल्याने तिथे एमआयएमची देखील मदत घेण्यात भाजपचे स्थानिक आमदार प्रकाश भारसाकळे यांना काही गैर वाटले नाही. आता त्यांना कारणे दाखवा नोटिसीचे नाटक केले गेले असले तरी हे सर्व कोणत्या स्थितीत झाले हे फडणवीस व रवीद्र चव्हाण यांना पुरते ठाऊक आहे. महापालिका निवडणुकीचा धुरळा बसला की हे सर्व विसरले जाईल. स्थानिक पातळीवर अशा परस्परविरोधी पक्षांच्या युत्या होणे हे काँग्रेसच्या काळापासून घडत आलेले आहे. काल ज्यांचे निधन झाले त्या सुरेश कलमाडी यांची पुण्यातील सत्ता उलथण्यासाठी अजितदादांनी २००८ मध्ये भाजप, शिवसेना यांच्याशी युती केली होती. त्याहूनही खूप पूर्वी म्हणजे १९६० च्या दशकात एकदा शिवसेना व समाजवादी यांची आणि एकदा तर शिवसेना आणि बनातवाला यांची मुस्लिम लीग यांची युती झालेली होती. पण स्थानिक मतदारसंघ खूप छोटे असतात. १०–२० मतांनीही जागा जिंकल्या जातात. अशा स्थितीत पक्षांच्या निशाण्या टिकवणे अवघड होते. म्हणूनच पूर्वी स्थानिक निवडणुका पक्षाच्या चिन्हावर लढवल्या जात नसत. पण भाजपला दिल्लीपासून गल्लीपर्यंत आपलीच एकहुकुमी सत्ता आहे हे दाखवण्याचा माज आहे. ते करण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. यंदा उमेदवारी देण्याआधी तर त्याने इतरांचे पक्ष फोडलेच, पण परवा त्याने ऐन प्रचारादरम्यान ठाकरे सेनेच्या उमेदवारांना भाजपमध्ये प्रवेश देऊन त्यांना पाठिंबा दिला. शिवाय, सुमारे ७० ठिकाणी निवडणुका बिनविरोध करण्यात आल्या. यासाठी पैसे व दमदाट्या करण्यात आल्या. लोकशाहीची चेष्टा करायची व लोकांच्या मनात तिच्याविषयी तुच्छता निर्माण करायची असा जणू चंगच भाजपने बांधला आहे. त्याचेच हे सर्व परिणाम आहेत. अंबरनाथ व अकोटमध्ये याचाच आणखी एक वेगळा प्रयोग करण्याचा प्रयत्न झाला. तो अंगाशी येईल असे पाहता तूर्तास तो झटकण्यात आला आहे. पण ही निव्वळ धूळफेक आहे.

विचार

# अरावलीची लढाई जिंकली पण...

***अरावलीची उंच शिखरे पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. ती धूळ थांबवतात, पाणी जमिनीत मुरायला मदत करतात, जैवविविधतेचे संरक्षण करतात आणि वन्यजीवांना आश्रय देतात. उत्तर-पश्चिम भारतातील ही पर्वतरांग भारतातील सर्वात जुनी पर्वतरांग म्हणून ओळखली जाते. जनआंदोलनाच्या रेट्यामुळे आता खाणमाफियांपासून अरावली पर्वताचे संरक्षण करण्याबाबतचा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. यानिमित्ताने...***



**मिलिंद बेंडाळे**

देशात अनेक प्रश्न आहेत. मात्र त्यातही पर्यावरणीयदृष्ट्या बघायचे तर डोंगर, डोंगरउतारावर होणारी घातक विकासकामे आणि अयोग्य पद्धतीने होणारे खाणकाम अत्यंत गांभीर्याने घेणे गरजेचे असते. भविष्याचा, पर्यावरणाचा, पुढील पिढ्यांच्या आरोग्याचा प्रश्न असल्यामुळे त्याला वेगळे महत्त्व प्राप्त होते. या पार्श्वभूमीवर अरावली पर्वतरांगांशी संबंधित घटनेचा अर्थ जाणून घ्यायला हवा. अलिकडेच न्यायालयाने अरवली पर्वतात खाणउद्योगाला परवानगी न देण्याचा निर्णय दिला. अर्थातच जनमताच्या रेट्याने घेतल्या गेलेल्या या निर्णयाचे स्वागत झाले. खेरीज अरावलीची व्याख्या सुस्पष्ट झाल्याने काम सोपे झाले. आता त्याची अंमलबजावणी कशी होते हे बघावे लागेल, कारण या संपूर्ण प्रदेशात बेकायदेशीर खाणकामाचे तब्बल २,७०३ गुन्हे दाखल झाले होते. त्यातील १,४७८ गुन्हे तर गेल्या अवघ्या दोन वर्षातील आहेत. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, आजही राजस्थानच्या या प्रदेशात पोलीस, वन विभाग आणि खाण अधिकाऱ्यांच्या संगनमताने तीन ते चार हजार ठिकाणी अवैध खाणकाम सुरू आहे. राजस्थानमधील माजी खाण संचालक दीपक तंवर म्हणतात की, येथील सरकारे नेहमीच बेकायदेशीर खाणकामाला पाठीशी घालत आली आहेत. २००२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातल्यानंतरही अरावलीमध्ये अवैध खाणकामाची २१,७७८ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. अरावलीमधील कायदेशीर खाणींची संख्या बघायची तर २० जिल्ह्यांमध्ये ११ हजारांहून अधिक खाणींचे वाटप करण्यात आले आहे. यापैकी अंदाजे दहा हजार खाणी १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या भागात आहेत. शंभर मीटरपेक्षा जास्त उंचीच्या एकूण १,००८ खाणी नोंदणीकृत आहेत. १०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या खाणींपैकी ७४७ खाणी सध्या कार्यरत आहेत. या श्रेणीतील २६१ खाणी नूतनीकरणाच्या प्रक्रियेत आहेत. १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या भागात अंदाजे ९,५०० खाणी कार्यरत आहेत.

थोडक्यात सांगायचे, तर अंदाजे ९०० चौरस किलोमीटर क्षेत्रात सुमारे दहा हजार खाणी कार्यरत आहेत. अरावली पर्वतरांगेमध्ये लुनी, साबरमती, साहिबी, बेडच (अयाड), खारी, सुकडी, कोठारी, सोम, जख्मी आणि कमला यांसारख्या नद्या उगम पावतात. त्याचबरोबर नक्की, पुष्कर, जैसमंद, मातृकुंडिया आणि बेनेश्वरसारखी अनेक सरोवरेही इथे आहेत. म्हणूनच अरावली पर्वतरांग भारताचा कणा आहे. ही पर्वतरांग चार राज्यांमधून जात असून उत्तर–पश्चिम भारतात सुमारे ६७० किलोमीटर लांब पसरलेली आहे. ही पर्वतरांग दिल्लीजवळ सुरू होते, दक्षिण हरियाणा आणि राजस्थानच्या आतल्या भागापर्यंत पसरते आणि पुढे गुजरातमध्ये अहमदाबादजवळच्या मैदानी भागापर्यंत विस्तारते. 'गुरु' हे अरावलीचे सर्वात उंच शिखर असून त्याची उंची सुमारे एक हजार ७२२ मीटर इतकी आहे. ते राजस्थानच्या माउंट आबू येथे आहे. अरावली सुमारे ६७ कोटी वर्षे जुनी पर्वतरांग आहे. ही पर्वतरांग नसती तर उत्तर भारतातील अनेक नद्या अस्तित्वातच नसत्या. खेरीज अनेक जंगले, वनस्पती, मौल्यवान खनिजे आणि मोठे पर्यावरणीय वैभवही बघायला मिळाले नसते. 'अरावली' हा शब्द संस्कृतमधील 'अर्बुदावली'पासून तयार झाला आहे. राजस्थानच्या इतिहासात या पर्वतरांगेचा उल्लेख 'आडावळ' या नावाने आढळतो. थोडक्यात, ही पर्वतरांग एक प्रकारची संरक्षणरेषा असून वाळवंट, प्रचंड धूळ आणि पाण्याची टंचाई यांच्यासारख्या अनेक अडथळ्यामध्येही शांतपणे उभी आहे. त्यामुळेच ही उत्तर भारताची सगळ्यात जुनी 'टाइम कॅप्सूल' असून सर्वात नाजूक वर्तमानही आहे, असे आपण म्हणू शकतो.

भारतीय प्लेट आणि प्राचीन खंडांमध्ये टक्कर झाली, जमिनीत खचदरी तयार झाली (रिफ्टिंग) आणि अवसादन आणि अशा अनेक बदलांमुळे अरावली पर्वतरांग तयार झाली असे तज्ज्ञ सांगतात. भूगर्भशास्त्रीय भाषेत प्रोटेरोझोइक नावाने ही प्रक्रिया ओळखली जात जाते. 'अरावली–दिल्ली ऑर्गेनिक बेल्ट' म्हणून हा सगळा भाग अधोरेखित केला जातो. थोडक्यात सांगायचे, तर हा सगळा भूखंड महाद्वीपीय तुकड्यांची टक्कर आणि हळूहळू होणाऱ्या पर्वतनिर्माणामुळे तयार झाला आहे. भू-तंत्राचा विशेष भाग म्हणजे अरवलीचे दगड आणि त्यातील भेगा तयार होण्यासाठी प्रचंड काळ जावा लागला असला तरी ते तुटणे मात्र अतिशय सोपे आहे. येथील दगड फोडण्यासाठी कोणत्याही स्फोटाची गरज लागत नाही. त्यामुळेच येथे खाणकाम, कापकाम, रस्ते बांधणे वा आणि काँक्रिटीकरण सोपे होते.

अरावलीला उत्तर भारताची 'हिरवी भिंत' म्हणजेच 'ग्रीन वॉल'ही म्हटले जाते. ही पर्वतरांग पूर्वेकडे थार वाळवंटाचा विस्तार रोखणारी नैसर्गिक भिंतच आहे. ती वनस्पती, माती, उतार आणि पाणी साठवण्याची क्षमता या सगळ्या अंगाने महत्त्वपूर्ण आहे. काही तांत्रिक अहवालांनुसार अरावलीमध्ये अनेक 'गॅप्स–ब्रीच' (अंतर–भंग) दिसतात. म्हणजे काही ठिकाणी टेकड्यांची अखंड रांग तुटते आणि मार्ग मोकळा झालेला दिसतो. त्यामुळेच धुळीची वादळे फक्त हंगामी घटना नसून बदलत्या भूशास्त्रीय घटकांचे सूचक लक्षण असल्याचे तज्ज्ञ सांगतात. या पर्वतरांगेत छिद्र म्हणजेच पोकळी वाढत आहे. अर्थातच यासाठी कोणतेही एक कारण सांगता येणार नाही. कुठे बेकायदेशीर खाणकाम सुरू आहे, कुठे खाण वाढवली जात आहे, कुठे नियोजनाशिवाय शहरे वाढत आहेत तर कुठे रस्ते आणि रेल्वे यासारख्या प्रकल्पांनी भूरचना बदलत आहे. सध्या लोक अनेक भागांकडे उद्यान म्हणून पाहतात. तसाच त्याचा अतिवापरही करतात. पण मुळात तो भाग भौगोलिक संरक्षणरचनेसाठी महत्त्वपूर्ण असतो. धूळ थांबण्यासाठी, सूक्ष्म जलवायू निर्माण करण्यासाठी, जैवविविधता टिकवण्यासाठी अत्यावश्यक असणारी ती एक संरक्षणात्मक यंत्रणा असते.

अरवली पर्वतरांगा दुरून ओसाड दिसतात. पण हेच वन्य प्राण्यांचे घर असल्याचे विसरुन चालणार नाही, कारण इथे बिबट्या, लांडगा, कोल्हा, नीलगाय, साळींदर यासारखे प्राणी राहतात. म्हणूनच हा परिसर अखंड ठेवण्याची गरज आपण ओळखायला हवी. पर्वतांमध्ये रस्ते आणि 'कट–लाइन' तयार होतात तेव्हा भूभाग लहान लहान बेटांमध्ये विभागला जातो. अशा लहान बेटांमध्ये मोठे शिकारी प्राणी टिकू शकत नाहीत, परिणामस्वरुप, मनुष्य आणि प्राणी यांच्यात संघर्ष वाढतो. सरतेशेवटी ठराविक ठिकाणी वन्य जीव राहिलेच नाहीत... हे कारण पुढे करून विकासाच्या नावाखाली त्या भागाचा विनाश होतो. या अर्थाने बघता अरवलीच्या दक्षिण भागातील उदयपूर–मेवाड क्षेत्रात वन्य जीवांचा इतिहास हा केवळ नैसर्गिक इतिहास नाही तर राजकीय आणि सामाजिक दुरावस्थेचा इतिहासही आहे, हे समजून घ्यायला हवे.

जगातील सर्वात सुंदर शहरांपैकी एक असणारे उदयपूर अरावलीशिवाय वसू शकले नसते. पूर्वीच्या काळात 'रिंग फेन्स शहर' या नावाने ओळखला जाणारा हा भाग प्रत्येक प्रकारच्या हल्ल्यापासून जनांचे संरक्षण करत असे. बिजौलियाचे शेतकरी आंदोलन असो किंवा भिल्ल आंदोलन; ते अरावली पर्वतरांगांच्या संरक्षणाशी जोडलेले होते, कारण त्या काळात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जंगलांमध्ये प्राण्यांची शिकार वाढवली होती. या परिसरातील केवड्याचे बन असो की चंदनच्या झाडांची रांग वा इतर वनस्पती, हे जपण्यासाठी नागरिकांनी कायमच लढा दिला आहे. पूर्वी इथे मोठ्या प्रमाणात चंदन आणि सागवानाची झाडे होती. काळानुरुप त्यांची संख्या कमी झाली. १९४९–१९५४ या काळात मेवाडने अरावलीतून सुमारे १४० वाघ गमावले. म्हणजेच दर वर्षी सरासरी २८ वाघ मारले गेले. परिणामस्वरुप, १९६० च्या दशकापर्यंत मेवाडमधील वाघ नामशेष झाले. त्याचबरोबर जंगल आणि जंगली शाकाहारी प्राणीही जवळजवळ संपुष्टात आले. पर्यावरणाचा नाश हळूहळू होतो; पण तो दिसतो तेव्हा खूप उशीर झालेला असतो. अरावलीमधून वाघ गायब होणे हा फक्त एका प्रजातीचा अंत नव्हता, तर ते जंगलाच्या संपूर्ण पिरॅमिडचे ढासळणे होते. पाणी, माती, शेती आणि समाजापर्यंत त्याचे धोके हळूहळू पसरले. आता तर अनेक ठिकाणी जंगल हे सुरक्षिततेचे नाही, तर संघर्षाचे ठिकाण बनले आहे. ही गोष्ट फक्त पर्यावरण विरुद्ध विकासाची नाही, तर विकासासाठी कोणती किंमत द्यावी लागते आणि कोणाच्या वाट्याला ही किंमत येते, हा खरा प्रश्न आहे. अरावली पर्वतात खाणउद्योगाला परवानगी न देण्याचा निर्णय आता जनमताच्या रेट्याने घेतला गेला असला तरी त्याची अंमलबजावणी होते की नाही, खाणमाफियापुढे सरकार लोटांगण घालते, की नाही हा खरा प्रश्न आहे.

**(लेखकनिसर्ग आणि प्राणीजीवनाचे अभ्यासक असून जंगलांमध्ये अनेक प्रकारचे संशोधन करतात.)**

# उच्च शिक्षणाच्या समस्यांचे निराकरण

**सुयोग आंग्रे**

केवळ पदवी मिळवणे याला शिक्षण म्हणता येणार नाही. शिक्षण ही जीवनाला दिशा देणारी शक्ती आहे. यशस्वी शिक्षणामुळे एखाद्या व्यक्तीची विचार करण्याची पद्धत बदलू शकते, त्याला जीवनाचा उद्देश मिळू शकतो आणि त्याच्यात लपलेली क्षमता ओळखण्याची संधी मिळते. विशेषतः उच्च शिक्षण हा असा टप्पा आहे जिथे तरुणांना त्यांच्या आवडी आणि क्षमता ओळखतात आणि भविष्यात त्यांचा मार्ग शोधू लागतात. एकीकडे शालेय शिक्षण आपल्याला आपल्या सभोवतालच्या जगाचे ज्ञान देते, तर उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांचे पर्याय शोधण्याचे स्वातंत्र्य देते. उच्च शिक्षण म्हणजे विविध विषय आणि क्षेत्रे समजून घेऊन जीवनात काय करायचे ते ठरवण्याची वेळ. ही प्रक्रिया सोपी नाही, गुंतागुंतीची आहे. विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे स्वतःचा मार्ग निवडता येण्यासाठी एक मजबूत संस्था, संसाधने आणि सतत प्रयत्न करावे लागतात. भारतासारख्या मोठ्या आणि वैविध्यपूर्ण देशात संस्था उभारणी हे मोठे आव्हान आहे. आज देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. प्रत्येक वर्षी किमान एक लाखहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण होऊन वरच्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी धडपड करतात. केवळ आरक्षण आणि गुणवत्ता या जोरावर प्रवेश मिळवणे शक्य होत नाही. त्यामुळे स्पर्धा अधिक तीव्र होत असून परीक्षा अधिक प्रमाणबद्ध होत आहेत. या सर्वांबरोबर अनेकदा प्रशासकीय सोयीसुविधांकडे यंत्रणा पाहते. या तीव्र वातावरणात, प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वावर आणि क्षमतेवर लक्ष केंद्रित करणे अशक्य होते. दर्जेदार उच्च शिक्षणाच्या शोधात तरुण अजूनही मोठ्या प्रमाणात आहेत. पुरवठ्याअभावी अभ्यास कुठे करायचा याच्या विद्यार्थ्यांच्या निर्णयावर परिणाम होतो. कठोर इमिग्रेशन धोरण असूनही, मोठ्या संख्येने भारतीय विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी जात आहेत. कॅनडा, यूएसए आणि यूके ही त्यांची प्रमुख ठिकाणे आहेत. मात्र, आता फ्रान्स, आयर्लंड आणि इटली हे देशही विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय होत आहेत. जानेवारी २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार १२ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत होते. हा आकडा स्पष्टपणे घरगुती स्तरावरील गरज आणि मर्यादित पर्यायांवर प्रकाश टाकतो. या आव्हानांमधूनच मोठ्या संधीही निर्माण होतात. भारतात आपल्याला अधिक बहुविद्याशाखीय कार्यक्रमांची गरज आहे. तंत्रज्ञान, पर्यावरण, माहिती आणि सर्जनशील क्षेत्रांशी संबंधित अशा कार्यक्रमांचा विचार करायला हवा. मॅनेजमेंट, लॉ, मेडिकल या पारंपरिक अभ्यासक्रमांकडेही नव्या पद्धतीने पाहावे लागेल. नवीन अभ्यासक्रम, उत्तम तंत्रज्ञान आणि अभ्यासाला उद्योगाशी जोडून भारतीय संस्था जागतिक स्तरावर स्वतःला बळकट करू शकतात. दुसरी मोठी संधी म्हणजे डिजिटल शिक्षण. संकरित मॉडेल प्रभावी असू शकतात, जे ऑनलाइन आणि ऑफलाइन शिक्षण एकत्र करून तयार केले जातात. त्याची योग्य अंमलबजावणी केल्यास ते मोठ्या प्रमाणावर फायदेशीर शिक्षणाचे साधन बनू शकतात. भारतासारख्या मोठ्या आणि वैविध्यपूर्ण देशात, जिथे विद्यार्थी दुर्गम भागात राहतात, डिजिटल शिक्षण एक प्रभावी उपाय देते. भारत आपल्या मजबूत डिजिटल पायाभूत सुविधांसह जगासमोर एक आदर्श ठेवू शकतो आणि करायला हवा. धोरणात्मक पातळीवर आज सकारात्मक बदल दिसून येत आहेत. तीन दशकांनंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षण व्यवस्थेत मोठ्या सुधारणांचा पुढाकार घेतला आहे. बहुविद्याशाखीय अभ्यास, विषयातील लवचिकता आणि संस्थांची स्वायत्तता यासारख्या कल्पनांवर आता भर दिला जात आहे. जगभरातील शिक्षण क्षेत्रातील भूतकाळातील अनुभव असे दर्शवतात की जेव्हा जेव्हा सरकार संशोधन, नवकल्पना आणि तंत्रज्ञानाला शिक्षणाचे केंद्र बनवते तेव्हा शिक्षणाचा दर्जा सुधारतो. तिसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रतिभा विकास. उच्च शिक्षण संस्थेचे उद्दिष्ट केवळ कोरडे ज्ञान देणे नाही तर विद्यार्थ्यांची क्षितिजे विस्तृत करणे, त्यांची कौशल्ये वाढवणे आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक समज प्रदान करणे हे आहे. अर्थपूर्ण शिक्षणामुळे देशाला अशी मानवी संसाधने मिळतात, ज्यात केवळ देशांतर्गत गरजा भागवण्याची क्षमताच नाही, तर जागतिक स्तरावरही आत्मविश्वासाने योगदान देऊ शकते. जर आपण मागे वळून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की उच्च शिक्षणाची परंपरा ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. आपापल्या काळात, तक्षशिला, नालंदा आणि विक्रमशिला या प्राचीन शिक्षण केंद्रांनी जगभरातील विद्वानांना आकर्षित केले. या सर्वांनी जिज्ञासा आणि संशोधनाला शिक्षणाची मूलभूत तत्त्वे दिली. आज काळ आणि परिस्थिती बदलली असली तरी आपले ध्येय आणखी स्पष्ट आहे. २०३५ पर्यंत एकूण नोंदणी प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत वाढवायचे असेल, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवायचे असेल आणि केवळ पदवीवर लक्ष केंद्रित न करता शिकण्याच्या क्षमतेला प्रोत्साहन द्यायचे असेल, तर संस्था उभारणीला राष्ट्रीय प्राधान्य द्यावे लागेल. आपल्या आजच्या प्रयत्नांमुळे भारतातील शैक्षणिक संस्था केवळ तरुण पिढीच्या महत्त्वाकांक्षांना योग्य दिशा देऊ शकत नाहीत, तर हे तरुण भविष्यात विकसित भारत २०४७ चा पाया मजबूत करण्याच्या दिशेने वाटचाल करतील म्हणौनीचतर आपला देश महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

लोकसंसद

## "अवास्तव स्वप्न की भविष्यातील संकेत"

जोहरान ममदानी हे अमेरिकेतील मोठे शहर न्यूयॉर्कचे महापौर झाल्यावर भारतातही मुसलमानांना महत्त्वाचे आणि वरचे पद मिळू शकते असे स्वप्न काही जण बघत आहे. त्यातूनच देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा पुढचा महापौर कलमा वाचणारी महिला असू शकते असे विधान केले गेले पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या विधानाला कोणीच गांभीर्याने घेतले नाही. तर मुंबईचा पुढचा महापौर मराठी आणि हिंदूच असेल या विधानाचा उपहास केला गेला. काही दिवसापूर्वी उत्तर प्रदेश संभल विधानसभेचे समाजवादी पक्षाचे आमदार इक्बाल महमूद यांनी असे म्हटले की भारताची फाळणी झाली नसती तर आज एखादा मुसलमान भारताचा पंतप्रधान झाला असता. जगाला ''दार– उल –इस्लाम'' म्हणजेच जगाचे संपूर्ण इस्लामीकरण करणे आणि ते समय मर्यादित करण्याचे निश्चित झाले आहे. आज जगात ५७ इस्लामी देश आहे तर १७ ख्रिस्ती देश आहे पण हिंदू राष्ट्र एकही नाही. बहुल संख्येने हिंदू असलेल्या भारतात किंवा नेपाळमध्ये ही हिंदू राष्ट्र नाही ही खेदाची गोष्ट आहे. आजची परिस्थिती पाहता संपूर्ण जगाचे इस्लामीकरण झाले तर विचार करा भविष्यात काय होईल. अत्याचार, हत्या होऊन नामशेष होण्याच्या मार्गावर आपण असू. इस्लाम आणि ईसाई सोडले तर इतर सर्व हिंदूच आहे. प्रत्येकाचे उपासना मार्ग वेगवेगळे असतील पण सर्व सनातन धर्माचे पाईक आहे. जगाचे इस्लामी करणारे आणि त्यांचे समर्थकलोकांचे बुद्धिभेद करून, पंथाला धर्माचे रूप देऊन, जाती जातीत तेढ निर्माण करून भांडणे लावत आहे आणि आपल्या समय मर्यादित इस्लामीकरणाची मोहीम पूर्णत्वाला नेण्यासाठी प्रयत्न करत आहे. जेव्हा एखाद्या गोष्ट साठी समय मर्यादा ठरवून प्रयत्न केले जातात तेव्हा ती गोष्ट पूर्ण होतेच. 'धर्मेण जयती राष्ट्रम'' धर्मच राष्ट्राचे रक्षण करतो. कुठल्याही समाजात परिवर्तन होत असताना ते बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि अध्यात्मिक स्तरावर होणे आवश्यक असते. हिंदूंना स्वसंस्कृतीचे विस्मृती झाल्याने आणि पाश्चात्त्य विकृती धारण केल्याने आज त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. त्यांच्या बौद्धिक आणि मानसिक परिवर्तनाची गरज आहे. क्षात्रतेज आणि ब्राह्मतेज, म्हणजेच शक्ती आणि भक्ती, म्हणजेच श्रद्धा आणि शौर्य यांचा संगम हाच सनातन हिंदू राष्ट्राचा पाया आहे. **– लीना गाडगीळ. पनवेल**

विशेष

# प्रवासी भारतीय दिन

भारतीय प्रवासी दिन, दरवर्षी ९ जानेवारी रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश परदेशात राहणाऱ्या भारतीयांचा सन्मान करणे आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आहे. महात्मा गांधी ९ जानेवारी १९१५ रोजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते आणि त्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या या परतण्याचे स्मरण म्हणून हा दिवस निवडण्यात आला. परदेशात राहणारे भारतीय विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देत आहेत, जसे की विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, आणि



सांस्कृतिक वारसा जपणे. ते भारत आणि जगभरातील देशांमध्ये एक महत्त्वाचा दुवा साधत आहेत. भारतीय प्रवासी दिन परदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या सन्मानासाठी कार्यक्रम, परिषद आणि चर्चासत्रांचे आयोजन केले जाते. हा दिवस जागतिक स्तरावर भारतीयांच्या योगदानाची ओळख करून देतो आणि त्यांच्या माध्यमातून भारताच्या प्रगतीत महत्त्वाचा वाटा असल्याचे अधोरेखित करतो. मसर्वात मोठा प्रवासीफ गांधीजींचं भारतात आगमन मोहनदास करमचंद गांधी हे १८८३ सालाच्या सुमारास एका खटल्यासंबंधी दक्षिण आफ्रिकेला गेले होते. त्या ठिकाणी कृष्णवर्णीय लोकांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधात त्यांनी सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला आणि कृष्णवर्णीयांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. त्यानंतर ९ जानेवारी १९१५ साली ते भारतात परतले. भारतात आल्यानंतर त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक वेगळी दिशा दिली आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं.

भारतामध्ये मोठ्या संख्येने लोक शिक्षणासाठी तसेच नोकरी व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी जगातील विविध देशांमध्ये गेलेले आहेत. त्यातील बरेच भारतीय तिथेच स्थायिक झालेले आहेत. या भारतीयांनी या देशांमध्ये राहताना आपली प्रगती करून घेतलीच, पण त्याचसोबत ते राहत असलेल्या देशांच्या विकासामध्ये मौलिक योगदान दिले आहे. अशा जगभरात पसरलेल्या अनिवासी भारतीयांना आपला मूळ देश असलेल्या भारताशी जोडून घेण्यासाठी एक नवा विचार पुढे आला. त्यातूनच प्रवासी भारतीय दिन या संकल्पनेचा जन्म झाला. भारत सरकारकडून दरवर्षी ९ जानेवारी हा दिवस प्रवासी भारतीय दिन म्हणून साजरा केला जातो.

पहिला प्रवासी भारतीय दिवस ९ ते ११ जानेवारी या कालावधीत २००३ मध्ये साजरा करण्यात आला होता. भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कल्पनेतून या दिवसाची सुरुवात करण्यात आली. प्रवासी भारतीय दिनी विदेशात राहून विविध क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या भारतीयांना प्रवासी भारतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. विदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांच्या मनात भारताविषयी काय भावना आहे.

जगातील अन्य देशांच्या तुलनेत भारताने आणखी काय करायला हवे, भारत आणि इतर देश यांच्यामध्ये काय समान धागे आहेत, अशा अनेक गोष्टींचे वैचारिक आदान प्रदान व्हावे, त्यासाठी हे प्रवासी दिन हे व्यासपीठ आहे. यामध्ये विशेषत: तरुण वर्गाला अनिवासी भारतीयांकडून मार्गदर्शन केले जाते. विदेशातील नव्या संधींबद्दल यांना माहिती मिळते. अनिवासी भारतायींच्या माध्यमातून भारतात नवी व्यावसायिक गुंतवणूक आकर्षित करण्याचाही प्रयत्न केला जातो.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ जानेवारी

१) श्रीम. नलिनी नारायण माळवी वरसोली, अलिबाग, ९-१-१९४७
२) श्रीम. माणिक शांताराम राऊत वरसोली, अलिबाग, ९-१-१९४६
३) श्री. चंद्रकांत दुलाजी बागवे चेंढरे, अलिबाग, ९-१-१९५८
श्रीम. निर्मला दिनकरराव फुलगावकर चेंढरे-अलिबाग, ९-१-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**आदी नवीन सालियान, वाढदिवस अलिबाग**



**श्रीमती सुलोचना सीताराम पाटील, ८ वे पुण्यस्मरण, बोरिस, अलिबाग**

# देहविक्री व्यवसायाचा पर्दाफाश

## ● नवी मुंबईतील ‘राज’ लॉजवर छापा; तीन आरोपी ताब्यात

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

अनैतिक व्यापार व अवैध धंद्यांविरोधात गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तुर्भेनाका परिसरातील राज लॉजिंग अँड बोर्डिंग येथे सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तरुणींचा सौदा करणाऱ्या ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सात पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. मात्र लॉजचा मुख्य संचालक करणाकर शेट्टी हा फरार आहे. त्याच्या शोधासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

अनैतिक मानव तस्करी विरोधी विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना गुप्त बातमीदारामार्फत तुर्भे नाका भागातील एका लॉजमध्ये ग्राहकांकडून पैसे घेऊन महिलांचा आणि तरुणींचा सौदा केला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचत बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. बनावट ग्राहकाने महिलांपैकी एका महिलेला पसंती दर्शवली असता, त्याच्याकडून मोबदल्यापोटी ३५०० रुपये स्वीकारण्यात आले. या व्यवहारामुळे देहव्यापार सुरू असल्याची स्पष्ट पुष्टी मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ छापा टाकण्यात आला.

या छाप्यादरम्यान लॉजमध्ये ७ महिलांना देहव्यापारासाठी ठेवण्यात आल्याचे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळी लॉज व्यवस्थापक अजय कैलास गोस्वामी, महिला पुरवठादार किशोर पूर्णचंद्र साहू आणि वेटर अजय कुमार यांना ताब्यात घेत अटक केली. प्राथमिक तपासात हे आरोपी संगनमताने महिलांना लॉजमध्ये आणून ठेवत, ग्राहकांच्या पसंतीनुसार व्यवहार ठरवत आणि मिळालेली रक्कम आपसात वाटून घेत असल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी बनावट ग्राहकाकडून देण्यात आलेली रक्कम जप्त केली आहे. ती या प्रकरणातील महत्त्वाचा पुरावा मानली जात आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींविरोधात अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या रॅकेटमागील आणखी व्यक्तींची माहिती मिळवण्यासाठी सखोल चौकशी सुरू आहे. दरम्यान, लॉजचा संचालक करणाकर शेट्टी फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विविध पथके तैनात केली आहेत.

ही कारवाई सहायक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. तुर्भे पोलीस आणि अनैतिक मानव तस्करी विरोधी विभाग संयुक्तपणे पुढील तपास करत असून, नवी मुंबई परिसरात सुरू असलेल्या अशा अवैध व्यवसायांवर कठोर कारवाईचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

## अंधेरीत इमारतीला आग; दोघांचा मृत्यू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अंधेरी पूर्व परिसरातील साकीविहार रोडवर असलेल्या एका व्यावसायिक इमारतीला बुधवारी (दि.७) सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत धुरामुळे गुदमरून दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तसेच यामुळे लाखो रुपयांचे मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

साकीविहार रोडवरील नारायण प्लाझा या चार मजली इमारती बुधवारी सायंकाळी ६च्या सुमारास आग लागली. या कार्यालयातील फर्निचर आणि ज्वलनशील वस्तूंमुळे आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. त्यामुळे संपूर्ण मजल्यावर दाट धूर पसरला होता. याची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल घटनास्थळी हजर झाले. अग्निशमन दलाने तातडीने इमारत रिकामी करत बचाव कार्य चालू केले. यादरम्यान कार्यालयात दोन तरुण बेशुद्ध अवस्थेत सापडले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. भगवान पिटले (३०) आणि सुमंत जाधव (२८) अशी मृताची नावे असून दाट धुरामुळे श्वास गुदमरल्याने या दोघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

या आगीत कार्यालयातील इलेक्ट्रिक वायरिंग, लाकडी फर्निचर, फॉल्स सीलिंग, लिथियम-आयन बॅटरी आणि महत्त्वाच्या फाईल्स जळून खाक झाल्या. प्राथमिक अंदाजानुसार आगीचे कारण शॉर्ट सर्किट असल्याचे मानले जात आहे. स्थानिक पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# एसटी कामगारांचा पगार रखडला

## ● जीआर जारी न केल्यामुळे ‘सात तारखेचा’चा मुहूर्त चुकला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील एसटी महामंडळाच्या ८६ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांचा पगार रखडला आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला देऊ, असे आश्वासन परिवहनमंत्र्यांनी गेल्या वर्षी दिले होते. मात्र बुधवारी सायंकाळपर्यंत पगाराचा ‘जीआर’ही काढण्यात आला नाही. त्यामुळे ‘सात तारखे’चा मुहूर्त चुकण्याबरोबर जीआर जारी न केल्यामुळे पगार नेमका होणार कधी? असा प्रश्न एसटी कर्मचाऱ्यांना पडला आहे.



गेल्या वर्षी थकीत देयकांच्या प्रश्नावर एसटी कर्मचाऱ्यांच्या कामगार संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली होती. त्यावेळी सरकारने विविध घोषणांची खैरात केली. एसटी कर्मचाऱ्यांचा पगार ७ तारखेलाच होईल, असे आश्वासन परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

मात्र त्यानंतर काही महिने पगार देण्यासाठी ७ तारखेची वेळ पाळण्यात आली. अनेकदा ७ तारीख उलटल्यानंतरच पगार दिला.

तीच अनियमितता नवीन वर्षाच्या सुरुवातीला दिसून आल्याने एसटी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

> **“एसटी कामगारांना पगारासाठी दर महिन्याला सरकारच्या जीआरची वाट बघावी लागते. नवीन वर्षाच्या सुरुवातीला पुन्हा जीआर न आल्याने ७ तारखेला मिळणारा पगार रखडला आहे. महिनाभर अहोरात्र कष्ट करणाऱ्या एसटी कामगारांनाच पगाराची प्रतीक्षा करावी लागते हे दुर्दैव आहे.”**
>
> **– हिरेन रेडकर, सरचिटणीस, महाराष्ट्र एसटी कामगार सेना**

## साडवली परिसरावर सीसीटीव्हीची नजर

**संगमेश्वर :** साडवली परिसरात गेल्या दोन महिन्यात घरफोडीचे प्रकार घडले आहेत. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन साडवली ग्रामपंचायतीच्या वतीने सह्याद्रीनगर तिठा, साडवली स्टॉप, ठाकरे हायस्कूल स्टॉप अशा तीन ठिकाणी तसेच साडवली परिसरातील चार प्राथमिक शाळांमध्येही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले. या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून साडवली परिसरावर राहणार आहे.

## रत्नागिरीत रस्ता सुरक्षा रॅली

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन तसेच रस्ता सुरक्षा अभियान निमित्ताने पोलीस विभाग व उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा रॅली काढण्यात आली. ही रॅली उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ते मिरकरवाडा या मार्गावर काढण्यात आली असून यात या रॅलीमध्ये पोलीस विभाग आणि उपप्रादेशिक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी नागरिकांनी रस्त्यावरुन चालताना व वाहन चालविताना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले. तसेच, रस्त्यावरुन चालणाऱ्या पादचाऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे, विना हेल्मेट दुचाकी चालविणे, चुकीच्या बाजूने वाहन चालविणे इत्यादी गोष्टी टाळाव्यात. समाज, कुटूंब, मित्र परिवार यांना रस्ता सुरक्षेबाबत माहिती देऊन जनजागृती करावी, असे आवाहनही त्यांनी केले. तर जिल्हा पोलीस अधिक्षक नितीन बगाटे यांनी, प्रत्येकाने वाहन चालवताना हेल्मेट वापरावे जेणेकरुन दुचाकी चालविताना स्वत:ची तसेच आपल्या कुटूंबाची काळजी घेतली जाईल. तसेच नागरिकांनी रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन यावेळी केले. तर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे यांनी नागरिकांनी रस्त्यावर वाहन चालविताना शिस्तीचे व वाहतुकीच्या नियमांचे पालन करून सर्वांनी रत्नागिरी अपघातमुक्त करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.



## ज्ञानकुल बालविकास संघाचे वार्षिक प्रदर्शन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मूल्याधिष्ठित शिक्षण, संस्कार आणि समाजाभिमुख जाणीव यांचा सुरेख संगम साधणारे ‘उत्थान २०२६’ हे ज्ञानकुल बालविकास संघाचे वार्षिक शैक्षणिक प्रदर्शन ९ जानेवारीपासून मुंबईत सुरु होत आहे. ९ ते ११ जानेवारी दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत चेंबूर येथील ज्ञानकुल बालविकास संघाच्या परिसरात हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असणार आहे. यंदाच्या ‘उत्थान’ या संकल्पनेतून साकारलेल्या प्रदर्शनात भारतीय संस्कृती, चारित्र्य, समरसता आणि जागरूक जीवनशैली यांचा संदेश देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांची जाणीव करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. स्वदेशी (देशी मूल्ये आणि स्थानिक जीवनशैली), कुटुंब प्रबोधन (कौटुंबिक नातेसंबंध आणि जाणीव), पर्यावरण संवर्धन, सामाजिक समरसता आणि नागरिक कर्तव्य व जबाबदारी या पाच मूलभूत सूत्रांवर आधारित प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली आहे. प्रदर्शनासह याच विषयांवर आधारित नाटिका, कविता आणि सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा या ठिकाणी पाहायला मिळणार आहेत. शिक्षणासोबत संस्कारांची जोड देणारे हे प्रदर्शन पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे.

## श्रमदानातून विद्यार्थ्यांनी बांधला बंधारा

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

खरवते दहिवली येथील शरदचंद्रजी पवार कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे वारेली व पातेपिलवली येथे निवासी श्रमदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात सुमारे १३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव वृद्धिंगत करणे, श्रमसंस्कारांचे महत्त्व जागृत करणे, या उद्देशातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनितकुमार पाटील, पांडुरंग कदम, रामचंद्र कदम, कृष्णा निवदेकर, दिनेश पुनवत व अनंत गोमाणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरामध्ये मानसिक आरोग्य कार्यशाळा, तरुणाईपुढील आव्हाने, भाजीपाला लागवड तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, प्रक्रिया उद्योगाचे महत्त्व, संविधानाची ७५वी या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या शिबिरातून विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना वनसंवर्धन, जलसंधारण, कृषी व्यवसाय व्यवस्थापनाचा संदेश दिला.

# नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण आणि संगमेश्वर परिसरातील अनेक तरुणांची सरकारी नोकरीचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करण्यात आली. महेश भास्कर म्हात्रे (रा. जिते, ता. पेण, जि. रायगड) असे फसवणूक करणाऱ्याचे नाव असून त्याच्याविरोधात चिपळूण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नितीन श्रीकांत रसाळ (वय ४०, रा. बुरंबाड, ता. संगमेश्वर) यांनी फिर्याद दिली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, डिसेंबर २०२२ ते मे २०२४ या कालावधीत संशयित आरोपी महेश म्हात्रे याने फिर्यादी रसाळ आणि त्यांच्या ओळखीच्या इतर सात लोकांना सरकारी नोकरीचे आमिष दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. या बदल्यात त्याने रसाळ यांच्याकडून सहा लाख आणि इतर सात जणांकडून १८ लाख २५ हजार अशी एकूण २४ लाख २५ हजार रुपयांची रोकड स्वीकारली. मात्र, कोणालाही नोकरी न लावता ही सर्व रक्कम त्याने स्वत:कडेच ठेवून घेतली.

तसेच, आरोपीने फिर्यादी रसाळ यांच्या नावावर जनता सहकारी बँक आणि एचडीएफसी बँक (शाखा चिपळूण) मधून बनावट कर्ज प्रकरणे केली. या कर्जातून त्याने ह्युंदाई कंपनीची अल्काझार कार, बुलेट मोटारसायकल आणि दोन महागडे मोबाईल खरेदी केले. या कर्जाचे हप्ते मे २०२४ पासून न भरल्यामुळे सुमारे १६ लाख ६० हजार ५८४ रुपयांची थकबाकी रसाळ यांच्या नावावर राहिली आहे. जेव्हा फिर्यादीने आपल्या पैशांबाबत विचारणा करण्यासाठी आरोपीला फोन केला, तेव्हा त्याने त्यांना अश्लील शिवीगाळ करत बदनाम करण्याची धमकी दिली.

आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच रसाळ यांनी बुधवारी चिपळूण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

वीस वर्षांनी पुन्हा शाळा भरली

शाळेला भेटस्वरूप खोलीचे नूतनीकरण

# तुंगारतन हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

शाळा हे केवळ इमारत नसून संस्कार, ज्ञान आणि भविष्याची पायाभरणी करणारे ठिकाण आहे. खासगी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी शाळांकडे दुर्लक्ष होत आहे. शाळांना पुन्हा केंद्रस्थानी आणण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. याचे ज्वलंत उदाहरण आपल्याला रसायनी येथील एका मराठी शाळेने दिले आहे.



ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार याचसाठी शिक्षण प्रसार या ध्येयाने प्रेरित परम पूज्य डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुंगारतन विभाग विद्यामंदिर गुळसुंदे येथे रविवारी (दि.४) स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. जवळजवळ २० वर्षानंतर पुन्हा एकदा शाळा भरली होती.

इयत्ता दहावी अ आणि ब बॅच २००४-०५च्या विद्यार्थ्यांकडून शाळेचे माझी शिक्षक आणि माजी विद्यार्थी यांच्या स्नेह भेटीचे सुंदर स्वरूप शाळेमध्ये दिसले. याप्रसंगी शाळेला भेटस्वरूप नूतनीकरण करण्यात आलेल्या खोलीचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. शिक्षकांचे स्वागत, मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या भेटी साठी २००४०५ बॅच या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी देखील उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक गवारि एस. एस, माने, कोरडे, स्थानिक सल्लागार समिती अध्यक्ष आर डी पाटीलसुद्धा उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी रोशन मते आणि दर्शना उतेकर यांनी पार केले. तर मान्यवरांचे स्वागत सुप्रिया लाड आणि आभार स्वाती सुर्वेने मानले.

विद्यार्थ्यांनी आपल्या माजी शिक्षकांचे फुलांचा वर्षाव करत स्वागत आणि औक्षण केले. त्यांना शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. फडतरे, सय्यद, पोळके, पी.एस. देसाई, एस टी कांबळे, डी. एस.कांबळे, प्रदीप थोरवडे, के.एन. म्हात्रे, संजय जोहरे, सी.जे. पाटील, सूर्यवंशी, जोशी, पवार उपस्थित होते. हर्ष उल्हासित होऊन मुलांची मनोगते झाली, माजी शिक्षकांनी सुद्धा या दुर्गम भागात ज्ञानार्जनाची सुरुवात आणि त्यांना ग्रामस्थांकडून करण्यात आलेली सहकार्यरुपी मनोगते केली. विद्यार्थी मित्रांनी शाळेतील आठवणींना उजाळा देऊन आपल्यातील सुप्त गुणांना वाव दिला. यावेळी दांडपट्टा, तलवारबाजी, विविध नृत्य, मनोस्तक गप्पा करण्यात आल्या.

## निवडक




## विजया पाटील पुरस्काराने सन्मानित

**हमरापूर :** पेण तालुक्यातील तांबडशेत शाळेच्या शिक्षिका विजया विठोबा पाटील यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अखिल पेण तालुका प्राथमिक शिक्षक वर्धापन दिनानिमित्त गुणवंत शिक्षक पुरस्कार, आदर्श शाळा पुरस्कार आणि सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार सोहळा पेण शहरातील आगरी समाज सभागृहात पार पडला. या कार्यक्रमास पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेडी, गट शिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे, शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रमोद पाटील, जिल्हा सल्लगार किशोर पाटील, पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीचे संचालक विठोबा पाटील, अमरचंद पाटील, आदिनाथ पाटील, मोहन भोईर, नंदकुमार थवई, सरिता पाटील, अरुणा देवी मोरे, राजेंद्र पाटील, प्रवीण पाटील, सदानंद म्हात्रे यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात तालुक्यातील तांबडशेत जि. प. प्राथमिक शाळेच्या शिक्षिका विजया पाटील यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत शिक्षिका हा शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी तालुक्यातील इतर शाळांतील गुणवंत शिक्षक तसेच आदर्श शाळांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## दापोली शहरात स्वच्छता मोहीम



**दापोली :** स्वच्छता मोहिमेंतर्गत दापोली शहरातील लाल कट्टा, नर्सरी रोड, राखीव वनामधून जाणाऱ्या रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. ही मोहीम दापोली वनविभाग व कोकण कृषी विद्यापीठातील वनशास्त्र विभागातील एनएसएसचे विद्यार्थी, नगर पंचायतचे स्वच्छता कर्मचारी यांच्याकडून एकत्रितपणे राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत विद्यापीठातील वनशास्त्राचे एनएसएसचे विद्यार्थी व नगर पंचायत स्वच्छता कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सुमारे एक टन कचरा, तसेच १२११ किलो प्लास्टिक, काचेच्या बाटल्या जमा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच, स्वच्छता केलेल्या ठिकाणी सूचना फलक लावून नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून नये, तसेच कचरा घंटागाडीतच द्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. या अभियास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याने अशाच प्रकारचे स्वच्छता अभियान शहरातील अन्य भागात राबवले जाणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.




## वाहतूक पोलिसांकडून मार्गदर्शन

**चिरनेर :** पोलीस रेझिंग डे सप्ताह तसेच रस्ता सुरक्षा अभियान २०२६ निमित्त न्हावा शेवा वाहतूक शाखा चांदणी चौक येथे वाहन चालक मालक तसेच चौकमध्ये वावरणाऱ्या लोकांना एकत्रित करून वाहतूक नियमाविषयी जनजागृती केली. नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली न्हावा शेवा वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे, अंमलदार प्रभाकर सुलेभाविकर, किरण म्हात्रे यांनी वाहतूक नियमाविषयी जनजागृती करून, रेझींग डेचे बोर्ड दाखवून, तसेच रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वाहनचालक यांना वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन केले. गाडी विरुद्ध दिशेने न चालविणे, दारू पिऊन गाडी न चालवणे, नेहमी लायसन्स जवळ बाळगणे, रिक्षा चालकांनी नेहमी युनिफॉर्म परिधान करणे, गाडी चालवीत असतांना मोबाईलवर संभाषण न करणे, मोटरसायकल चालवीताना हेल्मेट परिधान करणे, भाडे कधीही नाकारू नये, अशाप्रकारचा सूचना दिल्या. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने त्यांच्यादेखील काही समस्या ऐकून त्यांना योग्य ते मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

## वाशिष्टी नदीत मतृदेह सापडला

**चिपळूण :** भराडे येथील व्यापाऱ्याचा मृतदेह सोमवारी दुपारी ४ वाजता वाशिष्ठी नदीपात्रात आढळून आला. विलास महादेव चव्हाण (५०) असे मृत व्यापाऱ्याचे नाव असून ते शुक्रवारी (दि.२) दुपारी ३ च्या सुमारास घरात कोणालाही न सांगता निघून गेले होते. त्याबाबत त्यांची पत्नी विनया चव्हाण यांनी अलोरे शिरगाव पोलीस स्थानकात बेपता झाल्याची तक्रार दाखल केली होती. याबाबत शिरगाव पोलिसांकडून चौकशी सुरू असताना त्यांची दुचाकी पिंपळी येथे वाशिष्ठी कॅनॉलच्या पुलाजवळ चावीसह दिसून आली. मात्र त्यांचा कुठेही तपास लागला नाही. त्यांच्याकडे मोबाइल नसल्यामुळे त्यांचे लोकेशन दिसून येत नव्हते. अशातच वाशिष्ठी नदीपात्रात गांधारेश्वर दरम्यान त्यांचा मृतदेह आढळून आला. याची शिरगाव पोलीस स्थानकात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. त्यांनी आत्महत्या केली की अन्य काही प्रकार घडला आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.

## शिक्षक वर्धापन दिन उत्साहात

**उरण :** अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ शाखा उरणच्या वतीने शिक्षक वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, सरस्वती माता व दादासाहेब दोंदे यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या वर्धापनदिनी संघटनेच्यावतीने तालुक्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रत्येक केंद्रातून एक अशा पाच उत्कृष्ट शिक्षिकेंचा आदर्श शिक्षिका म्हणून गौरव करण्यात आला. तसेच उरण तालुक्यातून सेवानिवृत्त झालेल्या सर्व सेवानिवृत्त बंधू-भगिनींचा देखील शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे तालुक्यातून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांचा देखील यथोचित सन्मान करण्यात आला. त्यानंतर अनेक मान्यवरांनी या संघटनेबद्दल व त्यांनी सुरू ठेवलेल्या स्तुत्य अशा उपक्रमाबद्दल गौरवोदगार काढले.

## निवडक

### उतेखोल शाळेस वॉटर फिल्टर भेट

**माणगाव** : विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद उतेखोल शाळेला क्रातीज्योती सावित्रीबाई



फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून रामनारायण मिश्रा यांच्या हस्ते वॉटर फिल्टर शाळेला भेट देण्यात आले. या कार्यक्रमास रामनारायण मिश्रा, माणगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट तसेच उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सायली अंबुर्ले, अस्मिता खडतर, संतोषी प्रजापती, उपाध्यक्ष दिनेश पोवार, आस्मा माटवणकर, नंदिनी वाढवळ, मयुरी भिलारे, आसावरी पोवार, सुरेखा भला उपस्थित होते. शाळेच्या उपशिक्षिका अस्मिता दिनेश खडतर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



### विजय शापुरकरांना भावपूर्ण निरोप

**मुरूड-जंजिरा** : मुरुड-जंजिरा डाक कार्यालयातून विजय कृष्णा शापुरकर हे वयोमानानुसार पोस्टमन या पदावरून ३६ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावत निवृत्त झाले. त्यांना अलिबाग अधीक्षक डाक विभाग प्रमुख सुनिल थळकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी सहाय्यक अधीक्षक डाक विभाग अलिबाग-रायगडचे राकेश मिश्रा, विनोद मेदार, सुरेश मोरे, दिनेश शापुरकर, दिलीप शापुरकर, सुरेश पाटील, प्रा. मेघराज जाधव, दीपक घाटवळ, मुरुड कार्यालयीन कर्मचारी वृंद व ग्रामीण डाक सेवा वर्ग तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेक मान्यवरांनी त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरच्या काळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



### महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती

**उरण** : कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण-रायगड येथे (दि.७) जानेवारी रोजी तालुका विधी सेवा समिती, उरण यांच्या वतीने कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास एम. एस. काझी, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, उरण, एस. पी. वानखडे, सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), उरण, जी. के. आर. टंडन, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), उरण, वकील संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड. व्ही. एल. पाटील, अ‍ॅड. किशोर ठाकूर, अ‍ॅड. संघश्री गायकवाड, अ‍ॅड. भावेश पाटील, अ‍ॅड. प्रियांका घरत, अ‍ॅड. श्रुती पाटील इतर वकीलवर्ग, न्यायालयीन कर्मचारी, महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच उरण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक दहिफळे यांची प्रमुख उपस्थिती होती. उरण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक दहिफळे यांनी रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांचे पालन करणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) उरण एम. एस. काझी यांनी सर्व विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

### वाहतूक शाखेतर्फे विद्यार्थ्यांचे प्रबोधन

**पनवेल** : नवीन पनवेल येथील पिल्लई कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या एनएसएस. विभागातर्फे सडक सुरक्षा, जीवन रक्षा या संकल्पनेवर आधारित वाहतूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, तुकाराम कदम, युवराज येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, केशव निकम, हनुमंत आंधळे यांच्यासह इतर पोलीस अंमलदार उपस्थित होते. कार्यक्रमास वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची सविस्तर माहिती दिली. तर जीवन शेरखाने यांनी उपस्थित एनएसएस स्वयंसेवकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची सामूहिक शपथ दिली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- पाहिजेत- अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क : श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. (पार्टटाईम अथवा फुलटाईम) संपर्क : ९४२२६९६२३५
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- विकणे आहे : अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मध्य रेल्वेकडून अनागोंदी कारभार

## •पादचारी पूल तोडण्यास सुरुवात •दोन वर्षात लाखो रुपयांचा खर्च वाया

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेवरील मुंबई-पुणे या मेन लाईनवरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात मध्य रेल्वेकडून बांधण्यात आलेला पादचारी पूल एका वर्षाच्या आत तोडण्यात येत आहे. मध्य रेल्वेचे अधिकारी वर्गाचा हा अनागोंदी कारभारावर मुंबई विभागीय महाव्यवस्थापक यांच्याकडून चौकशी होणार काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, एका वर्षात पादचारी पूल तोडावा लागत असल्याने या पुलासाठी झालेल्या खर्चाची वसुली मध्य रेल्वे प्रशासन कोणाकडून करणार आहे? असा प्रश्न उपस्थित नेरळ स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवासीवर्गातून उपस्थित केला जात आहे.




नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात फलाट दोन वरून फलाट एक वर जाण्यासाठी पादचारी पूल आहे. मुंबई एंडकडे असलेला हा पादचारी पूल जेमतेम एक महिन्यापूर्वी प्रवासी वर्गासाठी खुला झाला होता. पादचारी पुलावरून होणारी प्रवासी वाहतूक गेल्या महिन्यापासून बंद करण्यात आली आहे. फलाट दोन वरील पादचारी पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून पादचारी पूल तोडण्यात येणार आहे.त्यामुळे प्रवाशांना फलाट एक वर जाण्यासाठी नेरळ बाजारपेठेतून जावे लागत आहे. तर दुसरीकडे फलाट एक वर फलाट दोन वर येण्यासाठी देखील अन्य पादचारी पुलाचा वापर करावे लागत आहे. मात्र, हा पादचारी पूल कशासाठी तोडण्यात येत आहे हे कोणत्याही प्रवाशाला माहिती नाही. नेरळ स्थानकात मागील वर्षी याच मुंबई रेल्वे महामंडळ यांच्याकडून फलाट एक वरील एक पादचारी पूल असाच तोडण्यात आला होता. त्यावेळी देखील तो पादचारी पूल जेमतेम एक वर्षे देखील त्या पादचारी पुलाचे बांधकाम करून पूर्ण झालेला नव्हता.

**चौकशीची मागणी**

नेरळ स्थानकात दोन पादचारी पूल अवघ्या वर्षात तोडावे लागले आहेत. दोन्ही पादचारी पुलाचे बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे झाले होते काय? याची चौकशी मध्य रेल्वेने करावी अशी मागणी पुढे येत आहे.

स्थानकातील फलाट दोन वरील या पादचारी पूल तोडण्यात येत असल्याने हा पूल बांधणारे रेल्वेचे अभियंते यांची चौकशी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक करणार आहेत काय? असा सवाल नेरळमधील प्रवासी करीत आहेत. नवीन पादचारी पूल तोडला जात असताना त्या पुलांचे उभारणीसाठी आलेला लाखो रुपयांचा खर्च प्रशासन कोणाकडून वसूल करणार? स्थानकात बांधण्यात आलेले पादचारी पूल रेल्वेकडून का तोडण्यात येत आहेत याचा खुलासा रेल्वे प्रशासन करणार आहे का नाही? असा सवाल देखील प्रवासी वर्गातून होत आहे.

## महापालिका निवडणुकीत तरुण उमेदवार रिंगणात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत यंदा केवळ राजकीय पक्षांची ताकदच नव्हे, तर उमेद्वारांचे वय, शिक्षण आणि अनुभव यांचाही कस लागणार आहे. २० प्रभागांतील ७८ जागांपैकी सात जागांवर बिनविरोधाचा निकाल निश्चित होत असताना उर्वरित ७१ जागांसाठी रंगणाऱ्या लढतींमध्ये उमेद्वारांच्या शपथपत्रांतून समोर आलेली शैक्षणिक पात्रता आणि वयोमानाची विविधता लक्षवेधी ठरत आहे.

अनेक प्रभागांमध्ये बीई, बीटेक, एमबीए, एलएलबी, बीएसस्सी, आर्किटेक्चर अशा उच्चशिक्षित तरुण-तरुणींना संधी देण्यात आली आहे. २१ ते ३० वयोगटातील उमेदवार मोठ्या संख्येने रिंगणात उतरले असून, ही पिढी थेट अनुभवी माजी नगरसेवकांशी दोन हात करत असल्याने लढतीन वेगळे परिमाण मिळाले आहे. दुसरीकडे, ५० ते ७० वयोगटातील उमेद्वारांचा अनुभवही दुर्लक्षित झालेला नाही. काही प्रभागांमध्ये पदवीधर, वकील, निवृत्त अधिकारी अशा अनुभवी उमेद्वारांना मतदारांसमोर पर्याय म्हणून उभे करण्यात आले आहेत.

## लायन्स क्लबतर्फे डोळे तपासणी शिबीर

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**




नागोठणे लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष पांडुरंग उर्फ पी. के. शिंदे यांनी आपले वडील कृष्णा पां. शिंदे व आई द्रौपदी कृष्णा शिंदे यांच्या स्मरणार्थ आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने नागोठणे लायन्स क्लबने येथील शांतीनगर भागातील स्व. बाळासाहेब ठाकरे बाल उद्यानात बुधवारी (दि.७) आयोजित केलेल्या नेत्रचिकित्सा शिबिरात ७२ नागरिकांनी त्यांच्या डोळ्यांची तपासणी केल्याने या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये मोतिबिंदू आढळलेल्या २१ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले.

शिबिरास नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष सखाराम ताडकर, प्रकाश जैन, यशवंत चित्रे, विवेक सुभेकर, डॉ. अनिल गिते, विशाल शिंदे, विलास चौलकर, दौलत मोदी, पांडुरंग शिंदे, विजय शहासने, संतोष शहासने, दीपक गायकवाड, सिद्धेश काळे, पूजा शिंदे, ज्योती पाटील, स्वप्ना राणे, अर्पिता जाधव आदींसह अनेक मान्यवर व परिसरातील नागरिक नेत्र तपासणीसाठी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विवेक सुभेकर यांनी केले.

## विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

राजिपची उच्च प्राथमिक शाळा मोरबे, तालुका पनवेल येथे तालुक्याचे पोलीस निरीक्षक इंगोले व त्यांचे सहकारी तसेच उपनिरीक्षक पी. डी. पवार व त्यांचे सहाय्यक राऊत यांनी पोलीस वर्धापनदिन सप्ताह निमित्ताने शाळेस भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती मोरबेचे अध्यक्ष बबन उलवेकर उपस्थित होते. पोलीस वर्धापन दिन सप्ताह निमित्ताने विद्यार्थ्यांना सायबर क्राईमपासून स्वतःचे रक्षण, महिला सुरक्षितता मोहीम, मोबाईलचा योग्य वापर कसा करावा व मुलांवर होणारे अत्याचार याविषयी माहिती दिली.

राऊत यांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन का व कसे करावे याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी चांगला नागरिक बनण्यासाठी प्रामाणिकपणा, जोपासण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पीएसआय यांनी समर्पक अशी उत्तरे देत मुलांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत जागरूकता निर्माण झाली असून सर्व ग्रामस्थ व पालकांनी या मार्गदर्शनाचे कौतुक केले आहे.

या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता साळवी व सर्व शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भयमुक्त निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेची निवडणूक भयमुक्त, निष्पक्ष, पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे यांनी दिले.

निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह सर्व संबंधित विभागांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी पगारे यांनी सांगितले की, महापालिकेच्या निवडणुकीचा पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाला असून तयारी योग्य दिशेने सुरू असल्याचे सांगितले.

मात्र, प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी उद्भवू शकणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी सर्व तयारीची पुन्हा एकदा काटेकोरपणे पडताळणी करावी. प्रशिक्षण, मतदार यादी, पोलिस बंदोबस्त, मतदान केंद्रांवरील साहित्य वितरण आदी सर्व बार्बीची तपासणी करण्याच्या आहेत.

पोलीस विभागामार्फत स्थिर पथके, भरारी पथके व विशेष पथकांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कारवाईची माहिती देण्यात आली. मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी मतदान केंद्रांवर तैनात करावयाच्या पोलीस कर्मचाऱ्यांबाबत, तसेच आवश्यक बंदोबस्ताबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच रात्रीची गस्त, बस व रेल्वेची तपासणी नियमितपणे सुरू असल्याचे सांगण्यात आले.

या बैठकीला निवडणूक निरीक्षक मनीषा कुंभार, निवडणूक अधिकारी मंगेश चितळे, आयकर विभागाचे डॉ. अमित मुंडे, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, तिरुपती काकडे, गणेश शेटे व महेशकुमार मेघमाळे, कैलास गावडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोदी कुटूंबियांकडून रुग्णालयास औषधांची भेट

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

समाजासाठी जगण-ारी माणसे शरीराने जातात, पण त्यांच्या कार्यातून कायम जीवंत राहतात, हे पुन्हा एकदा अधोरेखित करणारा आदर्शवत उपक्रम माणगाव येथे घडला. स्वातंत्र्य सैनिक धनंजीभाई मोदी आणि मोहनभाई मोदी यांच्या समाजसेवेच्या वारसा पुढे नेत तिसऱ्या पिढीतील संदीप मोदी यांनी मोदी कुटूंबीयांकडून आई माधुरी मोदी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी औषधांची भेट देत समाजापुढे नवा आदर्श ठेवला आहे. मंगळवारी (दि.६) जानेवारी रोजी माणगाव उपजिल्हा रुग्णालयास उपचारासाठी आवश्यक असलेल्या औषधांचा साठा औपचारिकरित्या रुग्णालय प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आला. ही भेट केवळ सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरली.



'मरावे पण कीर्ती रूपी उरावे' या उक्तीचा प्रत्यय देत संदीप मोदी यांनी आईच्या स्मृती समाजसेवेच्या माध्यमातून जीवंत ठेवण्याचा संकल्प केला आहे. याप्रसंगी डॉ. महेश मेथा, गवळी, अविनाश साळवी, गोरीवले, अनिल तेटगुरे, तसेच सर्व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## प्रा. ढेपेंना कुलाबा जीवन गौरव पुरस्कार

**माणगाव** : माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक कमाविलेल्या विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल स्व. माजी आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, अ‍ॅड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार भाई जगताप, अलिबाग नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक, अ‍ॅड. उमेश ठाकूर यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

**कालवे स्वच्छ न केल्यामुळे शेतकरी नाराज** | **भात शेतीचे प्रमाण २५ टक्के पेक्षा खाली**

# पाण्याअभावी दुबार शेती संकटात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब रस्त्यावर अवसरे येथे लघुपाटबंधारे प्रकल्प आहे. या प्रकल्पातून गेल्या दहा वर्षापासून शेतीसाठी पाणी सोडण्याचे प्रमाण कमी झाले आहे. दरम्यान, शेतीसाठी पुरेसे पाणी मिळत नसल्याने शेतकरी नाराज असून भाताच्या शेतीसाठी पुरेसे पाणी मिळत नसल्याने शेतकरी भाताची दुबार शेती करीत नाहीत. पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांशी चर्चा करून कालवे स्वच्छ करण्याची कामे करावीत आणि नंतरच पाणी सोडावे अशी मागणी केली आहे, परंतु कालव्यांची स्वच्छता न करता पाणी



सोडण्यात आल्याने शेतकरी नाराज आहेत. अवसरे येथे असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या पाण्यावर पूर्वी अवसरे, वरई, माणिवली, बिरदोले आणि कोदीवले या गावातील शेतकरी भाताची शेती करत होते.

मात्र, धरणातील गाळ काढण्याचे कोणतेही नियोजन पाटबंधार खात्याकडे नसल्याने यथावकाश धरणाचे कळव्यात सोडलेले पाणी पुरेसे मिळेनासे झाले. धरणातील गाळ काढण्यात आलेला नाही आणि त्यामुळे भाताच्या शेतीला पाणी देखील कमी सोडले जाऊ लागले होते.

परिणामी भाताची शेती करणे कमी होऊ लागले आणि आता पाणी सोडले जात आहे, पण ते पाणी भातासारख्या शेतीसाठी अपुरे पडत आहे. त्यात धरणातील पाणी सोडण्यासाठी असलेल्या कालव्यांची अनेक वर्षे दुरुस्ती आणि स्वच्छतेची कामे पाटबंधारे विभागाने केली नाही. त्यामुळे शेवटच्या शेतात चार महिन्यानंतर देखील पाणी पोहचणे बंद झाले आहे.

कोदिवले, बिरदोले आणि अवसरे भागातील काही शेतकरी आजही भाताची शेती करतात, पण दुबार शेती करण्याचे प्रमाण जेमतेम २५ टक्के पर्यंत खाली आले आहे.

अवसरे धरण परिसरातील शेतकरी आजही दुबार शेती करण्यास तयार आहेत, मात्र भाताची शेती करण्यासाठी पाणी पुरेसे क्षमतेने मिळत नाही. शेतकऱ्यांनी भाताच्या शेतीला पाणी मिळावे यासाठी अर्ज निवेदने दिली आहेत आणि दरवर्षी मागणी देखील करीत असतात.

पाटबंधारे खात्याने शेतीला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांचा आगाऊ बैठका घ्यायला हव्यात आणि किती शेतकऱ्यांना दुबार शेतीसाठी पाणी हवे आहे याची चाचपणी करावी अशी मागणी केली आहे.

> “भाताच्या शेतीला आवश्यक असलेले पाणी मिळत नसल्याने भाताची शेती या भागातील शेतकरी करीत नाहीत. दुसरीकडे धरणाच्या जलाशयात साठणाऱ्या पाण्याची क्षमता गाळ साचल्याने कमी झाली आहे, त्यामुळे धरणातील गाळ प्रथम काढावा.”
> -दिनेश कालेकर
> शेतकरी, बिरदोले

सध्या केवळ २५ टक्के भातशेती ओलिताखाली येईल एवढे पाणी पाटबंधारे विभाग सोडत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.-पै |
|---|---|---|---|---|
| सिद्धार्थ सदानंद नाडकर्णी<br>वैशाली सिद्धार्थ नाडकर्णी | १०२ | २६० | २५३.०० | २५-३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ०९/०१/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १६४/१, क्षेत्र ०-१६-७० हे. आर., पो.ख. ०-०१-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-१७-७० हे. आर., आकार ३.५५ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) अरूणा अरूण पाटील, २) शाम बाळाराम थळे ३) विमल कमळाकर पाटील ४) राम बाळाराम थळे ५) जनार्दन बाळाराम थळे सर्व रा. मु. फकीरपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०८/०१/२०२६
**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे ठाणे न्हावे, तालुका खालापुर जिल्हा रायगड येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत ही विद्यमान मालक व कब्जेदार यांचे नावे असून सदर मिळकतीचे टायटल तपासुन घेणेसाठी सदरील नोटीस प्रसिद्ध केली आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे ठाणे न्हावे, तालुका खालापुर, जिल्हा रायगड येथील**

| मालक | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| अविनाश रमेश खटनहार<br>फहीम चांद शेख | ३२/१ | ०-९०-० | ९.७० |
| अविनाश रमेश खटनहार<br>फहीम चांद शेख | ३२/२ अ/१ | ०-५५-०० | ६.४५ |
| अविनाश रमेश खटनहार | ३२/२ अ/२ | ०-२०-५० | ३.०५ |
| अविनाश रमेश खटनहार<br>फहीम चांद शेख | ३२/२ ब | ०-४९-५० | ५.४५ |
| अविनाश रमेश खटनहार<br>फहीम चांद शेख | ३१/२ | ०-३१-४० | ४.२० |
| संगिता नितीन बेलारा | ३३अ/२ | ०-०७-३० | ०.१० |
| रविंद्र चिंधू बोर्ले, शरद चिंधू बोर्ले, विठाबाई रमेश ठोंबरे, हिराबाई रामदास मिसाळ मंगेश चिंधू बोर्ले (तर्फे अविनाश रमेश खटनहार) | ३२/३ | ०-२०-०० | २.३५ |
| निसार इब्राहिम मुलाणी, नासीर इब्राहिम मुलाणी, फातीमा इब्राहिम मुलाणी | ३१/१ | यांचे एकुण क्षेत्रापैकी ०-०२-७३ जे क्षेत्र अविनाश रमेश खटनहार यांना दस्त नं. ११६/२०१५ ने विक्री केले आहे. | |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत, करारनामा अथवा इतर हक्क हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणारे यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत नोंदवावी.

या प्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, आणि बोजारहीत तसेच नंतर येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

दिनांक ०९/१/२०२६
येणेप्रमाणे जाहीर नोटिस
सही/-
Adv.Aysha Hyka Saleem
ऑफिस - ४०१ - ४०५, आय विंग, अरेंज प्लाझा, प्लॉट नं. ५२, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, ठाणे, नवी मुंबई ४००६१४
मो.नं. ८६९२०३८५६७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that I am verifying the title of Owner being Bhartiya Education / Social Charitable Trust, Nagothane through its Chairman Mr. Kishor Otermal Jain in respect of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and, therefore, on instructions, I am issuing this public notice :-

All person(s), institute, etc. claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address and within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights / interest with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

1. All that piece and parcel of land bearing Gat Kramank / Upavibhag 11/B admeasuring 0.55.60 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab / Uncultivable Land admeasuring 0.02.50 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 13.69 Ps., being, lying and situate at Village Velshet, Taluka Roha and District Raigad.
2. All that piece and parcel of land bearing Gat Kramank/ Upavibhag 17 admeasuring 1.16.00 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab / Uncultivable Land admeasuring 0.33.60 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 1.79 Ps., being, lying and situate at Village Velshet, Taluka Roha and District Raigad.
3. All that piece and parcel of land bearing Gat Kramank / Upavibhag 345 admeasuring 0.68.00 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab / Uncultivable Land admeasuring 0.05.20 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 16.98 Ps., being, lying and situate at Village Velshet, Taluka Roha and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402 201.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) अनंत बाबुराव पाटील आणि २) भालचंद्र बाबुराव पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४८७, एकूण क्षेत्र ००.४२.२० (हे.आर.चौ.मी.) आकार ४ रु. ६६ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः

उत्तरेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ४८६
दक्षिणेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ४८९ आणि ४९१ (भाग)
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ४८५
पश्चिमेस आणि त्या दिशेने : नाला

ठिकाण : अलिबाग
दिनांक: _ /०१/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहिर नोटीस

**मा. अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कोर्टात ३२ ग दावा क्र. ९०/२०२५ बाबत**

१. पार्वती नारायण पिलावरे (मयत) वारस नातु
श्री. सुरेश पांडुरंग कोर्पे वादी
रा. येरद, ता. माणगांव, जि. रायगड
विरुध्द
१. विष्णुभाई बाळमुकुंदभाई पिपावत
रा. २७ अश्वराज बंगलो, वेजलपुर अहमदाबाद, गुजरात ३८००१५ प्रतिवादी

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार पार्वती नारायण पिलावरे (मयत) वारस नातु श्री. सुरेश पांडुरंग कोर्पे रा. येरद, ता. माणगांव, जि. रायगड यांनी मा. अपर तहसीलदार माणगांव यांचे कोर्टात कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये विक्री किंमत होणे कामी या कार्यालयाकडे अर्ज केला आहे. कोणाची तक्रार असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी तक्रार नोंदवावी. अर्जदार यांची शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**अनुसुची**

| गावाचे नांव | गट नं/ स.नं. | एकूण क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| येरद, ता. माणगांव | ७६/२ | ०-५१-०० | ०-२५ |

तरी सामनेवाले तसेच अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीस जिथे जिथे ज्यांचा हितसंबंध असेल त्यांस सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील सुनावणी दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे समोर समक्ष किंवा वकीलामार्फत हजर रहावे. दिलेल्या मुदतीत लेखी हरकत दाखल न झाल्यास दाव्याचे कामकाज एकतर्फी चालवून कोर्ट न्यायनिर्णय देऊ शकते याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- माणगांव सही/-
दिनांक :- २६/१२/२०२५ **(सचिन खाडे)**
अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे ढोकशेत, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | सं.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. अभिजित शामराव जेधे | ३५२/१ | ०-६०-०० | ०-२६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :-०९/०१/२०२६
खरेदी घेणार:
१ श्री. ताहेर बदरुदिन ताबांवाला
२. श्रीम. रशिदा ताहेर ताबांवाला
३. श्री. अब्दुलकादेर ताहेर तांबावाला
मो. श्रीयांक जेधे-८२३७२३५५६७
हरेश पुरव - ९८२०३३३०४७
खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता.सुधागड, जि. रायगड. मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री विशाल एकनाथ पाटील मु.मांडवा/मुंबई यांच्या वारसाहक्काची व वडीलोपार्जित मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची जमिन मिळकत असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे ता.अलिबाग | २४३ | ०.३९.९०<br>पो.ख.०.०२.४०<br>एकूण ०.४२.३० | ४.२९ |

सदर वर वर्णनांकीत मिळकत आमचे अशिलांची वडीलोपार्जित मालकीहक्काची मिळकत असून सदर मिळकतीवर आमचे अशिलांचा व त्यांचे इतर सहहिस्सेदार नातेवाईकांचा वडीलोपार्जित वारसाहक्क आहे. सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी मिळकतीच्या तथाकथीत विद्यमान मालक उर्मिला दारब तल्यारखान यांचे विरूद्ध पेण येथील मे उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात आरटीएस अपील क्रमांक २२/२०१९ दाखल केला होता. सदर अपील मा.उपविभागीय अधिकारी पेण यांनी अंशतः हा मान्य करून मा.तहसिलदार अलिबाग यांना सदर आदेशातील मुद्याबाबत व वारसांबाबत फेरचौकशी करण्याचे आदेश दिले होते. सदर कामी मा.तहसिलदार अलिबाग यांनी आरटीएस/कात-७/२४८३/२०२२/फेरचौकशी/२०२३/या फेरचौकशी कामी २१/१०/२०२५ रोजी आमचे आशिलांचा दावा मान्य करून सदर मिळकतीवर आमचे अशिलांचे आजोबा पांडुरंग शंभु पाटील यांचे वारसांची नोंद करण्याचे आदेश दिले आहेत. या सर्व बाबींचा विचार करता सदर मिळकत आमचे अशिलांची कायदेशीर मालकीहक्काची मिळकत असल्याचे स्पष्ट होत आहे.

असे असताना सद्यस्थितीला सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी नाव असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीच्या तथाकथित विद्यमान मालक उर्मिला दारब तल्यारखान या सदर मिळकत आमच्या आशिलांचा कायदेशीर मालकीहक्क व वारसाहक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे आमच्या आशिलांच्या निदर्शनास आले आहे. सबब सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. त्यास आमचे आशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचन चिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग, सही/-
दिनांक : ०८/०१/२०२६
**ॲड.विक्रांत वि.पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

जावक क्रमांक/४४/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ, अलिबाग, रायगड, रायगड, रायगड, रायगड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: RGD/०४७१७/१८/२५
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ०७/२०२६
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक इब्राहिम दळवी फाउंडेशन बारापाडा ता पनवेल जि रायगड बाबत।
न्यासाचा पत्ता :- घर क्रमांक १४८५ ब एमयू पोस्ट बारापाडा, मोहल्ला, रायगड, पनवेल, बारापाडा
अर्जदार अब्दुल हक मोहम्मद इकबाल दळवी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | ENROLLMENT FEES | ५०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु.५०००/- मात्र
(अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत रोख रु. /- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०७-०१-२०२६ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. उल्हास नरहर फाटक रा. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड हे दि. ५/१/२०२६ रोजी मी अलिबाग येथे वकीलांना भेटणेस जिल्हा न्यायालय अलिबाग येथे सकाळी ११.३० वाजता आलो असता आमचे अशिलांकडून मौजे टेकाळी, ता. अलिबाग गट नं. ४७५/१/ब (जुना मौजे आवास, ता. अलिबाग गट नं. १०७१, हिस्सा नं. १ब) या मिळकतीचे दि. ९/२/२००७ रोजीचे मुळ रजिस्टर्ड खरेदीखत व दि. १४/११/२००७ रोजीचे मुळ रजिस्टर्ड हक्कसोडपत्र (अनुक्रमे रजिस्टर्ड दस्त नं. ६७१/२००७ व ५६१४/२००७) हे दोन दस्त एस. टी. स्टँड अलिबाग ते जिल्हा न्यायालय अलिबाग दरम्यान हरविलेले आहेत. त्याबाबत आमचे अशिलांनी अलिबाग पोलीस स्टेशनमध्येही त्या दस्ताचा शोध घेणेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. तरी सदरचे खरेदीखत व हक्कसोड कोणाला प्राप्त झाल्यास ते खरेदीखत खाली सही करणार वकील यांचे पत्यावर आणून द्यावेत. त्याबाबत योग्य ते संबंधित इसमांस इनाम देण्यात येईल. हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि.०७-०१-२०२६.
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे काकळघर, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या गवत बागायत मिळकतीचे विद्यमान मालक महेश कमळाकर केंद्रे, अमर रमेश केंद्रे, रुपाली मंगेश महाडिक व रेश्मा रमेश केंद्रे सर्व रा. काकळघर, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या नांवे असलेली गवत बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करारनामा विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| काकळघर ता.मुरुड | ३५/१ | ०-२४-००<br>पो.ख.०-३०-००<br>एकूण ०-५४-०० | ४.९४ |

या मिळकतीपैकी ०-३२-०० हे. आर. गवत बागायत मिळकतीबाबत

सबब सदरहू गवत बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू गवत बागायत मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०१/२०२६ सही / -
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे काकळघर, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या-त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**
**मिळकतींचे वर्णन**
**मौजे काकळघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| विद्यमान मालकांची नावे (७/१२ प्रमाणे) | गट नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मिटर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| फिरदोस होमी मसानी<br>फरीदा फिरदोस मसानी<br>राजेश सतींदरपाल जग्गी<br>राजेश जग्गी | २४७ | २-९३-००<br>पो.ख.०-४१-००<br>एकुण ३-३४-०० | २.३१ |
| फिरदोस होमी मसानी<br>फरीदा फिरदोस मसानी<br>राजेश सतींदरपाल जग्गी<br>राजेश जग्गी | २५३ | ३-१३-००<br>पो.ख. ०-३१-००<br>एकुण ३-४४-०० | २.५६ |
| | २७५/१ | एकूण क्षेत्र ४-००-०० पैकी | २.१२ |
| फिरदोस होमी मसानी<br>फरीदा फिरदोस मसानी<br>राजेश सतींदरपाल जग्गी<br>राजेश जग्गी | | पैकी १-६०-०० | ०.८५ |
| राजेश सतींदरपाल जग्गी | | पैकी २-४०-०० | १.२७ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : ९/१/२०२६
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/ १, २, तळमजला, 'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी, युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

RASHTRIYA AAROGYA NYAYASANSHODHAN SANSTHA
RAIGAD INSTITUTE OF NURSING EDUCATION
A/P-Murud-Janjira, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad, Maharashtra
(Affiliated to Maharashtra University of Health Science, Nashik)
Institute Code: 09416 MUHS Code: 151146
Contact No.: 9028658792 / 9920261017/ 9819071198 Email: raigadine@gmail.com

WANTED

Applications are invited for filling up the following posts in the above said College /Institute

| Sr. No. | Designation | Subject | Total Posts | SC | ST | VJNT | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN | Person with Disabilities |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Associate Professor/Reader | Medical Surgical Nursing/Foundation of Nursing | 01* | - | - | - | - | - | - | - | 01 | - |
| 2. | Assistant Professor/Lecturer | Medical Surgical Nursing/Foundation of Nursing | 01 | - | - | - | - | - | - | - | 01 | - |
| | | Community Health Nursing | 01 | - | - | - | - | - | - | - | 01 | |
| 3. | Tutor/Clinical Instructor | Nursing | 05 | 02 | 00 | 01 | - | 01 | 00 | 00 | 01 | - |

Note:
1. Nursing teacher shall be registered under the State Nursing Registration Act.
2. Qualification and Experience as per MUHS Nashik. Web: https://www.muhs.ac.in
3.* Indicates Additional Post

Secretary
Rashtriya Aarogya Nyaya Sanshodhan Sanstha

For More Details: www.raigadine.co.in / 9028658792/ 9920261017 / 9819071198

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# ई-रिक्षाची तासनतास प्रतीक्षा

- वीसपैकी नेमक्याच ई-रिक्षा उपलब्ध
- संघटनेच्या मवाळ भूमिकेमुळे वाताहत



| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू होऊन याठिकाणी पर्यटन क्रांती घडत असली तरी, या ई-रिक्षांच्या कमी संख्येमुळे पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दररोज या सेवेचा लाभ असंख्य पर्यटकांसह नागरिक घेत असतात. स्वस्त आणि कमी वेळात प्रवास करण्याची एक उत्तम सुविधा ई-रिक्षाच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. परंतु, केवळ वीस ई-रिक्षांपैकी सात ते आठ रिक्षा सुरू असतात. बाकीच्या विविध कारणांमुळे उपलब्ध नसतात. तसेच, एखादा सरकारी अधिकारी आल्यास उपलब्ध ई-रिक्षांपैकी काही रिक्षा त्यांच्या दिमतीला धावून जातात. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांना तासनतास ई-रिक्षाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे सद्यस्थितीत बंद असलेल्या सात रिक्षा सरकारी अधिकाऱ्यांनी स्वतःच्या कार्यालयीन वापरासाठी सुरू करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

माथेरानमध्ये वर्षभर हजारो पर्यटक भेटी देत असतात. या ठिकाणी पर्यटक आपल्या मुलाबाळांना व कुटुंबातील वयोवृद्ध सदस्यांना सोबत घेऊन येत असतात. माथेरानमध्ये वाहनांना बंदी असल्यामुळे पर्यटकांची वाताहत होते. दस्तुरी नाक्यापासून माथेरानधील पाईंटपर्यंत पायपीट करत यावी लागते. रोज नेरळ-माथेरान अशी मिनिट्रेन धावत असली तरी तिच्या नेमक्याच फेऱ्या असल्यामुळे सर्वांनाच त्यातून प्रवास करणे शक्य होत नाही. एखाद्या खासगी वाहनाने त्यांना माथेरानच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचावे लागते. त्यात आर्थिक भुर्दंडासह वेळेचाही प्रचंड अपव्यय होतो. त्यांनर पुन्हा पायपीट करून माथेरानमध्ये जाताना वेळेच्या अपव्ययासह शारीरीक त्रास देखील सहन करावा लागतो. दरम्यान, सुरुवातीला पायलट प्रोजेक्ट वेळी सात ई-रिक्षा आणल्या होत्या. त्यानंतर संघटनेच्या एकूण ९४ पैकी काही सदस्यांना वीस ई-रिक्षा देण्यात आल्या. त्यातील सात ते आठ रिक्षाच उपलब्ध असतात. बाकीच्या रिक्षा चार्जिंगसाठी लावण्यात येतात, तर काही तांत्रिक बिघाडामुळे बंद असतात. त्यातच संघटनेच्या मवाळ भूमिकेमुळे शासकीय अधिकाऱ्यांचे लांगुलचालन सुरू असून एखाद्या अधिकाऱ्यांचा फोन आला की ताबडतोब त्यांना सेवा देण्यासाठी धावपळ सुरू असते. हे शासकीय अधिकारी मोबदला देतात की 'मुफ्त'संचार करतात? हा जरी संघटनेचा विषय असला तरी जे प्रवासी तासनतास रांगेत उभे राहतात त्यांचा हिरमोड होत असून रिक्षा स्टँडवर अनकेदा वाद निर्माण होत आहेत. दस्तुरी येथून येणाऱ्या सर्व प्रवाशांना रेल्वे स्टेशन जवळील स्टॉपवर सोडण्यात येते. मग या शासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयापर्यंत नेण्याचे लाड का सुरू आहेत. भरमसाठ वेतन घेऊन सुद्धा जर काही अधिकारी मोफत या सेवेचा लाभ उठवत असतील, तर हे पूर्णपणे चुकीचे असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

### बंद ई-रिक्षा सुरू करण्याची मागणी

सुरुवातीला पायलट प्रोजेक्ट वेळी सात ई-रिक्षा आणल्या होत्या. त्यानंतर संघटनेच्या एकूण ९४ पैकी काही सदस्यांना २० ई-रिक्षा देण्यात आल्या. त्यातील सात ते आठ रिक्षाच उपलब्ध असतात. बाकीच्या ई-रिक्षा इतर कारणांनी उपलब्ध नसतात. त्यातच सरकारी अधिकारी आल्यास त्यांच्या दिमतीला उपलब्ध ई-रिक्षा धावून जातात. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिक नागरिकांना ताटकळत बसावे लागते. त्यामुळे सद्यस्थितीत बंद करण्यात आलेल्या आधिच्या सात ई-रिक्षा अधिकाऱ्यांनी वापरासाठी सुरू कराव्यात. त्यासाठी त्यांनी स्वतः शासनाकडे व सनियंत्रण समितीकडे मागणी करावी. या बंद रिक्षा त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या वापरासाठी सुरू करून घेतल्यास कुणालाही अडचण निर्माण होणार नाही, असेही स्थानिकांमधून बोलले जात आहे.

# ओंकार मोहिरेचे उपोषण स्थगित



| पोलादपूर | प्रतिनिधी |

पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या गैरकारभाराविरुद्ध महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुकाध्यक्ष ओंकार मोहिरे यांचे दि.६ जानेवारीपासून उपोषण सुरू होते. अखेर तिसऱ्या दिवशी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे कक्ष अधिकारी संजय कवितके यांनी त्यांच्या मागण्या मान्य केल्या असून त्यांच्य हस्ते उपोषण स्थगित करण्याचे लेखी पत्र आणि लिंबू सरबत स्वीकारून ओंकार मोहिरे यांनी आपले उपोषण स्थगित केले.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे पोलादपूर तालुकाध्यक्ष ओंकार मोहिरे यांनी प्राथमिक शिक्षण विभागाच्या विविध अन्यायकारक व मनमानी धोरणाबद्दल पाठपुरावा करून पोलादपूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाला सुनियोजितपणा आणण्यासाठी प्रयत्न चालवला आहे. यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हित तसेच शैक्षणिक धोरणामध्ये गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्या मनमानी कारभाराच्या तक्रारी याबद्दल पाठपुरावा करण्यात आला आहे. शिक्षण उपसंचालकांपर्यंत झालेल्या या पाठपुराव्यातून प्राप्त आदेशांवर जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग आणि पंचायत समितीकडून योग्य अंमलबजावणी होत नसल्याने ते मंगळवारी (दि.६) उपोषणाला बसले. या उपोषणाबाबत चालढकल करणाऱ्या जि.प. शिक्षण विभागाच्या प्रशासनाला तिसऱ्या दिवशी गांभिर्याने लक्ष पुरवावे लागले. राजिपच्या शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कक्ष अधिकारी संजय कवितके आणि पोलादपूरच्या गटविकास अधिकारी दीप्ती गाट यांनी ओंकार मोहिरे व जि.प. शिक्षणाधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. गेल्या दोन दिवसांपासून ओंकार मोहिरे यांना अपेक्षित लेखी पत्र देण्यासंदर्भात कार्यवाही होत नसताना तिसऱ्या दिवशी पोलादपूर पंचायत समितीचा शिक्षण विभाग आणि गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्या विरुद्ध त्रिसदस्य चौकशी समितीमार्फत चौकशी करून दोष सिद्ध झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्याची लेखी ग्वाही शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले-कावडे यांच्या सहीने देण्यात आली. यावेळी सुभाष साळुंखे यांच्या निलंबनाबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयाने दिलेल्या आदेशाकडे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांच्याकडील पदाचा कार्यभार काढून घेण्यात येऊन त्यांना चौकशीदरम्यान सक्तीच्या रजेवर पाठवून मेमध्ये बदलीच्या कारवाईस पाठवण्याची तोंडी हमी कक्ष अधिकारी कवितके यांनी दिली.

या संपूर्ण चर्चेदरम्यान मनविसे तालुकाध्यक्ष ओंकार मोहिरे, शहराध्यक्ष अनिल खेडेकर, जिल्हा उपाध्यक्ष विवेक ठोंबरे, अथर्व देशमुख, सुरज कदम, प्रवीण पांडे, आदेश गायकवाड, मुश्ताक मुजावर, व इतर कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला होता.

## निवडक



### देवीचापाडा शाळेत वाहतूक जनजागृती

**पनवेल** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवीचापाडा येथे नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे वाहतूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना विविध वाहतूक नियमांची माहिती देण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग पवार यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची सविस्तर माहिती दिली. रस्ते सुरक्षा हा पर्याय नसून ती प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे, असे सांगतानाच दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी चालवताना सीटबेल्टचा वापर करावा, धोकादायकरित्या वाहन चालवू नये, सिग्नलचे पालन करणे व वेगावर नियंत्रण ठेवणे याबाबत माहिती दिली. तसेच, सध्याच्या काळात घडत असलेले सायबर क्राईम बाबत सर्व विद्यार्थ्यांना माहीती देत यापासून सरंक्षण कसे करावे, याबद्दल संपूर्ण माहिती दिली. यावेळी पोलीस हवालदार संतोष पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### स्त्रीरोग तपासणी शिबीर यशस्वी



**नेरळ** : नेरळ येथील हार्मनी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरानमधील गांधी नगर येथे स्त्रीरोग तपासणी आणि मार्गदर्शन शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती आणि वेळेवर उपचार मिळावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हार्मोनि फाऊंडेशनकडून माथेरान शहरात आरोग्य शिबीर आयोजित केले होते. फाऊंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर, संचालिका नम्रता कांदळगावकर व संचालक सुभाष भोसले यांनी सातत्याने राबवण्यात येणाऱ्या अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे ग्रामीण व सामान्य महिलांना मोफत व दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध होत असल्याची माहिती दिली. यावेळी कनिष्का रामाने, अनुजा घाग, नगरसेविका लता ढेबे, प्रतिभा घावरे, अनुसया ढेबे, सुवासिनी शिंदे, गीता जाधव, जयश्री मालुसरे, मेघा कोतवाल, माधुरी बिरमाने, अक्षता पारटे, साक्षी कदम, नताशा मोरे व प्रियांका शेलार आदी महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पत्रकारांना उपयुक्त वस्तुंचे वाटप

**पाताळगंगा** : व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे खालापूर तालुकाध्यक्ष दीपक जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत पत्रकार दिनाचे औचित्य साधून खालापूर पोलीस ठाणे येथे विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले हाते. या उपक्रमांतर्गत पत्रकारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संरक्षणात्मक हेल्मेट तसेच दैनंदिन पत्रकारितेसाठी उपयुक्त डायरी व पेनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणे यांनी केले. यावेळी संकेत घेवारे, मनोज कळमकर, प्रशांत गोपाळे, भाई ओव्हाळ, राकेश खराडे, अर्जुन कदम, प्रसाद अटक, सचिन यादव, राजशेखर परब, किशोरी चेऊलकर, सारिका सावंत, संतोषी म्हात्रे, सुधीर देशमुख, प्रवीण कोल्हे, देवा पवार, सतीश शेवाळे, समाधान दिसले, विशाल वाघमारे, संदीप ओव्हाळ, अमोल सांगळे, एस. टी. पाटील आदी पत्रकार व मान्यवर उपस्थित होते.



# मुरूड किनाऱ्यावर 'सिगल'चे आगमन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

जिल्ह्यात सध्या थंडीचा वाढता कहर असून येथील किनाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात परदेशातील पक्षी स्थलांतर करून येत आहेत. दरम्यान, मुरूड समुद्रकिनारी थंडीचा आनंद घेण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यंदाही परदेशी पाहुणे दाखल झाले आहेत. परंतु, पर्यटकांच्या रेलचेलीमुळे या परदेशी पाहुण्यांनी म्हणजेच सीगल पक्ष्यांनी स्थलांतर केले होते. सध्या समुद्रकिनारी शुकशुकाट पसरला असून पुन्हा सिगल पक्ष्यांचे आगमन झाले आहे. सीगल पक्ष्यांचा नोव्हेंबरपासून प्रजनन काळ सुरू होतो. त्यांचा पांढरा शुभ्र रंग, पंखांवर करडा रंग, लालसर काळी चोच आणि काळेभोर बोलके डोळे असे रुपडे असलेल्या सिगल पक्ष्यांचा डौल असतो. हे पक्षी मुरूडच्या किनाऱ्यांवर प्रचंड संख्येने येत असतात. या पक्ष्यांना पाहण्यासाठी व आपल्या मोबाईलमध्ये टिपण्यासाठी पक्षीप्रेमींची गर्दी होत असते. परंतु, समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी वाढत गेल्याने सिगल पक्षी जास्त काळ थांबु शकले नाहीत. सध्या पर्यटकांची रेलचेल थांबली असून दोन-तीन दिवसांपासून पुन्हा थंडीचा आनंद घेण्यासाठी सीगल पक्षी मुरूड किनारी दाखल झाल्यामुळे शहरातील सर्पमित्र व पक्षी प्रेमी संदिप घरत यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# पालीत शेतकऱ्यांना शेतीविषयी मार्गदर्शन



| सुधागड | प्रतिनिधी |

तालुका कृषी अधिकारी कार्यालय सुधागड-पाली आणि श्री विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट रोहा यांच्या संयुक्त विद्यमानाने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेअंतर्गत संस्था पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी (दि.५) पाली फूड फॉरेस्ट येथे करण्यात आले होते. यावेळी पाली फूड फॉरेस्टचे संस्थापक डी.बी. राय यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीविषयी मार्गदर्शन केले. प्रसाद दगडे यांनी गांडुळ खत, जीवामृत द्रावण, ह्युमिक ॲसिड, पोल्ट्री स्लरी, सप्त धान्य स्लरी यांचे प्रात्यक्षिक सादर केले. या उपक्रमात शेतकरी तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग होता. या प्रशिक्षणाला पालीचे मंडळ कृषी अधिकारी भोसले, परळीचे कोळपे, उप कृषी अधिकारी आढाव व पांढरे, तसेच सर्व सहाय्यक कृषी अधिकारी व कृषी सेवक उपस्थित होते.

# 'संमेलनाध्यक्षांनी वाचन चळवळ राबवावी'

| चिरनेर | प्रतिनिधी |

पुस्तके, ग्रंथ, वृत्तपत्रे यासह सर्व साहित्याच्या वाचनाची गोडी मराठी समाजाला लागावी, यासाठी अखिल भारतीय मराठी संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी पुढाकार घेऊन राज्यात वाचन चळवळ राबविली पाहिजे. यासाठी छोटे मोठे लेखक, पत्रकार, संपादक यांना सोबत घेऊन महाराष्ट्रात कुशल वाचकांची संख्या वाढविण्यासाठी पाटील यांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत महात्मा फुले एज्युकेशन ट्रस्ट-मुंबईचे अध्यक्ष तथा माजी आमदार बाबुराव माने यांनी व्यक्त केले.

सातारा नगरीत गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता झाली. या पार्श्वभूमीवर बाबुराव माने यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांना लिहिलेल्या खुल्या पत्रातून ही मागणी केली आहे.

बाबुराव माने म्हणाले की, आज आपल्या ज्ञानशक्तीचा पाया अत्यंत भुसभुशीत आहे. ज्ञानशक्ती ही वाचनाने समृद्ध होते. परंतु, आज एखाद्या शाळेत डोकावले तर अनेक शाळांत अनेक विद्यार्थ्यांना वाचावे कसे हे माहितच नाही. मोठ्या आवाजात एका लयीत वाचन करणारे विद्यार्थी आणि अशा वाचनाचे धडे देणारे शिक्षक आपल्याला फार कमी दिसत आहेत. यासाठी वाचन चळवळ साहित्यिक, पत्रकार आणि संपादकांच्या माध्यमातून महाराष्ट्रात राबविली गेली तर नक्कीच या चळवळीस चांगले यश येईल, असे मत त्यांनी मांडले.

# मधमाशी पालन प्रशिक्षणाचे आयोजन

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत शुक्रवारी (दि.१६) सकाळी ११ वाजता माणगाव-कोशिंबळे येथे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोफत मधमाशी पालन प्रशिक्षण, तसेच जिल्हा स्तरीय शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र किल्ला-रोहाचे शास्त्रज्ञ, कृषी अधिकारी, किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष टि.एस. देशमुख, जिल्हा अध्यक्ष भरत राणे, महाराष्ट्र संघटक विनायक देशमुख, नरेश म्हस्के, माणगाव तालुका अध्यक्ष रघुनाथ गोसावी तसेच रायगड जिल्ह्यातील सुमारे ५०० शेतकरी सदस्य या कार्यक्रमाचा लाभ घेणार आहेत.

# केंद्रशाळेच्या नूतनीकरण वास्तूचे उद्घाटन

| माणगाव | प्रतिनिधी |



रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील रा.जि.प. केंद्रशाळा गांगवली या शाळेचा पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीतर्फे कायापालट करण्यात आला आहे. नूतनीकरण करण्यात आलेल्या या शाळेचा उद्घाटन सोहळा दि. २२ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

गांगवली ही ५७ विद्यार्थी पटसंख्या असलेली महत्त्वाची केंद्रशाळा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून या शाळेची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. पावसाळ्यात छत गळणे, भिंतींचे प्लास्टर पडणे आणि नादुरुस्त स्वच्छतागृहे यांमुळे विद्यार्थ्यांना वर्गात बसणेही कठीण झाले होते. शाळेच्या या दुरवस्थेमुळे मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत होता. ही गरज ओळखून पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने शाळेच्या संपूर्ण दुरुस्तीचे काम हाती घेतले आणि अल्पावधीतच शाळेचा चेहरामोहरा बदलून टाकला.

या उपक्रमांतर्गत कंपनीने शाळेचे छप्पर बदलून नवीन पत्रे बसविले, संपूर्ण इमारतीचे रंगकाम केले. तसेच, स्वयंपाकघर आणि स्वच्छतागृहांची दर्जेदार दुरुस्ती केली. याशिवाय संपूर्ण शाळेत नवीन इलेक्ट्रिकल फिटिंग आणि प्लंबिंगचे काम करून विद्यार्थ्यांना आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या नवीन रूपामुळे शाळेत आता सुरक्षित आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी पोस्को कंपनीचे अधिकारी यौंग हा किम, महेंद्र तट्टे, माणगावच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बांधकामामुळे पाण्याच्या निचऱ्याला अडथळा | सुजित धनगर रेल्वे प्रशासनाला भिडले

# प्रशासकांच्या कारवाईमुळे नेरळकरांना दिलासा

| नेरळ | प्रतिनिधी |

दरवर्षी पुराच्या पाण्यामुळे नेरळ पूर्व भाग वारंवार पाण्याखाली जातो. त्याचे मुख्य कारण म्हणजे येथील नाल्यात रेल्वे प्रशासनाकडून पाण्याच्या निचऱ्याला अडथळा निर्माण करणारे बांधकाम करण्यात आले आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीवर असलेले प्रशासक अधिकारी सुजित धनगर यांनी थेट रेल्वे प्रशासनाशी भिडण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांनी हे बांधकाम अखेर तोडून नव्याने, मोठ्या प्रमाणात पाण्याचा निचरा होईल, अशा पद्धतीचे बांधकाम करण्यास रेल्वे प्रशासनाला भाग पाडले. त्यामुळे ही कारवाई नेरळकरांसाठी मोठा दिलासा देणारी ठरली आहे.



रेल्वे परिसरातील नैसर्गिक नाल्यावर रेल्वे प्रशासनाने केलेल्या चुकीच्या बांधकामामुळे नेरळ पूर्व भागातील घरे पावसाळ्यात पाण्याखाली जात होती. त्यामुळे निर्माण नगरी, पाडा गेट परिसरातील नागरिकांचे जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले होते. या गंभीर प्रश्नावर केवळ पत्रव्यवहार न करता नेरळ ग्रामपंचायतीवर असलेले प्रशासक सुजित धनगर यांनी आक्रमक भूमिका घेत त्याठिकाणी थेट पाहणी केली. त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना जाब विचारला. तसेच, रेल्वे विभागाला पिण्यास पाणी मिळणार नाही, अशी कठोर भूमिका घेतली. अखेर रेल्वे प्रशासनाने नरमती भुमिका घेत जुने बांधकाम तोडून नव्याने योग्य निचऱ्याचे बांधकाम केले. त्यामुळे पावसाचे पाणी जलदगतीने वाहून जाणार असून नेरळ पूर्व भाग पाण्याखाली जाण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. दरम्यान, नव्या बांधकामाची पाहणी प्रशासक अधिकारी सुजित धनगर यांनी केली.

### नेरळकरांच्या हितासाठी कठोर निर्णय

प्रशासक अधिकारी म्हणून सुजित धनगर यांनी आजवर अनेक कठोर निर्णय घेत नेरळकरांच्या हितासाठी ठोस योगदान दिले आहेत. त्यांच्या कार्यकाळात नेरळ शहरात दोन वेळेचा नियमित पाणीपुरवठा सुरू झाला असून ज्या भागात अद्याप पाणी पोहोचत नाही, तिथेही लवकरच पाणीपुरवठा व्हावा यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. याशिवाय ग्रामपंचायतीच्या विद्युत बिलामध्ये मोठी सवलत मिळवून देण्यातही त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त लावण्यासाठीही त्यांनी कठोर भूमिका घेतली असून प्रशासन अधिक गतिमान झालेले दिसत आहे. ज्या काळात राजकीय सत्ताधाऱ्यांनी नेरळकरांना संकटात टाकले, त्या कठीण परिस्थितीत प्रशासक म्हणून अनेक अडचणींना सामोरे जात सुजित धनगर यांनी प्रामाणिकपणे नेरळकरांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : उपजत कला-गुणांना उत्तम वाव मिळेल. व्यवसायात नवे करार मार्गी लागतील. बाकी चिंता नसावी.
- **वृषभ** : एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करा. महत्त्वाच्या निर्णयात धरसोडपणा टाळावा. जुनी येणी वसूल होतील.
- **मिथुन** : अपेक्षित साध्य झाल्याने समाधान लाभेल. स्वमताग्रह टाळायला हवा. नातलगांच्या भेटी होतील.
- **कर्क** : कसल्याही आमिषाला बळी पडू नका. अनुभवींचा सल्ला लक्षात घ्यावा. जोडीदाराचं सहकार्य लाभेल.
- **सिंह** : आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील. साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **कन्या** : दिलासादायक घटना घडतील. नव्या योजनांना गती मिळेल. नोकरीसाठी मुलाखतीत यश मिळेल.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. कारकिर्दीत नवा उत्साह राहील. प्रियजनांच्या भेटीचे योग आहेत.
- **वृश्चिक** : व्यवसायात अचानक अडचणी येतील. मन विचलित होऊ शकेल. पुरेसा संयम बाळगायला हवा.
- **धनु** : कामाची योग्य आखणी करून घ्या. चैनीवर खर्च करणं टाळायला हवं. प्रेम प्रकरणात वाद संभवतात.
- **मकर** : कौटुंबिक प्रश्न चिंता वाढवतील. नवे करार तुर्तास करू नयेत. निराशा वाढवणाऱ्या घटना संभवतात.
- **कुंभ** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. घरातील ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी वाटेल. विचारानं रहायला हवं.
- **मीन** : अपेक्षित वार्ता कानी येईल. पती-पत्नीच्या नात्यात सुसंवाद ठेवावा. मानसिक स्वास्थ लाभेल.

## दिनविशेष

### ९ जानेवारी

१९३४ : प्रख्यात पार्श्वगायक महेंद्र कपूरचा जन्म.
१९५१ : न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांचे मुख्य कार्यालय सुरु झाले.
२०१३ : राज्यातील भीषण दुष्काळावर मात करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीअंतर्गत ७७८ कोटी रुपये निधी देण्याचा निर्णय घेतला.
२०१४ : काही अटींवर होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे वापरण्यास परवानगी देण्यात आली.

## आरोग्यमंत्र

### मिश्र धान्यांच्या सेवनाने...

मल्टी ग्रेन किंवा मिश्र धान्यं आरोग्यासाठी फायदेशीर असतात. गहू, हरभरे, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका,बार्ली, सोयाबीन,तीळ, आदी.धान्यं एकत्र दळून पीठ तयार केलं जातं. वेगवेगळ्या प्रकारची धान्यं किंवा मिश्रधान्यांचं पीठ खाल्ल्याने एकाच वेळ बरेच लाभ मिळू शकतात. त्याविषयी...

१ मल्टीग्रेन पीठ किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ आपल्या शरीरात एकाच वेळी विविध पोषक तत्वांची पूर्तता करतात. या धान्यांमधले पोषक घटक अनेक शारीरिक समस्यांवर प्रभावी ठरू शकतात.



२ आहारात मिश्र धान्यांचा समावेश केल्याने शरीराला भरपूर फायबर मिळतं. त्यामुळे पचनसंस्था उत्तम कार्य करते. धान्यांमधल्या फायबरमुळे बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.

३ जेव्हा शरीराला जास्त फायबर मिळतं, तेव्हा ते वजन कमी करण्यासाठी आणि लठ्ठपणा कमी करण्यासाठी खूप उपयुक्त ठरतं. म्हणूनच वजन कमी करणाऱ्यांनी पूर्ण धान्यं खायला हवीत.

४ मल्टीग्रेन अनेक पोषक तत्वांचा पुरवठा करतात. या पोषक घटकांमुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते.

५ मधुमेह आणि रक्तदाबाच्या रुग्णांनी मिश्रधान्यांचं सेवन करायला हवं.

## फॅशन-पॅशन

### स्टायलिश कुर्ता, एव्हरग्रीन जीन्स

वॉर्डरॉबमध्ये वेगवेगळ्या स्टाईलचे, फॅशनचे कुर्ते असतात. हेच कुर्ते तुम्ही जीन्सवरही कॅरी करू शकता.

✻ फ्रंट ओपन कुर्त्यांची सध्या बरीच चलती आहे. असे कुर्ते जीन्सवर घालता येतील. डिस्ट्रेस्ड किंवा बॉयफ्रेंड जीन्सवर असे कुर्ते शोभून दिसतील. ✻ सिंपल पण स्टालयिश दिसायचं असेल तर कुर्त्यासोबत स्कार्फ कॅरी करा. जीन्सवर असा कुर्ता घालून गळ्याभोवती स्कार्फ गुंडाळता येईल. लिनन, खादीसह वेगवेगळ्या फॅब्रिक्सच्या कुर्त्यांसह जीन्स मस्त दिसेल. ✻ हाय ॲण्ड लो कुर्त्याची फॅशन आहे. हा प्रकारही जीन्सवर घालता येतो. त्यावर स्टेटमेंट नेकलेस किंवा कानातलं घालून इंडो-वेस्टर्न लूक मिळवता येईल. ✻ पेप्लम ही एक वेगळी स्टाईल आहे. या स्टाईलचे शॉर्ट कुर्ते आणि फ्रॉक्स मिळतात. या कुर्ते घेरदार असतात. हा प्रकार जीन्सवर खूपच खुलून दिसतो. स्टायलिश लूकमुळे हे कुर्ते भाव खाऊन जातात. ✻ प्रत्येकीकडे अनारकली कुर्ता असतोच. या कुर्त्याला मस्त ट्विस्ट देता येईल. चुडीदार, लेगिंग्जऐवजी जीन्सवर तो घालता येईल. रिप्ड जीन्सवर तो शोभून दिसेल. हाय स्लीट कुर्ता आणि जीन्सही मस्त कॉम्बिनेशन आहे.

## सफर देशांची

### निसर्गसंपन्न स्कॉटलंड

'युनायटेड किंगडम'चा भाग असणारा स्कॉटलंड हा पश्चिम युरोपातला देश. एडिनबर्ग ही या देशाची राजधानी. स्कॉटलंड हिरवाईने नटलेला आहे. या देशात घनदाट जंगलं, उंचच उंच डोंगररांगा आणि निळ्या पाण्याची तळी पहायला मिळतात. निळाशार समुद्रही स्कॉटलंडची शान आहे. स्कॉटलंड हे विविध प्रजातींचे प्राणी, पक्षी आणि जलचरांचं माहेरघर आहे. या देशात प्राणी आणि पक्ष्यांच्या दुर्मिळ प्रजातींचं जतन करण्यात येतं. बाराशे वर्षांपूर्वीपासून इथे माणसांनी वस्ती करायला सुरूवात केल्याचे पुरावे आढळतात. स्कॉटिश लोकांनी विविध संकल्पना रूढ केल्या. बरेच शोध लावले. स्थापत्यशास्त्राशी संबंधित नवं तंत्रज्ञान विकसित केलं. टेलिफोन, टेलिव्हिजन, वाफेचं इंजिन, ॲनेस्थेशिया, पेनिसिलिन आणि सायकल यांचा शोध लावणारे संशोधक स्कॉटिश होते. इतकंच नाही तर स्कॉटलंडने बरेच खेळाडूही घडवले. या देशातल्या ॲथलिट्सनी ऑलिम्पिकमध्ये पदकं जिंकली. अलिकडेच टेनिसमधून निवृत्ती पत्करलेला जगविख्यात खेळाडू अँडी मरे स्कॉटलंडचाच. स्कॉटलंडचे काही लेखक आणि कवीही जगप्रसिद्ध आहेत. त्यामुळे या देशाने अनेक थोर व्यक्तिमत्त्वं घडवली असं म्हणता येईल.

## पंचांग

**शुक्रवार, ९ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. ७, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : उ. फाल्गुनी, योग : शोभन,
सूर्योदय ७.१६, सूर्यास्त ६.१६

## फॉरवर्डस

**मशवरें देनें लगें हैं वो हज़ार...**

**जो बिक़ चुकें हैं सरे बाज़ार...!**

## सेव्हिंग मंत्रा

योग्य नियोजन केलं तर तुम्ही बराच पैसा साठवू शकता. दीर्घकाळासाठी नियमितपणे थोडा-थोडा पैसा गुंतवला तर श्रीमंती तुमच्याकडे चालत येईल.

✻ शेअरबाजारातली गुंतवणूक जोखमीची असली तरी श्रीमंत होण्यासाठी थोडा धोका पत्करण्याची तयारी ठेवायला हवी. शेअर्स, म्युच्युअल फंड, ईएलएसएस फंडांमध्ये गुंतवणूक केल्याने तुमचा पैसा वेगाने वाढेल. गुंतवणुकीच्या पारंपरिक पर्यायांपेक्षा इक्विटीतून खूप चांगला परतावा मिळतो. मात्र हे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करा. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

### व्हा एअरॉनॉटिकल इंजिनिअर

सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात व्यापारीदृष्ट्या देवाण-घेवाणीवर भर दिला जात आहे. साहजिक वाहतूक क्षेत्राला महत्त्व आलं आहे. हवाई वाहतूक क्षेत्रही याला अपवाद नाही. विविध शहरांमध्ये विमानसेवा उपलब्ध झाली असून त्या ठिकाणी वाहतुकीसाठी चांगला प्रतिसादही मिळत आहे. या साऱ्यांचा परिणाम म्हणून या क्षेत्रात कारकीर्दीला चांगला वाव मिळू लागला आहे.



या क्षेत्रात इंजिनिअर, सायंटिस्ट किंवा टेक्निशियनपासून बिझनेस मॅनेजमेंटपर्यंत अनेक पदांचा समावेश आहे. त्यात एअरोस्पेस इंजिनिअरिंग हे वेगानं विकसित होणारं क्षेत्र आहे. यात एअरक्राफ्ट फ्लीट प्लॅनिंग अँड मेंटेनन्स उद्योगाचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असून त्यादृष्टीने या क्षेत्रात विविध पदांवर अनेकांना संधी प्राप्त होऊ शकते. या संदर्भातील विविध अभ्यासक्रम पंजाब इंजिनिअरिंग कॉलेज, चंदीगड, आय.आय.टी (मद्रास, कानपूर, मुंबई आणि खरगपूर), इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एअरॉनॉटिकल इंजिनिअरिंग, डेहराडून, मद्रास इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, चेन्नई, आय.आय.ए. ई.आय.टी., पुणे आणि सरदार वल्लभभाई पटेल इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, गुजरात या संस्थांमध्ये उपलब्ध आहेत. यातील कोणत्याही संस्थेत प्रवेश घेऊन हवाई वाहतूक क्षेत्रातील कारकिर्दीचं स्वप्न पूर्ण करता येईल.

## खेचाखेची

### दु:खी माणूस

जगातील सर्वात दु:खी माणूस म्हणजे पाणीपुरी वाला...
.
.
.
.
.
विवाहित असो की अविवाहित, मुली त्याला भैय्याच म्हणतात!

## वेगळं काही

सध्याच्या आकाराचा टूथब्रश १४०० वर्षांपूर्वी अस्तित्त्वात आला. ईसवी सन ६१९ मध्ये चीनमध्ये टूथब्रशचा शोध लागला. त्यावेळी चीनी लोक बांबूच्या दोन दांड्या जोडून त्यावर प्राण्यांचे केस लावून दात घासायचे. भारतात लोक कडुनिंबाच्या कांड्यांनी दात स्वच्छ करायचे. ग्रामीण भागात अजूनही या कांड्या वापरल्या जातात. काळानुरूप टूथब्रशमध्ये बरेच बदल झाले. प्रत्येक प्रकारच्या दातांसाठी ब्रश बनवले गेले. या प्रक्रियेत त्याचा आकार मात्र बदलला नाही. पण आता एका कंपनीने अनोखा टूथब्रश तयार केला आहे. 'फास्टिश' या फ्रेंच कंपनीने तयार केलेला 'व्हाय' आकाराचा हा ब्रश फक्त दहा सेकंदांमध्ये दात स्वच्छ करू शकतो. **(क्रमश:)**

## रूचिरा

### थंडीसाठी बेस्ट सूप



आता गुलाबी थंडीला सुरूवात झाली आहे. थंडीत गरमागरम सूप प्यायल्यावर छान तरतरी येते. तुम्ही घरी निरनिराळी सूप्स बनवत असाल, तर मशरूम सूप थंडीसाठी बेस्ट आहे.

**साहित्य** : २०० ग्रॅम पांढरे बटण मशरूम्स, दोन कप पातीचे कांदे (गोलाकार), अर्धा टी स्पून लसूण, आलं पेस्ट, एक टी स्पून बारीक चिरलेली सेलरी, अर्धा टी स्पून मिरपूड, एक टी स्पून सोया सॉस, तीन कप पाणी, पाच टेबलस्पून चिरलेली कांद्याची पात, चवीनुसार मीठ, तिळाचं तेल इत्यादी.

**कृती** : बटण मशरूम्स स्वच्छ धुवून बारीक तुकडे करा. कढई किंवा पॅनमध्ये अर्धा टेबलस्पून तिळाचं तेल घेऊन त्यात वाटलेलं आलं, लसूण घाला. चांगलं परतून घ्या. त्यात चिरलेला पातीचा कांदा घालून परता. मशरूम, सेलरी घाला. मध्यम आचेवर दोन मिनिटं परतून घ्या. आता तीन कप पाणी घाला. सूप मंद आचेवर चार ते पाच मिनिटं शिजवून घ्या. सोया सॉस घाला. वर मिरपूड, चवीनुसार मीठ घाला. सूप साधारण १५ मिनिटे मंद आचेवर ठेवा. उकळल्यावर गॅस बंद करा. या सूपमध्ये चिरलेली कांद्याची पात घाला. गरमागरम प्यायला द्या.

## सुडोकू ५१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३ | | ७ | | |
| | ४ | | ९ | | ८ | | | |
| ३ | | | २ | | ७ | | | |
| ७ | | | ८ | | | ५ | ४ | |
| | १ | ४ | | ५ | | ८ | ७ | |
| | ५ | ८ | | | १ | | | ३ |
| ८ | | | ६ | | ३ | | | ९ |
| | | | ७ | | ९ | | २ | |
| | | २ | | ४ | | | | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | ७ | ३ | ५ | ८ | ४ | ६ | २ |
| ८ | ३ | ६ | १ | ४ | २ | ५ | ९ | ७ |
| ४ | ५ | २ | ६ | ७ | ९ | १ | ८ | ३ |
| ९ | ८ | ३ | ५ | ६ | १ | २ | ७ | ४ |
| ७ | २ | ५ | ८ | ९ | ४ | ६ | ३ | १ |
| ६ | १ | ४ | ७ | २ | ३ | ९ | ५ | ८ |
| ३ | ४ | १ | ९ | ८ | ६ | ७ | २ | ५ |
| २ | ७ | ९ | ४ | ३ | ५ | ८ | १ | ६ |
| ५ | ६ | ८ | २ | १ | ७ | ३ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ५१

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ■ | ७ | | ८ | ९ |
| | ■ | १० | | ११ | ■ | ■ | १२ | | १३ | | ■ | १४ | |
| १५ | १६ | | ■ | १७ | १८ | १९ | ■ | २० | | | ■ | २१ | |
| २२ | | ■ | २३ | | | | | ■ | ■ | २४ | | | ■ |
| २५ | | २६ | | | ■ | | ■ | २७ | २८ | | ■ | २९ | ३० |
| ■ | ३१ | | | ■ | ३२ | | ३३ | | | | ■ | ■ | |
| ३४ | ■ | | ■ | ३५ | | ■ | | ■ | | ■ | ३६ | ३७ | |
| ३८ | | | ३९ | ■ | ■ | ४० | | ४१ | ■ | ४२ | | | |
| | ■ | ४३ | | | ४४ | ■ | ■ | ४५ | | | ■ | ■ | |
| ४६ | ४७ | ■ | | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ५० | | ५१ | ■ |
| ५२ | | ५३ | ■ | ५४ | | | ■ | ५५ | | | ■ | ५६ | |
| ■ | ५७ | | ५८ | | ■ | ५९ | | | ■ | ■ | ६० | | ■ |
| ६१ | | | | | ■ | | ■ | ■ | ६२ | | | | ६३ |
| | ■ | | ■ | ■ | ६४ | | | | | ■ | | ■ | |

**आडवे शब्द :-**
१) घरधनीण
४) पराजय
७) तादाम्य, एकरुप
१०) पार्वतीनंदन
१२) बडबड
१४) काळपुरुष
१५) अर्धवर्तुळाकार
१७) चणचण, न्यूनता
२०) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
२१) होडी
२२) वल्हरी
२३) इतराहून वेगळा
२४) धर्माज्ञा
२५) हल्ला करणारा (हिं.)
२७) भेग, चीर
२९) अस्वल
३१) यज्ञ
३२) गडीमाणसे
३५) स्तुती करणारा
३६) सारखा
३८) नामशेष
४०) पडणे
४२) दक्षिणेतील फटाके निर्मितीचे गाव
४३) एक प्रकारची मोठी तलवार
४५) पक्षांचा राजा, श्रीविष्णूचे वाहन
४६) विशेष
४८) माळी
५०) सरकारी नियम
५२) कळलाव्या मुनी
५४) अनाथ
५५) पदर
५६) मयूर
५७) उंबरठा
५९) अर्धा शेर
६०) मोठी नदी
६१) अनुमती
६२) व्याजाने कर्ज देण्याचा धंदा
६४) फार प्रयत्नाने, जेमतेम.

**उभे शब्द :-**
१) कुटुंबातील भांडण
२) नभ, व्योम
३) धातूचे चलन
५) संसार, जन्म, उत्पत्ती
६) व्यर्थ बडबड, चऱ्हाट
७) किरकोळ सामान
८) प्रत्येक कुळाशी साऱ्यासंबंधी वेगवेगळा करार करण्याची पद्धती
९) युद्ध
११) प्रेत ठेवण्याची जागा
१३) व्रत
१६) आईचे वडील, आजोबा
१८) जुनेच्या विरुद्ध
१९) वर्तन
२३)वेगवान
२६) तमासगीर, लावणी म्हणणारा
२७) ठसा, छाप, ओतणी, मूस
२८) खिळे उपटण्याचे हत्यार
३०) सोशीक
३२) कागदी चलन
३३) प्रजा
३४) धान्य साठविण्याची जागा
३६) सवय, राबता
३७) एक सुगंधी वनस्पती
३९) पैशाचा चौथा भाग
४१) पोलिस
४२) शिंपडणे
४४) दगडाचा एक प्रकार
४७) टोळीचा, सैन्याच्या पथकाचा प्रमुख
४९) सततचा नकार
५१) श्रीकृष्णाचे एक नाव
५३) द्वार
५४) घटस्फोटीत स्त्रीला नवऱ्याकडून दरमहा मिळणारी रक्कम
५८) अरण्य
६०) होकारच्या विरुद्ध
६१) पंख
६२) शामची आई चे लेखक ✻✻ गुरुजी
६३) पोपट

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बो | ल | प | ट | ■ | त | मा | म | ■ | का | ल | ह | र | ण |
| ल | ■ | सा | प | ट | ■ | ग | त | का | ल | ■ | ज | व | ■ |
| घे | रा | ■ | ■ | क | सा | ■ | ल | वा | ■ | टा | र | ■ | जी |
| व | न | रा | ज | ■ | ख | रा | ब | ■ | का | क | ■ | भा | व |
| डा | ■ | म | न | ध | र | णी | ■ | क्ष | प | ण | क | ■ | न |
| ■ | मी | ■ | ग | ■ | पे | ■ | त | मा | ■ | खा | र | ट | ■ |
| पा | ■ | स | ण | वा | र | ■ | ल | ■ | सा | र | क | ■ | गो |
| रा | म | रा | म | ■ | णी | ■ | वा | प | र | ■ | री | त | ■ |
| ■ | धु | ■ | न | फा | ■ | स | र | ■ | वा | ह्या | त | ■ | दा |
| म | क | र | ■ | या | च | क | ■ | म | न | ■ | ■ | ■ | रो |
| न | र | मा | ई | ■ | र | ट | र | ट | ■ | नि | ■ | अ | दा |
| क | ■ | ना | श | क | ■ | नि | ■ | का | र | खा | न | दा | र |
| व | ल | य | ■ | ब | द | क | र्म | ■ | द | ल | द | ल | ■ |
| डा | ■ | क | स | र | ■ | ट | ■ | का | न | स | ■ | त | ळ |

## निवडक

### सरफराज खानचा पराक्रम

**मुंबई :** टीम इंडियाबाहेर असलेल्या सरफराज खान याने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत आक्रमक अंदाजातील फटकेबाजीसह पुन्हा एकदा लक्षवेधून घेतलं आहे. पंजाबविरुद्धच्या सामन्यात मुंबईच्या संघाकडून खेळताना त्याने अवघ्या १५ चेंडूत अर्धशतक साजरे केले. या कामगिरीसह विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत सर्वात जलदगतीने अर्धशतक झळकावण्याचा विक्रम आता सरफराज खानच्या नावे झाला आहे. त्याचा हा आक्रमक



अंदाज चेन्नई सुपर किंग्सच्या संघासाठीही मोठा दिलासा देणारा आहे. कारण मिनी लिलावात अनसोल्ड राहिल्यावर च्या संघाने सरफराज खानवर भरवसा दाखवला होता. देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित अशा विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत याआधी सर्वात जलद अर्धशतकी खेळीचा विक्रम हा अतित शेठ याच्या नावे होता. २०२०-२१ च्या हंगामात त्याने बडोदा संघाकडून खेळताना छत्तीसगडविरुद्धच्या सामन्यात १६ चेंडूत अर्धशतक झळकावले होता. त्याला मागे टाकत सरफराज खान याने नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. पंजाबविरुद्धच्या सामन्यात सरफराज खान पहिल्या चेंडूपासून आक्रमक अंदाजात खेळताना दिसला. १० वे षटक घेऊन आलेल्या अभिषेक शर्माच्या एका षटकात त्याने तब्बल ३० धावा कुटल्या.



### आरडीसीए जिल्हास्तरीय परीक्षा उत्तीर्ण

**क्रीडा प्रतिनिधी :** रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रिकेट पंचांसाठी १०० दिवसांचे ऑनलाइन व प्रत्येक्ष कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशिक्षण शिबिराचे आयोजन जून ते सप्टेंबर २०२५ मध्ये करण्यात आले होते. त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींची परीक्षा घेण्यात आली होती. या प्रशिक्षण शिबिरामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी माजी रणजीपट्टू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे व रायगड जिल्ह्यातील क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा यांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले. शिबिरासाठी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी यांना क्रिकेट संदर्भातले सर्व नियम, विविध क्रिकेट फॉरमॅट मधील प्लेइंग कंडीशनस तसेच क्रिकेटमधील नवीन अस्तित्वात आलेल्या नियमांची सखोल माहिती या शिबिरामध्ये देण्यात आली. प्रशिक्षण घेण्यासाठी रायगड जिल्ह्यातील विविध भागातील ४२ पंचांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये महिला पंचांनी देखील उत्साहाने सहभाग घेतला होता.

### ऑस्ट्रेलियाने केला इंग्लंडचा पराभव

**सिडनी :** ऑस्ट्रेलियाने अॅशेस मालिकेतील अखेरच्या पाचव्या कसोटीत इंग्लंड संघावर ५ विकेट्सने शानदार विजय मिळवला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा ४-१च्या फरकाने मालिकेत पराभव केला आहे. सिडनी कसोटी जिंकण्यासाठी इंग्लंडने ऑस्ट्रेलियासमोर १६० धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे त्यांनी शेवटच्या दिवसाच्या खेळात ५ विकेट गमावून पूर्ण केले. मिचेल स्टार्क व ट्रॅव्हिस हेड हे दोघे ऑस्ट्रेलियाच्या मालिका विजयाचे हिरो ठरले. मिचेल स्टार्कने ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजी विभागाची धुरा सांभाळत उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्याने या मालिकेत सर्वाधिक ३१ विकेट्स घेतल्या, यासह तो मालिकावीरही ठरला. सर्वाधिक सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचं नेतृत्त्व केलेल्या स्टीव्ह स्मिथने ट्रॉफी स्वीकारत ती पॅट कमिन्सच्या हातात दिली आणि दोघांनी ट्रॉफी उंचावत मालिका विजय साजरा केला. सिडनी कसोटीत इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. इंग्लंडचे टॉप-३ फलंदाज लवकर बाद झाले, पण जो रूट व हॅरी ब्रुकने संघाचा डाव सावरला. रूटने २४२ चेंडूत १५ चौकारांच्या मदतीने १६० धावांची खेळी केली. तर हॅरी ब्रुकने ९७ चेंडूत ६ चौकार व एका षटकारासह ८४ धावा केल्या. याशिवाय जेमि स्मिथने ४६ धावांची खेळी करत संघाला ३८४ धावांचा टप्पा गाठून दिला. पहिल्या डावात इंग्लंडकडून जो रूटने सर्वाधिक १६० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेड व स्टीव्ह स्मिथ यांनी पहिल्या डावात दोन शतकं झळकावली. हेडच्या १६३ धावा व स्मिथच्या १३८ धावांच्या बळावर ऑस्ट्रेलियाने ५६७ धावा केल्या आणि १८३ धावांची आघाडी मिळवली.दुसऱ्या डावात फलंदाजी करताना इंग्लंडकडून डकेटने ४२ धावांची खेळी केली. तर २२ वर्षीय जेकब बेथलने मेडन शतक झळकावत १५४ धावा केल्या.

# बांगलादेशला आणणार ताळ्यावर

## ■ सामने भारताबाहेर हलविण्यास आयसीसीचा नकार; अद्यापही चर्चेचे गुऱ्हाळ सुरू

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारतात नियोजित सामने श्रीलंकेत हलविण्याची बांगलादेश क्रिकेट मंडळाची विनंती आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने फेटाळून लावली आहे. भारतात कोणत्याही संघाला सुरक्षेचा धोका असल्याची माहिती आम्हाला मिळालेली नाही आणि सदस्य खेळ करारानुसार ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे बांगलादेश संघाला भारतातच सामने खेळावे लागतील, असे मंगळवारी रात्री उशिरा झालेल्या आभासी बैठकीत आयसीसीने स्पष्ट केल्याची माहिती मिळाली आहे.



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या सूचनेनंतर आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला संघमुक्त केले. या पार्श्वभूमीवर, बांगलादेशातील हंगामी सरकार आणि बीसीबीने आक्रमक भूमिका घेताना, आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आपला संघ भारतात पाठविण्यास नकार दिला. सामने सह-यजमान असलेल्या श्रीलंकेत खेळविण्याची बीसीबीने आयसीसीकडे विनंती केली. मात्र, ती अमान्य करण्यात आली आहे. आता पुढील निर्णयासाठी बीसीबीने वेळ मागितला आहे. सध्या आयसीसी कोणताही पर्यायी कार्यक्रम तयार करत नसून अंतिम निर्णय शनिवारपर्यंत घेतला जाणे अपेक्षित आहे.

आयसीसीकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली नसली, तरी आयसीसीने आपल्या विनंतीला प्रतिसाद दिल्याचे बीसीबीकडून सांगण्यात आले आहे. भारतामध्ये बांगलादेश संघाच्या सुरक्षिततेबाबत व्यक्त केलेल्या चिंतेसंदर्भात आयसीसीकडून आम्हाला उत्तर मिळाले आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषकात बांगलादेश संघाचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आयसीसी कटिबद्ध आहे. सुरक्षाव्यवस्थेबाबत बीसीबीने उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेतले जातील आणि त्यावर सखोल चर्चाही होईल असे आयसीसीने आम्हाला आश्वासन दिले आहे.

कुठल्याही संघाला भारतामध्ये कोणताही धोका नसल्याचे आयसीसीने स्पष्ट केले आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेला आता महिनाभराचा कालावधीच शिल्लक आहे. इतक्या कमी वेळेत वेळापत्रक बदलणे शक्य होणार नाही. बीसीबीला सदस्य खेळ करार अर्थात एमपीएची आठवण करून देण्यात आली आहे, असे सूत्रांनी सांगितले.

बांगलादेशला त्यांचे सामने भारतातच खेळावे लागणार यावर आयसीसी ठाम राहिल्याने बीसीबीलाच आता नमते घ्यावे लागणार असल्याचे चित्र आहे. सध्या बांगलादेशसमोर त्यांच्या सरकारकडून भारतात जाण्यास परवानगी मिळवणे हा एकमेव पर्याय आहे. आम्ही आयसीसी आणि संबंधित यंत्रणांशी चर्चा सुरू ठेवू. संघाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे हेच आमचे ध्येय आहे,असे बीसीबीने स्पष्ट केले आहे. विश्वचषक स्पर्धेला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार असून साखळी फेरीत बांगलादेश संघाचे तीन सामने कोलकाता, तर एक सामना मुंबईत नियोजित आहे. भारतात खेळा किंवा गुण गमवा, अशी आयसीसीने बीसीबीला ताकीद दिल्याची शक्यता कमीच आहे. बांगलादेशचे चारही साखळी सामने भारतात नियोजित आहेत. त्यामुळे बांगलादेश संघाने खेळण्यास नकार दिल्यास एक संघच आपोआप कमी होईल. या परिस्थितीत अन्य एखाद्या संघाला स्पर्धेत खेळण्यासाठी आमंत्रित केले जाईल. मात्र, बीसीबीला मोठा आर्थिक फटका सहन करावा लागेल. त्यामुळे बांगलादेश संघ भारतात खेळण्याचीच शक्यता अधिक आहे.

**स्व. उमेश शेणॉय चषक शालेय कबड्डी स्पर्धा**

## राज गुता, ईशा डिगे स्पर्धेत सर्वोत्तम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अमरहिंद मंडळ आयोजित स्व. उमेश शेणॉय चषक शालेय कबड्डी स्पर्धेत आंध्र एज्युकेशन हायस्कूलने मुलांचे, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलने मुलींच्या गटाचे विजेतेपद पटकाविले. आंध्र एज्युकेशनचा राज गुता मुलांत,डॉ. बाबासाहेब आंबेडकरची ईशा डिगे मुलींत स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडू ठरले. दोन्ही खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.




मुलांच्या अंतिम सामन्यात आंध्र एज्युकेशनने गौरीदत्त मित्तलचा ५६-३१ असा सहज पराभव करीत अंतिम जेतेपद पटकाविले. सुरुवातीपासुन आक्रमक खेळ करीत आंध्रने विश्रांतला २९-१२ अशी भक्कम आघाडी घेतली.

राज गुप्ताच्या तुफानी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. गौरीदत्तचा सुमित विश्वकर्मा चमकला. मुलींच्या अंतिम सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलने एस. आय. ई. एस. चा प्रतिकार ३६-३२ असा मोडून काढत ए विजेतेपद मिळविले.

पूर्वार्धात १२-१३ अशा पिछाडीवर पडलेल्या आंबेडकरने उत्तरार्धात टॉप गिअर टाकत हे जेतेपद खेचून आणले. तनया खामकरच्या संयमी चढाया तिला ईशा डिंगेची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे अशक्यप्राय आव्हान शक्य झाले.

## किर्णाक्षीला खेलो इंडिया बीच गेममध्ये कास्यपदक

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

दिव दमन दादरा नगर हवेली दिव घोगला बीच येथे सुरू झालेल्या खेलो इंडिया बीच गेम स्पर्धेमध्ये किर्णाक्षी किशोर येवले महाराष्ट्र हिने तुंगल इव्हेंटमध्ये कास्यपदक पटकावत महाराष्ट्राचे खाते उघडले.

तुंगल इव्हेंटमध्ये प्रिन्सेस थॉमस दिव दमन सुवर्णपदक, भूमिका जैन मध्य प्रदेश रजत पदक, सिमरन चंदीगड कास्यपदक पटकावले. या खेळाडूंना मयंक श्रीवास्तव डेपोडी डायरेक्टर स्पोर्ट ऑफ इंडिया यांच्या हस्ते मेडल प्रदान करण्यात आले. उप संचालक नवनाथ फडतर, किशोर येवले व मोहम्मद इकबाल यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.




## प्रजासत्ताक महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यंदाही पत्रकार मित्र असोसिएशन, आपला आधार फाउंडेशन, श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टतर्फे महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेतील लकी ड्रा विजेत्यांना स्कुटी, सोन्याची नथ, कुलर, चांदीचे नाणे, इस्त्री, पैठणी यासह विविध आकर्षक बक्षिसे लकी ड्रा दिली जाणार आहेत. शनिवार दिनांक २४ जानेवारीला सकाळी दहा पासून स्पर्धेला सुरवात होईल.

आकर्षक व दर्जेदार बक्षीसांची लयलूट या स्पर्धे त सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला करता येणार आहे. दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत म हिलांचे गट सहभागी होतात.

बक्षीसांची लयलूट करताना त्याही नविन मैत्रीणींसोबत आणि अनुभवासोबत बरेच काही या स्पर्धेतून घेउन जातात. या स्पर्धेत विजेत्यांबरोबरच सहभागी प्रत्येक महिलेला भेटवस्तू दिली जाईल.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १४ जानेवारीपर्यंत नावनोंदणीची मुदत आहे. इच्छूकांनी नावनोंदणीसाठी आयोजक केवल दिपक महाडीक यांच्याशी ९३२०६४६५५५, ९३२११५८०९० या क्रमांकावर संपर्क साधावा. स्पर्धेचे नियम व अटीमध्ये बदल करण्याचे अधिकार आयोजकांकडे असतील. या स्पर्धेत लोकसेवक महिला संघाना प्राधान्य दिले जाईल. प्रथम, द्वितीय व तृतीय संघाच्या सर्व विजेत्या महिलांना पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे पैठणी देण्यात येणार असल्याचे केवल महाडिक व नितीन जोशी यांनी सांगितले.

## राष्ट्रीय शूटिंग स्पर्धेत अवनी कोळी अव्वल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

६८ वी राष्ट्रीय शूटिंग अजिंक्यपद स्पर्धा दिल्ली येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या राष्ट्रीय शूटिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व



वाणिज्य, महाविद्यालयातीची एफ.वाय बी.एस.सी.आय.टी. ची अवनी अलंकार कोळी या विद्यार्थिनीने महाराष्ट्राचे नेतृत्व करत महिला आणि ज्युनियर महिला गटात २ सुवर्ण पदके जिंकली. वैयक्तिक ज्युनियर महिला व युवा महिला या गटात २ कांस्य पदक शॉटगन स्पर्धेत पटकाऊन दिले. या यशाबद्दल कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील यांनी अभिनंदन केले.

## बीच कबड्डीत महाराष्ट्र पुरुष उपांत्य फेरीत

**। दीव । वृत्तसंस्था ।**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या पुरुष कबड्डी संघाने विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत मजल मारली आहे.
साखळीतील दुसऱ्या लढीतीत उत्तराखंडला महाराष्ट्राने धुळ चारली. बीच सॉकरमध्येही महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशचा पराभव केला.

दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच कबड्डीत महाराष्ट्राने उत्तराखंडचा ४३-३३ गुणांनी पराभव करीत उपांत्य फेरीतील प्रवेश निश्‍चित केला. लढतीतच्या सुरूवातीपासून महाराष्ट्राने आपले वर्चस्व गाजवले. अभिषेक गुंगेने पहिलीच चढाई यशस्वी करीत महाराष्ट्राचे



खाते उघडले. पाठोपाठ दादासो पुजारने यशस्वी पकड घेत मैदान गाजवले. अभिषेक गुंगेसह सुरज दूंदले यशस्वी चढाय्या केल्या. पूर्वार्धात उत्तराखंडने कडवी झुंज दिली. पूर्वार्धात १९-१८ गुणांसह केवळ १ गुणांनी महाराष्ट्र आघाडीवर होता. उत्तरार्धात आक्रमक खेळ करीत महाराष्ट्राने १० गुणांनी लढत जिंकली. सुरज दूंदलेनेही यशस्वी चढाया केल्या. पहिल्या लढतीत पुरूष संघाने बलाढ्य दिल्लीला ४७ -२० गुणांनी पराभूत करीत विजयी सलामी दिली.

## ऋतुराज गायकवाडने घडवला इतिहास

**मुंबई :** ऋतुराज गायकवाडने लिस्ट ए क्रिकेटमध्ये आपल्या कामगिरीच्या जोरावर दबदबा कायम ठेवला आहे. वादळी खेळी, शतकांच्या जोरावर त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. यादरम्यान त्याने एक असा विक्रम आपल्या नावे केला आहे, जो जगात आजवर कोणालाच जमला नव्हता. ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू माईकल बेवन, दिग्गज विराट कोहली सारख्या मोठ्या फलंदाजांना मागे टाकत वर्ल्ड रेकॉर्ड नावे केला. विजय हजारे ट्रॉफीमध्ये महाराष्ट्र संघाचं नेतृत्त्व मराठमोळा ऋतुराज गायकवाड करत आहे. मधल्या फळीत फलंदाजी करताना संघाचा तारणहार ठरला आहे. त्याने गोवाविरूद्ध सुरू असलेल्या सामन्यात एकट्याने शतकी खेळी करत संघाचा डाव सावरला.

दहावे पुण्यस्मरण



स्व.रामचंद्र पोसू थळे
मृत्यू दि. : ९ जानेवारी २०१६
मु.पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड
तुमच्या पावन स्मृतींना आमचे विनम्र अभिवादन
आप्पा
तुमची आठवण आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील
शोकाकुल
मुलगा : अजित थळे, सून : आश्विनी थळे, नातू : अद्वैत थळे

**खेलो इंडिया बीच सॉकर स्पर्धा** | **पेंचक सिलटमध्ये २ रौप्य**

## महाराष्ट्राची उपांत्य फेरीत मुसंडी

**। दीव । वृत्तसंस्था ।**

खेलो इंडिया बीच स्पर्धेतील पुरूषांच्या बीच सॉकरमध्ये अंदमान आणि निकोबारला हरवून महाराष्ट्राने उपांत्य फेरी मुसंडी मारली आहे. पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राने २ रौप्य पदकाची कमाई करीत दिवस गाजविला.



दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच सॉकर मैदानात महाराष्ट्राच्या मुलांनी सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. अंदमान आणि निकोबारवर संघावर १४-५ गोलने दणदणीत विजय संपादन पदकासह उपांत्य फेरीतील प्रवेश निश्‍चित केला. कवीश दवणेसह सागर सिंगने तुफानी ३ गोल नोंदवून मैदान गाजवले. सिध्दार्थ कांबळे, साहिल डोंगरे, धवल तामोरे यांनी प्रत्येकी २ गोल तर मानस तामोरे, प्रतिक वापीलकर यांनी प्रत्येकी १ गोल करून महाराष्ट्राला दणदणीत विजय मिळवून दिला.

अंदमान आणि निकोबारवर विरूध्द महाराष्ट्राने सुरूवातपासून आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवित ४-१ गोलने आघाडी घेतली होती. दुसऱ्या व तिसऱ्या टप्यातही अचूक पासिंग करीत ५-५ गोल नोंदवून स्पर्धेतील सलग दुसऱ्या विजयाचर शिक्कामोर्तब केले. सलामीच्या लढतीत . महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशला ६-३ गोलने पराभव केले होते. तिसरा साखळी सामना गोवा विरूध्द रंगणार आहे.

पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने रूपेरी यश संपादन केले. महिलांच्या सांघिक प्रकारात ओरीसाकडून ५८०-५७६ गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. महाराष्ट्राच्या जयश्री शेटे, क्रिनाशी येवले व अशिता यादवने रौप्य पदक मिळवले. पुरूषांच्या सांघिक प्रकारात तामिळनाडूने ६०६ गुण तर महाराष्ट्राने ५७५ गुण संपादून अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदके जिंकली. महाराष्ट्राकडून अंशुल कांबळे, अनुज सरनाईक व मुकेश चौधरीने रूपेरी यशावर नाव कोरले.

### खेलो इंडियात मराठी पाऊलखुणा

सलग दुसऱ्या वर्षी दीवमध्ये खेलो इंडिया बीच स्पर्धेच्या संयोजनात मराठी पाऊलखुणा उमटल्या आहेत. परभणी येथील अक्षय कोटलवार या दीव व दमण शासनामधील युवा क्रीडा अधिकाऱ्याने खेलो इंडिया बीच स्पर्धेची संकल्पना यशस्वी करून दाखवली आहे. कोटलवार हे राष्ट्रीय टेबलटेनिसचे खेळाडू असून दीव येथे आल्यानंतर त्यांनी बीच स्पर्धेसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरून साकर केली आहे. महाराष्ट्रसह संपूर्ण देशातून आलेल्या खेळाडूंना ते विशेष पाहुणचार देत असल्याने त्याचे कौतुक होत आहे. खेलो इंडिया बीच स्पर्धेनंतर आशियाई बीच स्पर्धा दीवमध्ये घेण्यासाठी कोटलवार यांचे ध्येय आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)